(सभापतीस्थानी माननीय सभापती)

म.वि.स.नियम 289 च्या सूचनांसबंधी

सभापती : आज नियम 289 अन्वये दोन सूचना माझ्याकडे प्राप्त झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी व माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सदर सूचनेच्या बाबतीत मला पत्र देऊन विनंती केली आहे की, आजचे सभागृहाचे कामकाज सुरु होईपर्यंत मी सभागृहात पोहचू शकत नाही. त्यामुळे मी दिलेली नियम 289 अन्वयेची सूचना उद्या घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी देखील नियम 289 अन्वये दुसरी सूचना माझ्याकडे दिलेली आहे. या विषयांच्या संदर्भात जी संयुक्त समिती गठीत झालेली आहे. त्या संयुक्त समितीची बैठक तातडीने व्हावी अशी मागणी केली आहे. या अनुषंगाने सामाजिक न्याय मंत्री यांना माझ्या दालनात बोलावून त्या बाबत त्यांना निश्चितपणे सूचना देईन. म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची सूचना दालनात नाकारलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव

(१) * ५०७१० श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४२१०७ ला दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम विनअनुदानित तत्वावरील शाळांना अनुदान देण्याबाबत निश्चित धोरण ठरविण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात येऊन, एका महिन्याच्या आत निर्णय घेण्याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने घेतलेल्या निर्णयाचे व कार्यवाहीचे स्वरूप काय आहे व केव्हा घेण्यात आली आहे,

(३) अद्याप, निर्णय घेण्यात आला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व सदर निर्णय केव्हापर्यंत अपेक्षित आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : (१) व (२) कायम विना अनुदान तत्वावरील शाळांना अनुदानावर आणणेसंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, कायम विना अनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सभापती महोदय, या सभागृहात दिनांक 17 डिसेंबर, 08 रोजी जवळ जवळ 22 ते 23 मिनिटे चर्चा झालेली आहे. या प्रश्नाची चर्चा झाली त्यावेळी सुर्देवाने माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित होते. या विषयाच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्या नंतर त्या अनुषंगाने या सभागृहात आश्वासन देण्यात आले होते की, "आठ दिवसाच्या आत यासंदर्भातील जी.आर.काढतो " असे शासनाने मान्य केले होते. कायम विना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुदानित शाळांचा "कायम" शब्द काढून टाकण्यात आलेला आहे असेही स्पष्ट आश्वासन या सभागृहात दिले गेलेले आहे. माननीय शिक्षण मंत्री नवीन आहे म्हणून त्यांना या प्रश्नासंबंधी मी पार्श्वभूमी थोडक्यात सांगतो आहे. आठ दिवसाच्या आत शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यासंबंधी जी.आर. आम्ही काढतो आहोत असे स्पष्टपणे आम्हाला सांगितले गेले आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. कोर्टाने यासंदर्भात निर्देश दिलेले आहेत. या अनुषंगाने संबंधित सचिवांनी देखील कोर्टात ॲफिडेव्हीट सादर केले आहे. येत्या आठ दिवसात यासंबंधी पॉझिटिव्ह भूमिका घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील. हे आश्वासन दिनांक 17 डिसेंबर,2008 रोजी शासनाकडून देण्यात आलेले आहे. यासंदर्भातील जी.आर.शासनाने काढलेला नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार सदर जी.आर.आजच्या आज काढणार काय ? कायम विना अनुदानित शाळांचा " कायम "हा शब्द वगळून त्या शाळांमधील शिक्षकांना न्याय दिला जाईल काय ? कायम विना अनुदानित शाळांचा "कायम" हा शब्द काढून टाकल्यानंतर त्या शाळा विना अनुदानित समजल्या जातील. शासनाच्या निकषानुसार त्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासन पुढची कार्यवाही किती दिवसात करणार आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते व अन्य सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याची मला पूर्णपणे जाणीव आहे. या प्रश्नाच्या बाबततीत सातत्याने या सभागृहात आणि बाहेरची बरीच चर्चा झालेली आहे. या विषयाच्या बाबतीत राज्य सरकारने जे आश्वासन दिलेले आहे. त्या अनुषंगाने सरकारने माननीय हायकोर्टासमोर आपली भूमिका मांडली आहे. राज्याची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर याबाबतीत सरकारकडून निर्णय घेतला जाईल अशा प्रकारचे ॲफिडेव्हीट न्यायालयास सादर केले आहे. परंतु या विषयाच्या बाबतीत पाठिमागे न जाता सन्माननीय सदस्यांची जी भूमिका आहे की, "कायम" हा शब्द काढून ही विना अनुदानित विद्यालये करावीत. या विषयाच्या बाबतीत सरकारकडे वेगवेगळे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. "कायम" हा शब्द वगळयासाठी कोणता बेस ग्राह धरावा. तसा निर्णय घेतला तर तो कोणत्या वर्षापासून लागू करावा. यासंबंधीचा अंतिम प्रस्ताव राज्य शासन तयार करीत आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रश्नावर या सभागृहात अत्यंत गांभीर्याने अनेकदा चर्चा झाली. आपण स्वत: निर्देश दिले. माननीय शिक्षणमंत्री नवीन असले तरी त्यांना नवीन असण्याची संधी देता येणार नाही. ते उत्तराची पुनरावृत्ती करीत आहेत, सभागृहाची दिशाभूल करणारे उत्तर देत आहेत. आठ दिवसात पॉझिटिव्ह निर्णय घेऊ असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. आम्ही मागणी केली की, "कायम विनाअनुदानित" मधील "कायम" हा शब्द वगळण्यात यावा. शासनाने हा शब्द काढण्याबद्दल कोर्टात सांगितले. आता पुन्हा मागे जाता येणार नाही आणि वेगळी चर्चा करता येणार नाही. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आज आपण हे मान्य करणार आहात की नाही?

सभापती : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, या सभागृहातील बहुसंख्य सदस्यांचे या प्रश्नाबाबत असे मत आहे की, हा प्रलंबित प्रश्न कसा सुटेल यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर मी ऐकले, एकंदरीत त्यांची उत्तर देण्याची कल्पना विचारात घेतली तर हा प्रश्न सुटण्याची शक्यता वाटते. त्या अनुषंगाने त्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : माझे उत्तर पूर्ण झालेले नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : या सदनामध्ये या प्रश्नावर अनेकवेळा आग्रहाने आपण चर्चा केली. हा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने आपले प्रयत्न सुरु आहेत. कायम हा शब्द वगळावा या अनुषंगाने हायकोर्टाने जो निर्णय दिला त्यावर सुध्दा उहापोह केला आहे. एक वेळा मुख्यमंत्र्यांनी सुध्दा या अनुषंगाने शासनाची भूमिका याठिकाणी व्यक्त केली आहे. आज प्रश्नोत्तराच्या यादीतील हा पहिला प्रश्न आहे. माझी सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांशी सुध्दा आठ दिवसापूर्वी चर्चा झाली. मला असे वाटते की, हा प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने त्यांचे उत्तर पूर्ण झाले नव्हते, ते उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एक गोष्ट मी त्यांच्या लक्षात आणून देतो, मग त्यांनी उत्तर द्यावे. त्यांनी जे उत्तर दिले ते दोन-तीन वर्षापूर्वीचे आहे. मधल्या घटना आहेत त्या महत्वाच्या आहेत. कायम विनाअनुदानावर काम करायला लावणे ही एक प्रकारची वेठबिगारी आहे. फोर्स्ड लेबर आहे. कोर्टामध्ये याबाबतचे ऑर्ग्युमेंट त्यावेळी झालेले आहेत. हे भारतीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घटनेच्या विरुध्द आहे. घटनेच्या कलम 23 मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, Practicing "Begar and other forms of forced labour are prohibited and any contravention shall be an offence punishable in accordance with law." हे फोर्स्ड लेबर आहे. एका बाजूच्या शाळेला अनुदान देणार आणि दुसऱ्या बाजूच्या शाळेला कायम विनाअनुदान हा पट्टा लावणार हे योग्य नाही. हे घटनेच्या विरुध्द आहे. हायकोर्टात ऑर्ग्युमेंट झाल्यानंतर हायकोर्टाने निर्णय दिला की, "कायम विनाअनुदानित असा शब्द परवानगी पत्रात वापरल्याने अशा शाळांना अजिबात अनुदान देता येणार नाही असा अर्थ लावणे बरोबर होणार नाही." असा निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने 2003 च्या याचिका क्रमांक-138 मध्ये दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दिला हे खरे आहे काय?" या प्रश्नाला शासनाने सभागृहात होय असे उत्तर दिले. दुसरा निर्णय 2005 च्या याचिका क्रमांक-8736 मध्ये "कायम विनाअनुदानित" असा शब्द वापरल्याने असा भेदभाव करता येणार नाही असा आहे. 'सर्व व्यावहारिक प्रयोजनासाठी परवानगी देताना वापरण्यात आलेली कायम विनाअनुदान तत्वावरील मान्यता' ही शब्दरचना विनाअनुदानित तत्वावरील मान्यता असेच समजले पाहिजे असा हायकोर्टाने स्पष्ट निर्णय दिलेला आहे. 2005 मध्ये झालेले हे निर्णय आहेत. घटनेमधील कलम सांगितले आहे. वेठबिगारी ही महाराष्ट्राला लांच्छन लावणारी गोष्ट आहे हे सांगितले. एका शाळेत अनुदानावर आणि एका शाळेत वेठबिगारीवर काम करायला लावणे हे बरोबर नाही. वेठबिगारी ही घटनेच्या विरुध्द आहे. It is a form of forced labour. मागील वेळी शिक्षणमंत्री वेगळे होते. माननीय शिक्षणमंत्री बदलले असतील परंतु राज्य शासन कायम आहे. ही कंटिन्यू प्रोसेस आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात हजर होते. शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात काय सांगितले? आठ दिवसाच्या आत शासन निर्णय निर्गमित केला जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांच्या समक्ष त्यांनी सभागृहात हे सांगितले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50710..... प्रा.बी.टी.देशमुख.....

माननीय शिक्षण मंत्री तसेच माननीय मुख्यमंत्री सभागृहात असताना आणि आताच सांगितलेल्या दोन्ही गोष्टी रेकॉर्डवर असताना येत्या आठ दिवसात फायनल निर्णय काढला जाईल असे माननीय मुख्यमंत्री सांगतात परंतु अद्यापही शासन निर्णय निर्गमित होत नाही यामुळे महाराष्ट्राची शान वाढत नाही....अडथळा.... त्यांना हे माहीत नाही हे दुर्दैव आहे म्हणून सांगावे लागते, अन्यथा सभागृहाचा वेळ मी कधीच घेत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की, या अनुषंगाने आठ दिवसात पॉझिटिव्ह भूमिका घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न राहील. ज्यावेळेस माननीय मुख्यमंत्री प्रयत्न राहील असे म्हणतात त्यावेळी ती गोष्ट फायनल असते. इतर मंत्र्यांच्या बाबतीत म्हणू शकतो की, त्यांनी जरी प्रयत्न करु म्हटले तरी मंत्रिमंडळ मान्य करण्यास तयार नाही. पण मुख्यमंत्र्यांनी शब्द "प्रयत्न करु" असे म्हटले याचा अर्थ "करु" असाच असतो. कारण माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा कोणतेही पद राज्यात मोठे नसते. घटनेने निर्माण केलेले हे पद असून लोकांचा घटनेवर विश्वास आहे. आपण या ठिकाणी आणखी काय सांगितले हे मी वाचून दाखवित नाही. ज्यावेळेस सभागृहात दि. 9.4.2008 रोजी पुन्हा पुन्हा प्रश्न विचारण्यात आला त्यावेळेस माननीय शिक्षण मंत्री एवढ्या रागाने म्हणाले की, "एकदा हो म्हटले आहे, आणखी किती वेळा हो म्हणू" ? म्हणून माझी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत आणि फक्त दोनच ओळींचा शासन निर्णय काढणे आवश्यक आहे की, "कायम हा शब्द वगळला जाईल" आणि त्यामुळे संपूर्ण विना अनुदानित ट्रिटमेंट लागू पडेल. म्हणून आज संध्याकाळपर्यंत हा निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवला पाहिजे व तो या शाळांना लागू झाला पाहिजे. असे करुन या शासनाने शासनाची, माननीय मुख्यमंत्र्यांची, माननीय सभापतींची तसेच सभागृहाचीही शासन राखावी. म्हणून यामध्ये तिसरी ओळ सुध्दा नको, फक्त दोनच ओळींचा जी.आर. शासन तात्काळ काढून आजच्या आज लागू करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, नागपूर अधिवेशनाच्या कालावधीत या प्रश्नावर सविस्तर अशी चर्चा सभागृहात झालेली आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे सतत प्रयत्नशील असतात त्याप्रमाणे त्यांनी वारंवार हा प्रश्न उपस्थित करुन आपली मागणी आग्रहाने मांडली. परंतु या प्रश्नाची पार्श्वभूमी देखील मला या निमित्ताने सांगितली पाहिजे. खरे म्हणजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ..... ता.प्र.क्र.50710....

शासन हे करु इच्छित नाही हा विषयच नाही किंवा शासनाची तशी भूमिका देखील नाही. पण सुरुवातीला कायम विना अनुदानित स्वरुपात ज्या संस्थांना परवानग्या देण्यात आल्या त्यांच्याकडून स्टॅम्प पेपरवर लेखी ॲफिडेव्हीट लिहून घेण्यात आले होते.....अडथळा.....आपण ज्याप्रमाणे सभागृहात पार्श्वभूमी सांगिली त्याच पध्दतीने या गोष्टीकडे सुध्दा सभागृहाचे लक्ष वेधणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यात प्रचंड प्रमाणात अशा संस्थांना परवानगी देण्याबाबतची मागणी होती परंतु त्याचा आर्थिक बोजा शासनावर येता कामा नये त्यातून कायम विना अनुदानित तत्वावर अशा संस्थांना परवानग्या देण्यात आल्या. तसेच या संस्थाचालकांनी शासनाला लिहूनही दिले म्हणूनच अशा परवानग्या देण्यात आल्या होत्या. हे झाल्यानंतर सबसिक्वेंटली असाही प्रश्न समोर आला की, अशा संस्थांना अनुदानाची मागणी सुरु झाली. सन्माननीय सदस्य वारंवार सभागृहात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्थांच्या बाबतीत शासनाची घटनात्मक जबाबदारी असल्याचे सांगून संविधानाचा उल्लेख करतात. त्यानुसार माझी संविधानिक जबाबदारी म्हणून यातून मार्ग काढण्याची माझी भावना आहे. मी हे देखील मान्य करतो की, ही शासनाची जबाबदारी आहे परंतु केवळ एवढ्यावरच हे मर्यादित नाही तर अशा संस्थांमध्ये काम करणाऱ्या 28 हजार शिक्षकांचाही प्रश्न आहे व त्यांचा विचार केला तर शासनावर 450 ते 500 कोटीचा बोजा तातडीने पडणार आहे आणि हा बोजा शासन उचलू शकते काय हा त्यातील मुख्य विषय आहे. केवळ "कायम विना अनुदानित" मधील "कायम" शब्द काढण्याएवढा हा विषय सोपा नाही. हा बोजा आजच्या आर्थिक परिस्थितीत परवडणारा आहे काय हा देखील प्रश्न आहे. नागपूर अधिवेशनात यासंबंधीची चर्चा झाली तरी देखील अद्याप काहीच केले नाही असे सन्माननीय सदस्य म्हणतात. परंतु मी असे सांगू इच्छितो की, या विषयाबाबत मी माननीय शिक्षण मंत्र्यांबरोबर दोन तीन वेळा चर्चा केलेली आहे. परंतु हा प्रश्न मर्यादित नसून विना अनुदानित म्हणून जरी मंजुरी दिली तर पुन्हा 20 टक्के, 50 टक्के अशा प्रकारे अनुदानाचे स्लॅब ठरलेले आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .... ता.प्र.क्र. : 50710...

त्याच प्रमाणे काही संस्था अगोदरच्या आहेत त्यांना अगोदर अनुदान द्यावे लागणार आहे व ते संपल्यानंतर कायम विनाअनुदान असलेल्या संस्थाना अनुदान द्यावे लागणार आहे. यामुळे शासनावर जो काही बोजा येणार आहे त्यासंदर्भातील प्रोव्हीजन बजेटमध्ये तातडीने करणे शक्य आहे काय हा ख-या अर्थाने प्रश्न आहे. म्हणून या प्रश्नाच्या संदर्भात कशा पध्दतीने मार्ग काढता येईल ते पहावे असे मी शिक्षण मंत्र्यांना सूचित केले होते. हा प्रश्न लवकर मार्गी लागावा ही शासनाची मनापासूनची इच्छा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खरे म्हणजे हा प्रश्न नांगपूरच्या डिसेंबरच्या अधिवेशनात उपस्थित झाला होता. या प्रश्नाच्या संदर्भात त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देऊन सहा महीने होऊन गेलेले आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, "सदरील प्रश्नाच्या संदर्भात शासन गंभीर आहे हे मला मुद्दाम सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावनाशी मी सहमत आहे. हा विषय मी हाताळत नव्हतो परंतु राज्याचा प्रमुख म्हणून या प्रश्नाची मी नव्याने माहिती घेतली. या प्रश्नाच्या संदर्भात मार्ग काढता आला पाहिजे ही आमची मनापासूनची भावना आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितले आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने निर्देश दिलेले आहे, सचिवांनी देखील कोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. या अनुषंगाने 8 दिवसात पॉझिटीव्ह भूमिका घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. " माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 17 डिसेंबर रोजी अशा प्रकारचे उत्तर दिलेले होते, आठ दिवसातच हा प्रश्न मार्गी लावू असे सांगितले होते, सहा महीने होऊनही हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. खरे म्हणजे हा 28 हजार शिक्षकांचा प्रश्न आहे. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, कायम विना अनुदानितच्या संदर्भात प्रतिज्ञापत्र दिलेले आहे परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, कायम विना अनुदानितचे प्रतिज्ञापत्र हे संस्थाचालकांनी लिहून दिलेले आहे, हे प्रतिज्ञापत्र शिक्षकांनी दिलेले नाही. यामध्ये शिक्षकांचा काही एक दोष नाही. यामुळे 1 जून, 2009 पासून हजारो शिक्षक आमरण उपोषणाला बसलेले आहेत. कृती समितीने माननीय राज्यपाल महोदयांना पत्र लिहून इच्छा मरणाची परवानगी मागितलेली आहे. महाराष्ट्र राज्य कायम

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

विना अनुदान कृती समिती जून, 2001 पासून कायम विना अनुदानित शाळांना अनुदान मिळण्याबाबत आमरण उपोषण करीत असून शासनाचे याकडे पूर्णपणे दूर्लक्ष झाले असून आम्हाला सर्वांना आपण इच्छा मरणाची परवानगी द्यावी व आपण आमच्या सर्व कुटुंबाची जबाबदारी घ्यावी, अशा प्रकारचे कृती समितीने माननीय राज्यपाल महोदयांना पत्र लिहिले आहे. हा प्रश्न गंभीर आहे. या प्रश्नामुळे 28 हजार कुटुंबे उघडयावर पडलेली आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, या प्रश्नाला न्याय देण्यासाठी 500 कोटी रुपयांचा बोजा शासनावर पडणार नसून शासनाने 290 ते 300 कोटी रुपयांचा बोजा शासनावर पडणार आहे. शेतक-यांना कर्जमाफी देतांना आपण 1 लक्ष 55 हजार कोटी रुपयांचे कर्ज सरकारवर करुन ठेवलेले आहे. या राज्यातील शिक्षकांसाठी व या राज्यातील शिक्षणासाठी अजून 300 कोटीचा बोजा या राज्यावर पडला तर काही बिघडणार नाही. पण महाराष्ट्रातील शिक्षकांना इच्छामरण मागण्याची वेळ येत असेल तर सरकारने या प्रश्नाबाबत गांभीर्याने विचार करुन आजच्या आज यासंदर्भातील निर्णय शासन करणार आहे काय?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात अतिशय स्पष्ट भूमिका मांडलेली आहे. राज्यसरकारने जो शब्द दिला होता त्या शब्दापासून राज्य सरकार मागे झालेले आहे अशा प्रकारचा कुठलाही संदेह ठेवलेला नाही. या विषयाच्या संदर्भात त्यांनी कुठलाही संदेह ठेवलेला नाही. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने जी वेळोवेळी भूमिका जाहीर केलेली आहे त्यासंदर्भातील माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहापुढे दिलेली आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर 3-4 वेळेस बैठका झालेल्या आहेत. आम्रही भूमिकेतून हा प्रश्न सुटला पाहिजे अशी माननीय मुख्यमंत्री महोदयांची इच्छा आहे. शिक्षण विभागाने जो प्रस्ताव तयार केलेला आहे त्यामध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग म्हणजे जे विनाअनुदानित विद्यालय अनुदानितवर 100 टक्के यावयाचे राहिले आहेत. (अडथळा) या प्रश्नाच्या संदर्भात सरकारची विना अनुदानितचे अनुदानित करतांना जी घटनात्मक जबाबदारी होती ती जबाबदारी शासन पूर्ण करीत आहे. दुसरा भाग असा आहे की, "कायम" शब्द काढल्यानंतर त्या शाळा "अनुदानित"करण्यामध्ये अनुदानित कोणत्या वर्षापासून धरण्यात यावे, कोणत्या वर्षी ते लागू करावे, यामध्ये राज्यसरकारची भूमिका हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर बैठक घेऊन अंतिम निर्णय केला जाईल हे मी येथे सूचित करतो.

यानंतर श्री. गायकवाड

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : ठीक आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असून आणि तो हरकतीचा मुद्दा मांडण्याचा मला अधिकार आहे.

सभापती : ते मला मान्य आहे. म्हणूनच मी आपल्याला हरकतीचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे .एखाद्या व्यवस्थापकाने तसे लिहून दिले आहे. मी येथे आपल्याला एक उदाहरण देतो की. एखादा प्रश्न जर ॲडमिट झाला नाही तर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील विधान मंडळाचे सचिव श्री. शिंदेकर यांच्याकडे गेले आणि हा प्रश्न ॲडमिट करण्यात यावा असे म्हटले . त्यावेळी त्यांनी असे सागितले की, हा प्रश्न जर ॲडमिट झाला नाही तर मी आत्महत्या करीन असे लिहून द्यावे. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य तसे लिहून देणार नाहीत परंतु या शिक्षकांनी लिहून दिलेले आहे तेव्हा या शिक्षकांना आपण आत्महत्या करण्यास सांगणार आहात काय .? माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की त्यांनी ते लिहून दिलेले आहे ते वेठबिगारीचे आहे...अडथळा... मी हरकतीचा मुद्दा मांडत आहे आणि माननीय सभापतींनी त्यावर निर्णय द्यावा म्हणून तो मांडत आहे. या ठिकाणी असे उत्तर देण्यात आले होते की, त्या व्यवस्थापनाने लिहून दिलेले आहे. त्यांनी तसे लिहून दिलेही असेल त्याबाबतीत त्यांनी लिहून दिलेले नाही असे म्हणणार नाही. परंतु असे असले तरी शिक्षकांनी मात्र तसे लिहून दिलेले नाही. तसेच आम्ही आत्महत्या करु असे लिहून दिल्यानंतर त्याचे कौतुक येथे होता कामा नये ते घटनेच्या विरोधात आहे.तेव्हा अशा प्रकारे येथे प्रतिपादन करता येते काय ?

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मघाशी येथे घटनेचा जो उल्लेख करण्यात आला होता त्यासबंधी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर देत असतांना घटनेचा आदर राखला आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी अभिवचनही दिलेले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षण मंत्र्यांनी दिलेल्या उत्तराच्या शेवटी त्यांनी असे सांगितले आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर .....

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात)

सभापती : माननीय शिक्षण मंत्र्यांनी जे सांगितले आहे ते मी आपल्याला सांगत आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, या संदर्भातील राज्य शासनाची भूमिका सभागृहात सांगण्यात आलेली आहे....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा छळवाद आहे. हिटलरने गॅस चेंबरमध्ये कोंडून ज्या प्रमाणे माणसांना मारले होते तशा प्रकारे लोकांना मारण्याची ही प्रवृत्ती आहे....

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजतो. हा विषय निश्चित मार्गी लागला पाहिजे अशीच शासनाची भूमिका आहे.परंतु एखादा निर्णय जाहीर करावयाचा परंतु त्याची अंमलबजावणी करावयाची नाही ही गोष्ट बरोबर होणार नाही. या संदर्भात मी मघाशी स्पष्ट केलेले आहे की यासाठी 500 कोटी रुपये अर्थसंकल्पातून उपलब्ध करुन द्यावे लागणार आहेत .या विषयाच्या संदर्भात मी बारकाईने माहिती घेतली असून मला सभागृहाला एवढेच सांगावयाचे आहे की, हा प्रश्न मार्गी लावण्याची माझी तत्वत: तयारी आहे अधिवेशन संपण्याच्या अगोदर याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी प्रश्न विचारावा.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीला असे सांगितले की, ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. त्यानंतर माननीय शिक्षण मंत्र्यांनी असे सागितले की, फक्त विना अनुदानाच्या संदर्भात शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे .....

नंतर श्री.सरफरे

अशोधित प्रत / शोधनासाठी नाही

(दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

(गोंधळ)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे मला पूर्ण करु द्यावे. आपण माझे नाव पुकारले आहे, त्यामुळे मला आपले संरक्षण पाहिजे.

(गोंधळ)

प्रा.बी.टी. देशमुख : सभापती महोदय, आपण या संदर्भात आदेश दिले आहेत. आपण दिलेले आदेश मंत्रिमहोदय पाळत नाहीत, कोर्टाने दिलेले आदेश पाळत नाहीत, देशाची घटना पाळत नाहीत हे बरोबर नाही.

(गोंधळ)

सभापती : मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(11.25 ते 11.35 कामकाज स्थगित झाले.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी - माननीय सभापती

ता.प्र.क्र.50710 . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकदम बोलतात.)

सभापती : सनमाननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी मी एवढेच निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना जी माहिती देण्यात आलेली आहे, ती चुकीची आहे की बरोबर आहे, या वादामध्ये मी जाणार नाही. आता विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचा मुद्दा शिल्लक राहिलेला नाही. तर फक्त कायम विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचे शिल्लक राहिलेले आहे. आज आपण जरी त्यातील "कायम" हा शब्द काढून टाकला तरी देखील त्याचे मुल्यांकन केले पाहिजे असा आपल्याकडे नियम आहे. तसेच या शाळा उद्यापासून लगेच मुल्यांकनावर येणार नाहीत. याबाबतीत आज आम्ही देखील अभ्यास करीत आहोत. आम्ही येथे शिक्षकांचे प्रश्न मांडतो, याचा अर्थ केवळ येथे येऊन ओरडत नाही, तर आम्ही देखील अभ्यास केलेला आहे. आता शासनाच्या नॉर्म्स्प्रमाणे शाळेचे वय 5 वर्षाचे झाल्यानंतर 20 टक्के अनुदान सुरु होते.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या शैक्षणिक वर्षापासून जरी या शाळांना अनुदान सुरु करावयाचे झाले तरी फक्त 87 कोटी रुपये लागणार आहेत. म्हणून माझा प्रश्न एवढाच आहे, माझी एवढीच विनंती आहे की, "कायम विनाअनुदानित शाळा" यामधील "कायम" हा शब्द काढून टाकण्याबाबतचा निर्णय आजच्या आज माननीय शिक्षण मंत्री महोदय घेणार आहेत काय ? त्या शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीतील निर्णय कधी जाहीर करण्यात येणार आहे ? माझा एवढाच स्पेसिफीक आणि पॉईंटेड प्रश्न आहे. याबाबतीत अधिकाऱ्यांच्या मार्फत शासनाला काहीतरी चुकीची माहिती दिली जात आहे. यासंदर्भात 500 कोटी रुपयांचा आकडा समोर आलेला आहे आणि त्यामुळे या विषयाच्या संदर्भात वातावरण निर्माण झालेले आहे. पण 500 कोटी रुपये हे 2012 साली लागणार आहेत, आज लागणार नाहीत. सध्या फक्त 87 कोटी रुपयांची आवश्यकता आहे.मी स्वत: याचा हिशोब केलेला आहे.

. . . .जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50710 . . . .

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना प्रश्न विचारावयाचा आहे काय ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शासन "कायम अनुदानित शाळा" यामधील "कायम" हा शब्द काढून टाकण्याबाबत आज निर्णय घेणार आहे काय ? तसेच आज त्यासंबंधीचा जी. आर. देखील काढण्यात येणार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची जी भावना आहे, तीच राज्य शासनाची भावना आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मघाशी सुस्पष्ट भाषेमध्ये सांगितले की, आता "कायम" हा शब्द काढून टाकावयाचा, त्याबाबतीत आज घोषणा करावयाची, परंतु मुळामध्येच आमच्या विभागाचा एकूणच प्रस्ताव तयार असून तो मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी जाणार आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी या संबंधातील निर्णय पूर्ण होईल.

(सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी खाली बसून बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे खाली बसून बोलत आहेत. याठिकाणी असे सांगण्यात आले की, "हे अधिवेशन संपण्याच्या आत याबाबत निर्णय होईल" वगैरे. त्यावर मी एखाद्या वेळेस विश्वास ठेवला देखील असता. पण आम्ही गेल्या पाच-सहा अधिवेशनामध्ये हेच वाक्य ऐकलेले आहे. गेल्या अधिवेशनामध्ये तर माननीय मुख्यमंत्र्यांच्या तोंडून ऐकलेले आहे की, आठ दिवसामध्ये करु. माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, 500-550 कोटीचा प्रश्न आहे. त्यामुळे आर्थिक स्थितीचे एकदम गांभीर्य निर्माण झाले आणि मला यावर देखील प्रामाणिकपणे विश्वास ठेवता आला असता. परंतु जर त्यांनी बुडित महामंडळांच्या बाबतीत 1100 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे आणि ते त्यांनी केले नसते तर एखाद्या वेळेस विश्वास ठेवता आला असता. विशिष्ट सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना 5 कोटी पर्यंत विकास निधी देण्यात आला असता तर ते आम्ही एखाद्या वेळेस मान्य केले असते.पण तुम्ही तिकडे 350 ते 500 कोटी रुपये वाटत आहात...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,जो शिक्षक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची सेवा करीत आहे.गेल्या पाच-सहा अधिवेशनांपासून आम्ही "हे अधिवेशन संपण्यापूर्वी"अशा प्रकारच्या घोषणा खूप ऐकल्या आहेत.सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय द्यावा.आज सदनामध्ये माननीय

. . . .जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुख्यमंत्री आणि माननीय शिक्षण मंत्री हे दोघेजण उपस्थित आहेत. त्यामुळे आता त्यांनी यासंबंधातील घोषणा करावी आणि याची अंमलबजावणी कधी करणार आहात ? हे सांगावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करताना असे सांगितले की, यासंबंधात यापूर्वी देखील घोषणा झालेल्या आहेत. या सर्व प्रक्रियेच्या बाबतीत सांगावयाचे तर शासनाने नामदार हाय कोर्टासमोर यासंबंधात ॲफीडेव्हीट दिलेले आहे आणि अशी भूमिका स्पष्ट केलेली आहे की, आपण देण्यास तयार आहेत. आमच्या विभागाकडून याबाबतचा प्रस्ताव आता तयार होत असताना, हे अधिवेशन संपण्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन निर्णय केला जाईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांना एकच आठवण करुन देऊ इच्छितो की, विनाअनुदानाच्या संदर्भातील निर्णय झाला. त्यानंतर माननीय कै.शंकररावजी चव्हाण सत्तेवर आले होते. त्यांनी त्यावेळी असे सांगितले होते की, महाराष्ट्राला कलंक लागेल असा हा निर्णय झालेला आहे. सभापती महोदय, या संदर्भात मी स्वत: प्रश्न विचारला होता. हा कलंक पुसण्याची जबाबदारी नियतीने त्यांच्या चिरंजीवांवर टाकलेली आहे. म्हणून शासन हा 'कायम' शब्द पुसण्यात येणार आहे काय? कोर्टापुढे ॲफिडेव्हिट लिहून देण्यात आलेले आहे. कोर्टाने वेटबिगारी आहे असे सांगितलेले आहे. ही वेटबिगारी संपवण्याची काम शासन करणार आहे काय? याबाबतीत शासन दर वेळेला आठ दिवसात निर्णय घेण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन देते. म्हणून आजच दुपारी होणाऱ्या कॅबिनेटपुढे याबाबतचा निर्णय घेण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्री आता करणार आहेत काय? सभापती माहोदय, कायम विना अनुदान तत्वावरील शाळांना अनुदानावर आणणेसंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सदर करण्याची कार्यवाही सुरु आहे असे उत्तरात म्हटले आहे. तेव्हा या प्रश्नाचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षित आहे. शिक्षण मंत्र्यांकडून नाही.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच स्पष्ट केलेले आहे की, शासनाची याबाबतीतील भूमिका सकारात्मक आहे, पॉझिटिव्ह आहे. हा विषय तातडीने मार्गी लावण्याच्या बाबतीत मी प्रयत्नशील आहे. माझी याबाबतीत चर्चाही झालेली आहे. नागपूरच्या अधिवेशनाच्या कालावधीमध्ये मी याची पूर्ण माहिती घेतली आहे. हा प्रश्न आपण जेवढा म्हणता तेवढा सोपा नाही. थोडयावेळा पूर्वी सन्माननीय सदस्य विक्रम काळे यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे हे सर्वच एक वर्ष द्यावयाची गरज आहे असे मी म्हणणार नाही. अल्टिमेटली, हा प्रश्न 500 ते 550 कोटी रुपयांचा आहे. 2800 लोकांचा आहे. यामध्ये सगळयात महत्वाची बाब अशी आहे की, निर्णय घेत असताना त्यावेळी ज्या शाळा दिल्या गेल्या त्यावेळचे रेकॉर्डवर आहे. त्यांना कायम विनाअनुदानित ठेवणार अशा प्रकारची स्पष्ट भूमिका घेण्यात आली होती. परंतु आज नव्याने हा प्रश्न निर्माण करुन पुन्हा या पध्दतीने तो सुरु आहे तरी सुध्दा संविधानिक जबाबदारी म्हणून माझी ऐकण्याची जबाबदारी आहे. माझी त्याबाबतीतील भूमिका सकारात्मक आहे. सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी या ठिकाणी फार राजकीय भाषण केले. त्यांनी या विषयावर बोलत असताना महामंडळाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

कर्जाच्या बाबतीत उल्लेख केला. त्यांना त्याचा राजकीय फायदा घ्यावयाचा त्याबद्दल मी भाष्य करणार नाही. शासनाची या प्रश्नाच्या बाबतीत सकारात्मक भूमिका आहे. यासाठी मंत्रिमंडळापुढे जावे लागेल. या प्रश्नाचे उत्तर सभागृहात जाहीर करण्या इतका सन्माननीय सदस्य म्हणतात तेवढा सोपा नाही. त्यात काही फायनान्शियल इम्प्लीकेशन्स आहेत. शासनाने हायकोर्टात जे ॲफिडेव्हिट केलेले आहे त्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की, "when the financial position of the State Government improves and all the schools permitted to run on temporary unaided basis, comes to 100% grant-in-aid. The State Government will formulate a scheme to allow needy permanently unaided primary and secondary schools in Tribal Sub-Plan." आर्थिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेऊ अशा प्रकारचे ॲफिडेव्हिट केले असले तरी सुध्दा या गोष्टीची तातडी लक्षात घेऊन, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याकरिता हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर मंत्रिमंडळापुढे जाऊन निर्णय घेऊ.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सन 2000 पर्यंतच्या मुंबईतील झोपड्या नियमित करण्याबाबत

(2) * 52523 श्री.किरण पावसकर , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देवून त्या नियमित करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, काही वर्षापूर्वी शासनाने मुंबईतील सन 1995 पूर्वीच्या झोपड्यांना संरक्षण देवून त्यांना नियमित केल्या, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासन झोपड्यांना सातत्याने संरक्षण देत आल्याने व त्यानंतर त्यांना मोफत घरे देण्यात येत असल्याने मुंबईत परप्रांतातून हजारोच्या संख्येने लोंढे येवून झोपड्या बांधीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, अनधिकृत झोपड्यांना वारंवार संरक्षण देण्याची खास अशी काही कारणे आहेत काय,

(5) असल्यास, यापुढे मुंबईत अनधिकृत झोपड्या बांधण्यासंबंधित विभाग अधिकारी व पोलिसांना जबाबदार धरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर, श्री.अशोक चव्हाण यांच्या करिता (1) झोपडीधारकांच्या पात्रता दिनांकाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(2) होय.

(3) व (4) अंशत: खरे आहे.

गलिच्छ वस्त्यांमधील अनारोग्यकारक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मुलभूत सुविधान पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक 1.1.1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण पात्र ठरविले आहे.

(5) होय.

शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र.जीईएन-1096/प्र.क्र.15/नवि.27, दिनांक 4.3.1996 अन्वये महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमधील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी व अस्तित्वात असलेली अनधिकृत बांधकामे हटविण्यासंबंधी त्या विभागातील संबंधीत हटविण्यासंबंधी त्या विभागातील संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्याला जबाबदार धरण्यात आले आहे. तसेच संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्याला आवश्यक ते संपूर्ण सहाय्य देणेसंबंधी त्या क्षेत्राशी संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सदर पोलीस अधिकाऱ्याने सहकार्य न केल्यास त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यासंबंधी पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त यांना निदेश देण्यात आले आहेत.

..4..

ता.प्र.क्र.52523...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी सहयाद्रीवर बैठक घेतली होती. त्या बैठकीत सन 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देणार अशी घोषणा करुन ती वर्तमानपत्रात प्रसिध्द केली. शासनाने सन 1996 साली एक कायदा केला आणि सन 1995 पूर्वीच्या सर्व झोपडयांना नियमित करण्यात आले. असे असताना आज सन 2009 साल उजाडले आहे. अशा प्रकारच्या घोषणेमुळे मुंबईवरचे लोंढे थांबत नाहीत. अनधिकृत झोपडयांना ऊत आला आहे. या कायद्यामध्ये अनधिकृत झोपडी ज्या विभागात बांधली जाईल त्या विभागातील महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर आणि पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल अशी कायद्यात तरतूद आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 52523.... श्री. अरविंद सावंत ....

माझे दोन प्रश्न आहेत. मुंबई शहरात अनधिकृत झोपड्यांचे बांधकाम झाले नाही काय ? झाले असल्यास महापालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्यावर आणि कोणत्या पोलिसांवर कारवाई केली ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, 1.1.1995 पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आलेले आहे परंतु 1.1.1995 नंतरच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आलेले नाही. तशा प्रकारचा नियम झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास अधिनियम, 1971 मध्ये केला होता. 1.1.1995 नंतरच्या सर्व अनधिकृत झोपड्या व बांधकामाचे निष्कासन करण्याकरिता असा नियम केला होता. तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तींना आणि सहाय्य करणाऱ्या व्यक्तींना 1 ते 3 वर्षे कारावासाची आणि 2500 रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सर्व सक्षम अधिकाऱ्यांना निर्देशित केले होते की, हा कायदा प्रभावी करण्यासाठी या कायद्याखाली हा अपराध दाखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा करण्यात आलेला आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी जो स्पेसिफिक प्रश्न विचारला त्याचे उत्तर आलेले नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, निष्कासनाची जी कारवाई केलेली आहे त्यामध्ये निष्कासित केलेल्या झोपड्यांची संख्या 1 लाख 49 हजार 249 असून 26,944 गुन्हे दखलपात्र केलेले आहेत. डिसेंबर 2004 पासून 2005 पर्यंतच्या कालावधीमध्ये निष्कासनाची मोहीम घेऊन 65,451 झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे. 45 भूखंड अतिक्रमणापासून मुक्त करण्यात आले आहेत. त्याचे एकूण क्षेत्र 288.80 एकर इतके आहे. त्यामध्ये शासनाच्या मालकीचे 36 भूखंड असून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 9 भूखंड 16 एकर क्षेत्र असलेले आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, कारवाई काय केली याबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्याबाबत मी उत्तर देत आहे. शासनाने अशा प्रकारची कारवाई केलेली आहे. सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांच्या बाबतीत सुध्दा मी सांगू इच्छितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 52523....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी आपल्याला गणपत पाटील नगर, दहीसरचे उदाहरण देतो. धारावी आणि सायनच्या पलीकडे बीपीटीकडून तसेच आरसीएफकडून जो रस्ता येतो त्या भागात खाडीमध्ये दररोज 10 हजार झोपड्या बांधल्या जातात. 1996 साली कायदा आला. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला की, मुंबई शहरात अनधिकृत झोपड्या बांधण्याचे थांबले आहे काय ? जर थांबले नसेल तर अधिकारी आणि पोलिसांच्या संदर्भात कायद्यात जी तरतूद आहे त्याप्रमाणे महापालिकेच्या कोणत्या अधिकाऱ्यावर आणि कोणत्या पोलिसांवर कारवाई केली ? गणपत पाटील नगर, दहिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झोपड्या उभारलेल्या आहेत. त्या इ ोपड्या निष्कासित केल्या का ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये अतिक्रमण पूर्णपणे थांबले आहे असा दावा मी कधीही करणार नाही. मुंबईमध्ये आजही अतिक्रमण सुरु आहे आणि अतिक्रमण काढण्याची कारवाई सुध्दा सुरु आहे. सुमारे दीड लाख झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत आणि 27 हजार गुन्हे देखील नोंदविण्यात आले आहेत. अतिक्रमण हटविण्याच्या संदर्भात जे अधिकारी आहेत त्यांनी कामामध्ये कुचराई केली किंवा ज्यांच्या बाबतीत तक्रार आली अशा 24 अधिकारी आणि 9 कर्मचाऱ्यांविरुध्द मुंबई महानगरपालिकेने कारवाई केलेली आहे. त्यामध्ये एका सहाय्यक आयुक्तांचा सुध्दा समावेश आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52523.... श्री.अशोक चव्हाण....

एकूणच कारवाई सुरु आहे. पण मुंबईमध्ये अतिक्रमण थांबलेले आहे असे मी म्हणणार नाही. ही अतिक्रमणे हटविण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) यांच्याकडे हे काम सुपूर्द केलेले आहे. त्यांनी वाढत असलेल्या झोपडया थांबविल्या पाहिजेत आणि अतिक्रमणे वाढणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे. परंतु संपूर्णपणे अतिकमण थांबलेले आहे असा मी दावा करणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 1995 पर्यंतच्या झोपडया नियमित करण्यासाठी 1996 मध्ये कायदा केला. त्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंबंधी स्टेटमेंट केले होते. त्यामुळे संभ्रम निर्माण झाला होता. शासन नेमके कोणत्या वर्षापर्यंतच्या झोपडया नियमित करणार आहे याबाबत सभागृहाला माहिती मिळाली पाहिजे. 1995 की 2000 पर्यंतच्या झोपडया नियमित केल्या जातील ते सांगावे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाष्यात विरोधाभास दिसत आहे. त्यामुळे नेमके वर्ष सांगण्यात यावे.

श्री.अशोक चव्हाण : माझ्या वक्तव्यामध्ये कोठेही विरोधाभास नाही. सध्याच्या कायद्यानुसार 1995 पर्यंतच्या झोपडया नियमित करण्याची किंवा त्यांना संरक्षण देण्याची शासनाची भूमिका आहे. शासनाच्या जाहिरनाम्यामध्ये 1995 ते 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्याची भूमिका कमिट केलेली आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी कालच विशेष उल्लेखाद्वारे एक प्रश्न उपस्थित केला होता. मनोरा आमदार निवासाच्या पाठीमागे समुद्र किनारा असून तेथे जेसीबी लावून रातोरात झोपडया निर्माण करण्याचे काम आजही सुरु आहे. ते काम थांबविण्यात येईल काय आणि अतिक्रमण हटविले जाईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, या स्पेसिपिक केसबाबतची माहिती घ्यावी लागेल आणि ते जर बेकायदेशीररित्या अतिक्रमण होत असेल तर ते थांबविण्यात येईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : अनधिकृत झोपडया तोडण्याची जबाबदारी महानगरपालिकांची आहे हे मला मान्य आहे. परंतु ही अतिक्रमणे पोलीस व महानगरपालिकेच्या पथकाने दूर करावयाची असतात. परंतु पोलिसांना अनेक कामे असतात. तसेच कारवाईच्या वेळी त्रुटी निदर्शनास येतात. म्हणून अनधिकृत झोपडया पाडण्याच्या कारवाईसाठी मुंबई महानगरपालिकेत विशेष सुरक्षा दल निर्माण करण्यासाठी निधी दिला जाईल काय आणि त्याबाबतची परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय याबाबतची माहिती देण्यात यावी.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे वेगळे पोलीस दल असावे यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने पाठविला तर त्याला निश्चित परवानगी देण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

नवी मुंबईतील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

(३) * ५०३३० श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री सुभाष चव्हाण , श्री.सय्यद जमा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-बेलापूर या रस्त्यासाठी मे.पी.बी.ए.इन्फ्रास्टक्चर लि.या कंत्राटदारास १११ कोटी रुपयांचे दिलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे रस्त्यावर अनेक खड्डे पडलेले आहेत व त्यावरुन येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना अपघात होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे-बेलापूर रस्त्याप्रमाणेच टी.टी.सी.औद्योगिक क्षेत्रातील युनियन कार्बाइडने एच.पी.रस्त्याचे काम तसेच सी-ब्लॉकच्या पश्चिमेकडील रस्त्यांच्या मजबूतीकरणाची कामे सुमार दर्जाची झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामांची आय.आय.टी, पवई, मुंबई येथील तंत्रज्ञामार्फत तपासणी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी शासनाकडे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता : (१) (२), (३) व (४) या कामांची तपासणी आय.आय.टी. पवई येथील तंत्रज्ञांमार्फत करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली आहे. त्याबाबतचा सविस्तर अहवाल नवी मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या परवानगी लेखी उत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. उत्तराच्या शेवटच्या ओळीमध्ये "अहवाल नवी मुंबई महानगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल" याऐवजी "दिनांक ६.६.२००९ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाला आहे" असे वाचण्यात यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नवी मुंबई महानगरपालिकेचे हे रस्ते आहेत. या रस्त्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे अशी तक्रार आहे. या रस्त्यांच्या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. म्हणून या रस्त्यांची आयआयटी, पवई या संस्थेकडून चौकशी केली जाईल काय असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला चुकीचे उत्तर दिले आहे. ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन घेतला आहे. वास्तविक त्यांच्या प्रस्तावाची गरज नाही. म्हणून आमची सरळ मागणी आहे की, आयआयटी, पवई या संस्थेमार्फत या रस्त्यांच्या कामांची चौकशी शासन करणार आहे का ?

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KGS/

ता.प्र.क्र.50330....

श्री.हसन मुश्रीफ : नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत घेण्यात आलेली विविध ठिकाणची रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या तक्रारीबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. सिडको, सा.बां.वि., व्ही.जे.टी.आय. या मानद संस्थांकडून या रस्त्यांच्या कामाचा चाचणी अहवाल मागविला आहे. त्यांनी ही कामे चांगली झाल्याचे म्हटले आहे. त्या कामांचे माझ्याजवळ फोटो आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विनंती करुन सांगतो की, यासंबंधी माझ्या दालनात किंवा आपल्या दालनामध्ये बैठक घेऊन आपले समाधान करण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : ही रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्यासंबंधी नवी मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवकांनी मला पत्रे दिलेली आहेत.तेव्हा आय.आय.टी. पवईकडून या रस्त्यांच्या कामांची चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : आय.आय.टी. पवईकडून चौकशी करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यात मुंबईतील गाई-म्हशींचे तबेले हलविण्याबाबत

(४) * ५२३६० श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील शेकडो गाई-म्हशींचे तबेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तबेले ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील दापचरी येथे स्थलांतरीत करण्याचे शासनाने आदेश जारी केले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई उपनगरातील तबेल्यांचे शासनाच्या आदेशानुसार पूर्णपणे स्थलांतर करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील ६०० मोठे व ५ हजार गाई-म्हशी ठेवण्याएवढी दापचरी जागा उपलब्ध आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ ,श्री.रविशेठ पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) नाही.

(३) तबेले स्थलांतरीत करणे संदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे.

(४) होय.

श्री. अरविंद सावंत : मुंबई उपनगरात शेकडो गाई-म्हशींचे तबेले आहेत. हे तबेले दापचरी येथे स्थलांतरित करण्या विषयी वारंवार मागणी केलेली आहे. प्रश्न भाग (3) ला असे उत्तर दिलेले आहे की तबेले स्थलांतरीत करण्याच्या संदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे. उच्च न्यायालयात तबेल्यांचे मालक गेले आहेत की शासन गेले आहे ? या शेकडो गाई-म्हशींसाठी दापचरीमध्ये जागा उपलब्ध आहे काय, या प्रश्नाला शासनाने "होय" असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा हे तबेले शासन दापचरीला स्थलांतरित करणार आहे काच ?

श्री. हसन मुश्रीफ : शासनाने महाराष्ट्र नागरी क्षेत्रात गुरे पाळणे आणि त्यांची ने आण करणे अधिनियम 76 अन्वये 1 जुलै 2006 रोजी अधिसूचना प्रसिध्दी केली होती. संपूर्ण मुंबई उपनगर जिल्ह्याचे क्षेत्र हे प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते. याचा आधार घेऊन एक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने ही सर्व जनावरे मुंबई महानगर आणि मुंबई उपनगरातून बाहेर काढण्याचे आदेश दिले. त्यानंतर तबेलेवाले उच्च न्यायालयात हजर झाले आणि त्यांनी सांगितले की, मुंबईला ताजे दूध द्यावयाचे असेल तर 140 कि.मी.वरील दापचरी येथून आणणे शक्य नाही. याबाबतीत शासनाचे मत घ्यावे असे उच्च

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

न्यायालयाने सांगितले. शासनाकडील आरे कॉलनीमध्ये 16 हजार जनावरे आहेत आणि 36 हजार जनावरे मुंबईच्या इतर विभागामध्ये आहेत. मुंबई उच्च न्यायालयामध्ये शासन लवकरच आपले मत मांडणार आहे. त्यासंदर्भात शासनाचे तीन प्रस्ताव आहेत. एक म्हणजे संपूर्ण जनावरे आरे कॉलनी येथे नेणे, दुसरा प्रस्ताव संपूर्ण जनावरे दापचरीला नेणे आणि 16 हजार जनावरे आरे कॉलनीमध्ये ठेवून 36 हजार जनावरे दापचरीला नेणे असा तिसरा प्रस्ताव आहे. या प्रमाणे शासन उच्च न्यायालयामध्ये जाऊन कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : मंत्री महोदयांनी अतिशय धोकादायक उत्तर दिलेले आहे. मंत्री महोदयांनी तीन प्रर्याय दिले. त्यामध्ये 36 हजार जनावरे आरे कॉलनीला न्यावयाची किंवा दापचरीला न्यावयाची असा पर्याय आहे. तेथील सगळी जमीन बिल्डरांना हवी आहे. दापचरी येथून मुंबईसाठी ताजे दूध आणणे शक्य नाही असे तबेलेवाल्यांनी न्यायालयामध्ये सांगितलेले आहे. तेव्हा 36 हजार जनावरे आरे कॉलनीमध्ये स्थलांतरित करण्यात येणार आहेत काय ? डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये तेथे अनेक रिझर्व्हेशन्स आहेत. परंतु नवीन डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये ती जागा पब्लिक हौसिंगसाठी करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : आरे कॉलनी हा नो डेव्हलपमेंट झोन आहे. जनावरे शहराच्या बाहेर नेण्याची शासनाची भूमिका होती.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KGS/ प्रथम श्री.शिगम 12:00

ता.प्र.क्र.52360.....

श्री. हसन मुश्रीफ...

मुंबई शहर इतके वाढले की, यासाठी शासनाने दापचरी येथे जनावरांना शिफ्ट करण्यासाठी जागा घेतली. परंतु ही विशिष्ट परिस्थिती बघून त्यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला नाही. सध्या ही बाब न्यायप्रविष्ट आहे. ही जागा मोकळी करुन खाजगी विकासकांना देण्याचा शासनाचा कोणत्याही प्रकारचा प्रयत्न नाही. जनावरांसाठी, तबेलेवाल्यासाठी, त्या अनुषंगिक कायद्याची अंमलबजावणी यासाठी सुस्पष्ट धोरण शासन निश्चितपणे आखेल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यातील इ. १० वी व १२ वी च्या परीक्षेसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव

(५) * ५११३६ श्री.राजन तेली , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी इयत्ता १० वी व १२ च्या वी परीक्षेसाठी रत्नागिरी येथे मुंबई मंडळाप्रमाणे स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर काय निर्णय घेण्यात आला आहे,

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्यानुसार पुढे काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : (१), (२) व (३) कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे, मात्र सदर प्रस्तावास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी लेखी स्वरुपात उत्तर दिले आहे. त्यात त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की, " कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे, मात्र सदर प्रस्तावास अद्याप मान्यता प्राप्त झालेली नाही. सभापती महोदय, माझ्याकडे डिसेंबर महिन्यात झालेल्या अधिवेशनाचे इतिवृत्त आहे. त्यावेळी या प्रश्नाच्या बाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, कोकण विभागासाठी स्ततंत्र शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. सदरहू शिक्षण मंडळ रत्नागिरी, सिंधुदूर्ग आणि रायगड या तीन जिल्हयासाठी असून त्याचे कार्यालय रत्नागिरी येथे सुरु होईल. पुढे त्यांनी सांगितले की, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, मंडळ केले जाईल आणि मार्चच्या परीक्षा या मंडळाच्या वतीने घेतल्या जातील. याबाबतीत निश्चित खरे उत्तर काय आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, राज्य सरकारने अशा प्रकारचे विभागीय शिक्षण मंडळ स्थापन करुन रत्नागिरीला त्याचे मुख्यालय सुरु करण्यासंबंधी

३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

कार्यवाही सुरु केली होती. या संदर्भात राज्य सरकारची पूर्ण तयारी झालेली आहे. सदरहू शिक्षण मंडळाच्या कार्यालयासाठी एम.आय.डी.सी.ने जागा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे. या वर्षी शासन त्या विभागात शिक्षण मंडळ सुरु करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. २००९-१० या पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता १० आणि १२ वी च्या परीक्षा या शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेतल्या जातील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांकडून जी उत्तरे दिली जात आहेत, त्यांच्या उत्तरावरील आमचा विश्वास हळूहळू उडत चालला आहे. माननीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे आता शिक्षण मंत्री झाले आहेत. पूर्वी माननीय शिक्षण मत्री प्रा.वसंत पुरके होते. मी सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, रत्नागिरी येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीनंतर शासनाकडून घोषणा झाली की, आम्ही कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करु. या विषयाच्या अनुषंगाने सभागृहात ज्या ज्या वेळी प्रश्न उपस्थित झाले त्या त्या वेळी कोकण विभागासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करु अशा प्रकारची अनेक वेळा उत्तरे माननीय मंत्र्यांकडून दिली गेली आहेत. सध्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेचा निकाल लागलेला आहे. काही दिवसात इयत्ता १० वी चा परीक्षेचा निकाल लागणार आहे. यासंबंधी जर शासनाने ताबडतोबीने निर्णय घेतला नाही तर पावसामुळे कोकणातील विद्यार्थ्यांना मुंबईत येणे शक्य होणार नाही तसेच या अनुषंगाने अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागणार आहे. तेथील अडचणींचा विचार करुन ती मागणी शासनाने मान्य केली आहे. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास शासनाकडून गेल्या पाच वर्षापासून टोलवाटोलवी चालली आहे. माननीय मंत्र्यांनी सभागृहात दिलेल्या उत्तरावर विश्वासच बसत नाही अशी स्थिती सध्या निर्माण झाली आहे. म्हणून २००९-१० या वर्षाच्या इयत्ता १० आणि इयत्ता १२ वी च्या परीक्षा कोकणातील नवीन शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेतल्या जातील असे घोषित करुन त्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

४...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, राज्य सरकारकडून या कामी विलंब झालेले आहे हे मी मान्य करतो. परंतु या शिक्षण मंडळाला रायगड जिल्हा जोडल्यामुळे काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. आमच्याकडे रायगड जिल्हयाचे एक निवेदन प्राप्त झाले आहे की, रायगड जिल्हा मुंबई शहराला जोडावा.

श्री. भास्कर जाधव : माननीय मंत्र्यांच्या उत्तराला माझी हरकत आहे..

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्ण उत्तर प्रथम ऐकून घ्यावे आणि त्यानंतर त्यांनी माझ्या उत्तराला हरकत घ्यावी. सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत, तशाच सरकारच्या भावना आहेत. २००९-१० या कालावधीत जे विद्यार्थी इयत्ता ९ वी आणि इयत्ता १० मध्ये आहेत, त्यांच्या परीक्षा पुढील वर्षाच्या मार्च,एप्रिल महिन्यांच्या कालावधीत होणा-या परीक्षा नव्याने होऊ घातलेल्या कोकण शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घेण्यात येतील.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : रत्नागिरी,सिंधुदूर्ग आणि रायगड या तीन जिल्हयासाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ निर्माण करण्याचा निर्णय झालेला आहे व त्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाकडून घोषण देखील झाली आहे. या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, रायगडच्या काही लोकांनी हरकत घेतली आहे. तिन्ही जिल्हयासाठी हे शिक्षण मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासबंधीचा निर्णय शासनाने सभागृहात जाहीर केलेला आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहामध्ये जाहीर झालेले आहे. प्रश्न असा आहे की, राज्याच्या अन्य सर्व विभागांमध्ये विभागीय मंडळ स्थापन झाल्यानंतर कोकणासाठी असूया का आहे? हे मंडळ स्थापन करण्यामध्ये काही अडचणी असतील तर सभागृहाला तसे सांगावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, यामध्ये संपूर्ण पद निर्मितीपासून सगळ्यांच बाबींची पूर्तता पूर्ण होत आहे. म्हणून पुढील तीन महिन्यात या मंडळाची कार्यवाही सुरु करुन या वर्षीच्या परीक्षा त्याठिकाणी कोकण विभागीय मंडळाच्या माध्यमातून घेतल्या जातील हे स्पष्टपणे सभागृहाला आश्वासित करु इच्छितो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही जी चर्चा चालू आहे ती पूर्णपणे निरर्थक आहे. तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री आणि रत्नागिरी जिल्हयाचे पालकमंत्री व सध्याचे नगरविकास राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ आज सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी सभागृहात स्पष्टपणे सांगितले होते की, मंडळाला मान्यता मिळाली असून एमआयडीसीकडून जागा मिळत नाही म्हणून श्री.रमेश शहा या खाजगी व्यक्तीकडून जागा भाड्याने घेत आहोत. 2008-09 च्या परीक्षा कोणत्याही परिस्थितीत कोकण विभागीय मंडळामार्फत घेऊ असे स्पष्टपणे सांगितले होते. आज मंत्रीमहोदय सांगतात की, शासनाच्या विचाराधीन आहे. शासनाचे उद्योगमंत्री श्री.नारायणराव राणे यांनी स्वत: घोषणा केले की, उद्योग खाते माझ्याकडे असून एमआयडीसी उद्योग विभागाच्या अखत्यारित आहे. येत्या 15 दिवसात कोकण विभागीय परीक्षा मंडळाला जागा उपलब्ध करुन देऊ. त्यांच्याशी शिक्षण विभागाने संपर्क साधून येत्या 15 दिवसात जागा उपलब्ध करुन देऊन 2009-10 या वर्षाच्या परीक्षा या मंडळामार्फत घेतल्या जातील असे स्पष्टपणे मंत्रीमहोदय सांगतील काय?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : पुष्कळ स्पष्टता आली आहे. विलंब झाल्याचे मान्य केले आहे. महाराष्ट्र एमआयडीसीची जागा उद्योगमंत्र्यांनी देण्याचे मान्य केले असून तसे पत्र प्राप्त झाले आहे. जागेचा प्रश्न सुटला आहे. मंडळाचे फॉर्मेशन करण्यासाठी दोन-तीन महिने लागतील. या वर्षीच्या 2009-10 च्या पुढील वर्षी घेण्यात येणाऱ्या परीक्षा या मंडळाच्या माध्यमातून घेतल्या जातील यापेक्षा स्पष्ट शासनाची काय भूमिका असली पाहिजे.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.51136.....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ऑक्टोबर, 2009 च्या परीक्षा या मंडळामार्फत घेतल्या जातील काय? सन्माननीय श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना काँग्रेस पक्षाच्या एका मोठ्या मेळाव्यामध्ये त्यांनी ही घोषणा केली होती, ते कोणते वर्ष होते हे मंत्रीमहोदयांनी सांगावे. रत्नागिरी येथे विभागीय परीक्षा मंडळ व्हावे ही घोषणा कोणत्या वर्षी झाली? हे मंडळ स्थापन होण्यासाठी किती दिवस लागतील?

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी व अकरावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी मुद्रित स्वरुपात तसेच अकरावी यादी अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तराच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

प्रा.बी.टी. देशमुख (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा बारावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : लोकलेखा समितीचा बारावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका या विषयावरील तदर्थ समितीचा अहवाल सादर करणे

श्री.राधाकृष्ण विखे पाटील (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "दहावीच्या अभ्यासक्रमातील मराठी विषयाच्या पुस्तकात आढळून आलेल्या चुका" या विषयावरील तदर्थ समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : तदर्थ समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

एन.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री. किरण पावसकर, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत, यांनी "ओशिवरा परिसरातील बेहरामबाग सर्व्हे नं. 41 आणि सिटी सर्वे नं. 651 मध्ये इसीस-अस्लाम लष्करिया या बिल्डरांने एसआरए योजनेअंतर्गत बनावट रेकॉर्डद्वारे 300 रहिवाशी दाखविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री. रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "सहकारी पतसंस्थांकडून लेखापरिक्षण शुल्क म्हणून नागरी सहकारी बँकांच्या शुल्कापेक्षा दुप्पट दराने वसूली करण्यात येणे, तसेच पतसंस्थांची थकबाकी पदाधिकाऱ्यांच्या खोटया तक्रारी, मालमत्ता हस्तांतरण, शुल्क नोंदणी व फी माफी इत्यादीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, रामनाथ मोते, यांनी " सांगली जिल्हापरिषदेने मौजे आरेवाडी येथील बिरोबा देवस्थान हे प्रादेशिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणे, व त्यासाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये 375 लक्ष रुपये रक्कमेचे अंदाजपत्रक सादर करुनही अद्याप त्यास मंजुरी न मिळणेबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, अशोक मानकर, संजय केळकर, रामनाथ मोते, यांनी "एनसीईआरटी अभ्यासक्रम दरवर्षी वादग्रस्त ठरणे, यावर्षीच्या इयत्ता 7 वी च्या इतिहासाच्या पुस्तकात हमारे अतीत-2 या प्रकरणात भारतावर आक्रमण करणाऱ्या मुस्लीम राज्यांची गौरवास्पद माहिती देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "राज्यात औषधांवर जकात माफ करण्याविषयी मुख्यमंत्र्यांनी तात्काळ आदेश देणे, त्यानुसार नगरविकास विभागाने जकात माफीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सूचना करुनही त्या संदर्भात महापालिकांनी कारवाई न करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील यांनी "पोलादपूर येथील जवान राकेश तात्याबा सावंत हा जम्मू-काश्मीरमध्ये शहीद होणे, त्याच्या अंत्यसंस्कारासाठी व शासकीय मानवंदना देण्यासाठी पोलीस दल वेळेवर न पोहोचल्याने प्रशासनाचा हलगर्जीपणा निदर्शनास येणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. व्ही. यू. डायगव्हाणे, दिलीपराव सोनावणे यांनी "राज्यातील खाजगी शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या एक तारखेस वेतन अदा करावे असे शासन निर्णय असतांना देखील नागपूर विभागातील सर्व शाळांना वेतन अति विलंबाने मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, यांनी केंद्र शासनाने इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजनेनुसार शालांत परिक्षेत्तर शिष्यवृत्ती योजना सन 1998-99 पासून लागू केली असून राज्याने देखील सदर योजना सन 2003-04 या शैक्षणिक वर्षापासून लागू केली असून सदर विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती निलम गोऱ्हे, "दादर येथे एका 74 वर्षीय वृध्द महिलेचा चॉपरने वार करुन केलेला खून, तसेच अंधेरी येथे देखील वृध्द पती-पत्नीची हत्या करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "अहमदनगर जवळील नेवासा फाटयाजवळ दि. 24 मे, 2009 रोजी एका जोडप्याला लुटून त्यांच्याकडून सुमारे चार लाख किमतीचे सोन्याचे दागिने लुटणे, पोलिसांनी आरोपीकडून हस्तगत केलेले दागिने जोडप्याने परत मागितले असता ते देण्यास होत असलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील तुळस प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या युवतीशी अश्लील संभाषण करणाऱ्या प्रभारी वैद्यकीय अधिकाऱ्याला गावातील लोकांनी हुसकावून लावणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "नागपूर सार्वजनिक बांधकाम विभागात झालेला प्रचंड भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नियम 93 ची निवेदने

पृ. शी. : रत्नागिरी जिल्हा ता.चिपळूण येथील दहिवली खूर्द या गावातील शासकीय रास्त धान्य दुकानांमधील तांदळामध्ये खडे, कचरा, धागे व लेंडया आढळून येणे

मु. शी. : रत्नागिरी जिल्हा ता.चिपळूण येथील दहिवली खूर्द या गावातील शासकीय रास्त धान्य दुकानांमधील तांदळामध्ये खडे, कचरा, धागे व लेंडया आढळून येणे याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते,संजय केळकर व परशुराम उपरकर वि. प. स. दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री सर्वश्री जगदीश गुप्ता, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर व परशुराम उपरकर यांनी "रत्नागिरी जिल्हा ता.चिपळूण येथील दहिवली खूर्द या गावातील शासकीय रास्त धान्य दुकानांमधील तांदळामध्ये खडे, कचरा, धागे व लेंडया आढळून येणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनातील उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी विनंती केली आहे की, निवेदन क्रमांक 2,4,7 व 8 ही चारही निवेदन प्रथम घेतली तर त्यांना खालच्या सभागृहात जाणे सोपे होईल. त्यामुळे निवेदन क्रमांक 2,4,7 व 8 प्रथम घेण्यात येतील व त्यानंतर बाकीची निवेदने घेण्यात येतील.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नगर पालिकेकडून विकास कामांना मंजुरी देण्याचे अधिकार काढून घेतल्याबाबत

मु. शी. नगर पालिकेकडून विकास कामांना मंजुरी देण्याचे अधिकार काढून घेतल्याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी नगर पालिकेकडून विकास कामांना मंजूरी देण्याचे अधिकार काढून घेणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन 1991 पासून आपल्याकडे सीआरझेड कायदा लागू झालेला आहे. सन 1991 ते 2009 पर्यंत अलिबाग नगरपालिकेच्या बांधकामाच्या संदर्भातील अधिकार हे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच इतर अधिका-यांना होते. परंतु गेल्या दोन महिन्यापूर्वी अलिबसग येथील इंजिनिअरने राजिनामा देऊन तो निघून गेला. त्यामुळे हे प्रस्ताव टाऊन प्लॅनिंगकडे पाठविले गेले व टाऊन प्लॅनिंगने हे प्रस्ताव कोकण भवनच्या डेप्युटी डायरेक्टरांकडे पाठविले आणि डेप्युटी डायरेक्टरने असे पत्र पाठविले की, बांधकामाच्या संदर्भातील सर्व प्रस्ताव डेप्युटी डायरेक्टरकडे पाठविले पाहिजेत. संपूर्ण अलिबाग शहर तसेच कोकणातील नगरपालिका हया 500 कि.मी.किनार पट्टीच्या आतमध्येच आहेत. विशेषत: कोळीवाडे समुद्रालगत आहेत. 1991 ते 2009 पर्यंत नगरपालिकेला बांधकाम करण्याच्या संदर्भातील जी परवानगी होती ती परवानगी पूर्ववत करण्याच्या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 19.2.1991 च्या पर्यावरण विभागाच्या अधिसूचनेप्रमाणे 5 कोटीपेक्षा कमी गुंतवणकीचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार स्थानिक प्राधिकरणाला होते. 5 कोटी रुपयांच्यावरील गुंतवणुकीचे प्रस्ताव पर्यावरण विभागाच्या अधिसूचनेप्रमाणे ते केंद्राकडे जात होते. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्यासंदर्भात मी स्वत: अलिबाग येथे जाऊन परिस्थिती बघितलेली आहे व त्यामध्ये मला या नवीन नियमामुळे अलिबाग शहराचा विकास खुंटलेला असल्याचे आढळून आलेले आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी जी विनंती केलेली आहे त्यासंदर्भात पर्यावरण विभागाला शासन तशा प्रकारची विनंती करेल व स्थानिक प्राधिकरणाला पूर्ववत अधिकार देण्याच्या संदर्भात अधिकार देण्याचे पाहिले जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हा विषय केवळ अलिबाग शहरापुरताच मर्यादित आहे असे नसून समुद्र किनारपट्टीवर असलेले सर्व तालुके आणि त्या ठिकाणच्या असलेल्या नगरपालिकांच्या संदर्भात हा निर्णय लागू होईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागरी निवारा अभियानांअंतर्गत शासकीय जमीन मिळणे

मु. शी. : नागरी निवारा अभियानांअंतर्गत शासकीय जमीन मिळणे या बाबत याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र. पाटील यांनी "नागरी निवारा अभियानांअंतर्गत शासकीय जमीन मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मुंबईतील सामान्य माणसाला घर मिळावे यासाठी श्रीमती मृणालताई गोरे या अनेक दिवसापासून आंदोलन करीत आहेत. त्यांनी स्वत: गोरेगाव येथे एक नागरी प्रकल्प यशस्वी करुन दाखविला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांनी यासंदर्भातील निर्णय घेतला व त्यामुळे सहा हजार लोकांच्या सोसायटया उभ्या राहू शकल्या. आता आपण युएलसी ॲक्ट रद्द केलेला आहे. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, युएलसी ॲक्ट नुसार शासनाच्या ताब्यात किती जमीन आलेली आहे? त्यातील किती जमीन घरांसाठी उपलब्ध आहे? आणि नागरी निवारा अभियानाअंतर्गत ज्या 3900 सोसायटयांनी अर्ज केलेला आहे त्या अर्जांच्या संदर्भातील नेमकी स्थिती काय आहे?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जनता दल (सेक्युलर) मुंबई, यांच्या वतीने नागरी निवारा अभियानातंर्गत सर्व सामान्य आणि गरजू लोकांसाठी घरे बांधण्यासाठी जमीन मिळण्यासबंधीचा एक प्रस्ताव शासनाकडे दाखल करण्यात आला होता. यु.एल.सी.कायद्याअंतर्गत जी जमीन वाटप करावयाची आहे त्यासबंधी दिनांक 3.12.2008 रोजी शासनाने सुधारित धोरण जाहीर केले असून त्यानुसार 4000 स्केअर मिटर्सपेक्षा मोठया जमिनीचे वाटप शासनाच्या एमएमआरडीए, कॉर्पोरेशन आणि म्हाडा यांना प्राधान्याने करण्याचे ठरविण्यात आले असून 4000 स्केअर मिटर्सपेक्षा कमी जमीन खाजगी गृह निर्माण संस्थांना विक्री करावी किंवा रेडी रेकनरप्रमाणे वाटप करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे.श्रीमती मृणाल गोरे यांनी जो प्रस्ताव दिला आहे तो जिल्हा तांत्रिक समितीकडे पाठविण्यात आला आहे.

श्री.कपिल पाटील : आपल्याकडे किती जमीन उपलब्ध आहे आणि किती घरासाठी ही जमीन उपलब्ध आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : 1700 हेक्टर्स जमीन शासनाच्या ताब्यात आहे त्यापैकी बरीचशी जमीन विभाजनासाठी वाटप करण्यात आलेली आहे .

श्री.कपिल पाटील : शासनाकडे किती जमीन उपलब्ध आहे ? तिचे वाटप केव्हा होणार आहे?

श्री.हसन मुश्रीफ : ज्या जमिनीचे वाटप करण्याचे शिल्लक राहिलेले आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की,जिल्हा तांत्रिक समितीने मान्य केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : एमएमआरडीएने विविध शासकीय महामंडळाकडे गुंतविलेल्या रकमेवरील व्याज व मुद्दल त्यांना परत न मिळणे

मु.शी : एमएमआरडीएने विविध शासकीय महामंडळाकडे गुंतविलेल्या रकमेवरील व्याज व मुद्दल त्यांना परत न मिळणे याबाबत सर्वश्री.संजय केळकर, मधुकर चव्हाण,विनोद तावडे,वि.प.स यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "एमएमआरडीएने विविध शासकीय महामंडळाकडे गुंतविलेल्या रकमेवरील व्याज व मुद्दल त्यांना परत न मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्रीं.संजय केळकर : सभापती महोदय, एमएमआरडीए मुंबई आणि ठाणे जिल्हयात विकासाची कामे करीत असून सुरुवातीला फक्त मुंबईसाठी त्यांच्याकडून विकासाच्या कामासाठी खर्च केला जात होता त्यानंतर ठाणे जिल्हयासाठी निधी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. एमएमआरडीएने सुमारे 1513.42 कोटी रुपये शासनाच्या विविध संस्थांकडे ठेव म्हणून ठेवली असून कोणकोणत्या संस्थांकडे या प्राधिकरणाने ठेव ठेवली होती , किती वर्षे ही ठेव त्यांच्याकडे होती ? त्याचप्रमाणे या संस्थेकडून 813 कोटी रुपयांची रक्कम परत आलेली आहे बाकीची रक्कम परत आलेली नाही. शासनाच्या मार्फत एमएमआरडीएच्या माध्यमातून व्याज आणि मुद्दल परत करण्यासंबंधी या विविध संस्थांना वारंवार पत्रे पाठविण्यात येतात तरीसुध्दा व्याज आणि मुद्दल परत दिले जात नाही. तेव्हा ही रक्कम विविध शांसकीय संस्थांना देण्या ऐवजी ज्या भागात विकास करावयाचा आहे त्या कामासाठी या निधीचा उपयोग करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्य सरकारचे वित्त विभाग, राज्य सरकारचे गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र कॉटन ग्रोवर्स मार्केटींग फेडरेशन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन, महाराष्ट्र फिल्म स्टेज ॲन्ड कल्चरल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन, महाराष्ट्र कृष्णा व्हॅली डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशन इत्यादी ठिकाणी 810 कोटी रुपयांची ठेव ठेवण्यात आली होती त्यावरील व्याजाची रक्कम 610 कोटी रुपयांची आहे आणि एकूण आऊटस्टॅन्डीग 1410 कोटी रुपयांचे आहे. एमएमआरडीएच्या ठेवी 1996,1997,1998,1999 या युतीच्या काळात ठेवण्यात आल्या होत्या. त्याचे रिन्युवल करण्याचे काम सुरु आहे. एमएमआरडीएला पैशाची आवश्यकता असल्यामुळे मुदत संपल्यानंतर हे पैसे संबंधित संस्थांनी त्यांना परत करावेत अशा सूचना सांबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. ज्यांची ठेवीची मुदत संपली होती त्यांना ही मुदत पुन्हा वाढवून देण्यात आली होती. यासंदर्भात सातत्याने पत्रव्यवहार करण्यात येत आहे. एक वर्षाच्या अल्पावधीसाठी मुदत वाढ देण्यात आली होती प्रत्येक वर्षी त्याच्याकडून पैसे न आल्यामुळे मुदत वाढवून देण्यात येत आहे.

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : युती सरकारच्या काळात विविध राज्य शासकीय महामंडळाकडे या ठेवी ठेवण्यात आल्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले .त्या त्या वर्षी या महामंडळाना आर्थिक अडचण आल्यामुळे हे पैसे त्यांना देण्यात आले होते .2000 सालापासून 2009 सालापर्यत हे पैसे परत करण्यामध्ये त्यांना काय अडचण आहे ? स्टेट कॉटन मार्केटींग फेडरेशनला मध्यंतरी फायदा झाला होता तेव्हा त्यांना पैसे परत करण्यामध्ये काय अडचण आहे. कृष्ण खोरे विकास महामंडळाला बजेटमधून पैसे दिले जातात तेव्हा त्यांना पैसे परत करण्यास काय अडचण आहे. हे पैसे त्यांच्याकडून परत घेण्यासंबंधी शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एमएमआरडीएला सुध्दा आर्थिक मर्यादा आलेल्या असल्यामुळे हे पैसे तातडीने वसूल मकरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.स्रफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाच्या बाबतीत गुणवत्तेवर उत्तर देऊन यामध्ये राजकारण आणले. युतीच्या काळात दिले असे म्हणत आहेत तर मग आपण नंतर रिन्यू कसे केले?

श्री. हसन मुश्रीफ : फक्त एकच डिपॉझीट रिन्यू केले आहे.

श्री. विनोद तावडे : समजा युतीच्या काळात झाल्यानंतर आपण रिनिव्ह केले नाही असे झाले काय? आपण कुणाच्या दादागिरीवर हे रिन्यू केले हे आपल्याला माहीत आहे. तो संपूर्ण पैसा कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे गेला हे आपणास माहीत आहे. ज्यावेळी आम्ही एमएमआरडीएचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रत्नाकर गायकवाड यांना भेटलो त्यावेळी त्यांनी ठाणे भागातील पाच प्रकल्पांसाठी आमच्याकडे पैसे नाहीत, त्यामुळे आम्ही हे प्रकल्प करु शकत नाही असे सांगितले. याचा अर्थ मंत्रिमहोदयांनी याठिकाणी दिलेले उत्तर चुकीचे आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आपण किती दिवसात आमचे पैसे आम्हाला परत करणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सांगण्याचा मुद्दा असा होता की, युतीच्या काळात जरी केले असले तरी हे शासनाचे महामंडळ आहे. त्यांनी ही प्रथा सुरु केल्यामुळे आपण एक वर्षाकरिता रिन्यू केले आहे. परंतु आता एमएमआरडीए कडे मर्यादित निधी असल्यामुळे आम्ही ताबडतोबीने वसूल करण्यासाठी प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे भाडे तत्वावर घरे बांधण्यासबंधी दिलेली जाहिरात

मु. शी. : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे भाडे तत्वावर घरे बांधण्यासबंधी दिलेली जाहिरात याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे भाडे तत्वावर घरे बांधण्यासबंधी दिलेली जाहिरात " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुंबईमध्ये लक्षावधी मराठी भाषिक लोक जुन्या भाडयाच्या घरामध्ये खितपत जगत असतांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने 5 लाख घरे बांधली जातील असे जाहीर करुन त्याबाबतची जाहिरात दिली. विशेषत: प्राधिकरणाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रत्नाकर गायकवाड व त्यांचे पीआरओ श्री. कवठेकर यांची घेण्यात आलेली मुलाखत अनेक वाहिन्यांवर मी स्वत: पाहिली. त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, 15 वर्षे वास्तव्य असलेल्यांनाच भाडे तत्वावर हे घर मिळेल ही अट शिथिल केली आहे. तसेच, त्यांनी असेही म्हटले की, ही घरे देऊन उरलेली घरे भूमिपुत्रांना देणार आहोत. त्यामुळे प्राधिकरणाने ही जाहिरात दिल्यानंतर शिवसेनेने त्याला तीव्र विरोध केला. माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांनी एकही वीट रचून आम्ही परप्रांतियांना ही घरे मिळवू देणार नाही असे सांगितले. प्रश्न असा आहे की, आपण आपल्या जाहिरातीमधील 15 वर्षाची अट शिथिल केली असे म्हणत आहात, आणि दुसऱ्या बाजूला ही अट ठेवली आहे असे म्हणत आहात. याबाबत चौकशी करुन ती जाहिरात आपण रद्द करण्याबाबत घोषणा करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एमएमआरडीएने अतिशय चांगली योजना तयार केली आहे. मुंबईत येणारे लोंढे हे झोपडपट्टीमध्ये जाऊ नयेत म्हणून त्यांना पक्की घरे द्यावीत या हेतूने एक वर्षात 1 लाख या प्रमाणे 5 वर्षात 5 लाख घरे बांधण्याची महत्वाकांक्षी योजना तयार केली आहे. त्यामध्ये अशी अट घातली आहे की, हे घर भाडे तत्वावर असून ते 800 ते 1500 रुपये भाडयाने मिळेल. नवरा व बायको नोकरी करीत असलेल्या अशा कुटुंबाचे मासिक उत्पन्न 5 हजारपेक्षा कमी असले पाहिजे. आणि ते मुंबई महानगर प्रदेशामध्ये नोकरी करीत असले पाहिजेत. यानंतर तिसरी अट अशी होती की, ज्यांच्याकडे 15 वर्षे वास्तव्य असलेले डोमिसाईल सर्टिफिकेट असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे 15 वर्षापासून राहणा-यांनाच घर मिळाले पाहिजे अशाप्रकारची मागणी अनेक लोकांकडून करण्यात आल्यामुळे आपण ती अट शिथिल केली होती. आता आपण 15 वर्षे राहणाऱ्यांनाच प्राधान्य देणार आहोत, अशा लोकांनाच भाडयाने घर मिळणार आहे. त्यामुळे भूमिपुत्राची काळजी या लोकशाही आघाडीच्या सरकारला असल्यामुळे आपण जाहिरातीत ताबडतोब बदल केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला असे सांगितले की, मुंबईमध्ये येणारे लोंढे हे झोपडपट्टीमध्ये जावू नयेत म्हणून ही योजना तयार केली आहे. हा विरोधाभास आहे. आणि आता आपण 15 वर्षाचे वास्तव्य असणाऱ्यांना हे घर देणार असल्याचे सांगत आहात. यामध्ये आपली नेमकी भूमिका स्पष्ट होत नाही. हे घर आपण नेमके कुणाला देणार आहात? दुसरा प्रश्न असा की, श्री. रत्नाकर गायकवाड व श्री. कवठेकर यांनी केलेले स्टेटमेंट अत्यंत बेजबाबदारपणाचे होते असे आम्हा सर्वांचे मत आहे.त्यामुळे आपण ते स्टेटमेंट तपासून त्यांच्यावर कारवाई करणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सांगितलेले आहे की, केवळ परप्रांतियांचे लोंढे मुंबईत येतात असे नाही तर महाराष्ट्राच्या विविध भागातून देखील अनेक बेरोजगार मुंबईमध्ये येतात, असे लोक झोपडपट्टयांमध्ये राहू नयेत, झोपडया वाढू नयेत, त्या माध्यमातून अतिक्रमण वाढू नये म्हणून अशा प्रकारे भाडयाने घरे देण्याच्या बाबतीत योजना आखण्यात आलेली आहे आणि ती फक्त आता भूमीपूत्रांनांच लागू केलेली आहे. तसेच आता याठिकाणी 15 वर्षाच्या वास्तव्याचे डोमिसाईल सर्टीफीकेट असणाऱ्या व्यक्ती भाडयाने घर घेण्यासाठी पात्र असतील. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी एम.एम.आर.डी.ए.चे आयुक्त श्री.रत्नाकर गायकवाड आणि तेथील एक अधिकारी श्री.कवठेकर यांनी जे वक्तव्य केलेले आहे, त्याचा उल्लेख केला. त्याबाबतीत सांगावयाचे तर ते तपासून पाहिले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, "आम्ही ही बाब तपासून पाहू." परंतु माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत आठ दिवसात, पंधरा दिवसात तपासणी करु अशी निश्चित कालमर्यादा सांगावयास पाहिजे. मी नम्रपणे सांगू इच्छिते की, आश्वासनांच्या बाबतीत निश्चित स्वरुपाची कालमर्यादा देण्यात येत नाही. मागच्या वेळेस देखील ऊस तोड कामगारांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला असताना असेच आश्वासन देण्यात आले होते. परंतु माननीय मंत्री महोदयांचा विभाग बदलण्यात आला. त्यामुळे तीन वर्षे तो प्रश्न तसाच खितपत पडलेला आहे. त्यावेळी देखील माननीय मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ यांनीच उत्तर दिले होते. असाच प्रकार कायम अनुदानाच्या बाबतीत झाला आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, या बाबतीत आठ दिवसामध्ये चौकशी करुन, कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, श्री.रत्नाकगर गायकवाड व श्री.कवठेकर यांच्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला. याबाबत सांगावयाचे तर एम.एम.आर.डी.ए.चे आयुक्त श्री.रत्नाकर गायकवाड हे मराठी भाषिक आहेत. ते मला भेटले असून, त्यांनी असे सांगितले आहे की, आमच्या ज्या अटी आहेत, त्यामध्ये त्याला प्राधान्य होते आणि आम्ही तसेच वर्तमानपत्रामध्ये आणि टी.व्ही.सांगण्यात आले आहे.आम्ही भूमीपूत्रांना प्राधान्य देणार नाही असे म्हटलेले नाही. त्यानंतर याबाबतीत जी अट होती, ती काढून टाकलेली आहे.

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असणे

मु. शी. : जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असणे याबाबत सर्वश्री.रामनाथ मोते, संजय केळकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,भगवान साळुंखे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री .रामनाथ मोते,संजय केळकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,भगवान साळुंखे यांनी "जिल्हा परिष्दांच्या प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी राज्य शासनाने मागील वर्षापासून म्हणजे 2008-2009 पासून प्राथमिक शिक्षकांच्या भरतीसाठी केंद्रीय निवड परीक्षा पध्दत राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. आजही 10 ते 12 हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत, त्या अनुषंगाने मी हा विषय उपस्थित केलेला आहे. आपण केंद्रीय पूर्वपरीक्षा घेण्याचा निर्णय का घेतला ? तर याबाबत शासनाने निवेदनामध्ये म्हटलेले आहे की,"आपण केंद्रीय निवड परीक्षा घेण्याचा निर्णय का घेतला ? तर या परीक्षेमध्ये अधिकाधिक गुण प्राप्त करण्यासाठी अपप्रवृत्ती वाढत चालल्याने अशा प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी व निवड प्रक्रियेमध्ये डी.एड.अर्हताधारक सर्व उमेदवारांना निवडीची समान संधी व प्राथमिक शिक्षण सेवक पदासाठी योग्य अभिव्यक्ती असलेल्या उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड होण्याच्या दृष्टीने सन 2008-2009 या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया ही भरतीपूर्व केंद्रीय निवड परीक्षा घेऊन राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." या परीक्षेमध्ये अधिकाधिक गुण प्राप्त करण्यासाठी अपप्रवृत्ती वाढत असतील तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. या अपप्रवृत्ती कोणकोणत्या आहेत, त्यांचे स्वरुप काय आहे ? हे आम्हाला समजले पाहिजे. तसेच शासनाने असे म्हटलेले आहे की, आम्ही पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली आहे.मघाशी सांगितल्याप्रमाणे आजही राज्यातील 10 ते 12 हजार शिक्षकांची पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे थांबलेली आहे. जर आपल्या म्हणण्याप्रमाणे मागील यादीतील विद्यार्थ्यांना किंवा उमेदवारांनाच घेणे अपेक्षित असेल तर आपण कार्यवाही केली पाहिजे. कारण यामुळे शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. फक्त याबाबत निर्देश द्यावयाचे आहेत. त्यामुळे आजच्याआज सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना मागच्या यादीतील उमेदवारांना रिक्त पदांवर प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्त करु शकतात. तर तशा प्रकारचे निर्देश देणार काय?याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण यामध्ये गेल्या वर्षीच सुधारणा केली. बऱ्याच डी.एड.धारकांच्या संदर्भात त्यांना मिळणारे गुण आणि इतर काही बाबी होत्या. त्यामध्ये परराज्यातून मोठया प्रमाणात येणाऱ्या डी.एड.मुलांच्या बाबतीत प्रश्न आहे. महाराष्ट्र शिक्षण परिषदेच्यावतीने आपण या परीक्षा घेण्याची प्रक्रिया सुरु केली. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गेल्या वर्षी ज्या परीक्षा झालेल्या आहेत, त्याच्या अनुषंगाने सेवक भरती करण्याबद्दल स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना दिल्या होत्या आणि त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. आता पुढच्या

. . . .आर-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्षी म्हणजे 2010 मध्ये शिक्षक सेवकांची जी आवश्यकता आहे. त्याबाबतीत खरे म्हणजे राज्य शासनाने माहिती घेतली असता असे समजले की 2000 पर्यंत 52 पदेच रिक्त आहेत, जी भरावयाची आहेत. पण सी.ई.टी.परीक्षा घेण्यामध्ये वेळ लागतो.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ...

सध्याच्या निवड पध्दतीमध्ये नवीन सर्वंकष धोरण भारत सरकार आखत आहे. शिक्षणसेवक या पदाकरिता ज्यांच्या मुलाखती झालेल्या आहेत त्या अगोदरच स्थानिक स्वराज्य संस्थाना भरण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मागच्या वर्षी बरेच आंदोलन झाले होते. सीईटी पास झालेल्या विद्यार्थ्यांची निवड केली त्यामध्ये त्या त्या जिल्हयामधील पाच ते दहा टक्के लोक होते. सभापती महोदय, माझी स्पेसिफिक मागणी आणि प्रश्न असा आहे की, ही निवड प्रक्रिया 70:30 याप्रमाणे झाली पाहिजे. त्या जिल्हयातील विद्यार्थ्यांना त्या जिल्हयात संधी मिळाली नाही तर असंतोष निर्माण होतो. मागच्या वर्षी निरनिराळया ठिकाणी अशा प्रकारे असंतोष निर्माण झाला होता. याबाबतीत मोर्चे, आंदोलने आणि घेराव झाले होते. म्हणून 70:30 याप्रमाणे निविडप्रक्रिया करणार काय?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन 2008-2009 ला सीईटी ला बसणाऱ्या मुलांची संख्या 55 हजारपेक्षा जास्त होती. ही गोष्ट खरी आहे की, काही जिल्हयामध्ये अशा तक्रारी आलेल्या आहेत. एक-दोन जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणसेवकांची भरती झाल्यानंतर हे शिक्षणसेवक स्थानिक जिल्हयातील नसल्यामुळे त्यांना हजर करुन घ्यावयाचे नाही अशा प्रकारचा ठराव करण्यात आला होता. त्यामुळे स्वाभाविकपणे याबाबतीत थोडा असंतोश आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्या पार्श्वभूमीवर सरकार एक सर्वंकष धोरण आणत आहे. त्यामध्ये स्थानिक विद्यार्थ्यांवर भरतीमध्ये अन्याय होणार नाही, याचा विचार केला जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांओं के स्कूलों में शिक्षण सेवक पद के लिए भरती के संबंध में स्थानिक लोगों का विचार करने की बात जहां माननीय मंत्री जी ने की है, वहां मैं एक प्रश्न की ओर मंत्री जी का ध्यान खींचना चाहती हूं. दो साल पहले महाराष्ट्र के 200 विद्यार्थियों ने कर्नाटक से डी.एड. की शिक्षा प्राप्त की थी. पिछले साल नागपुर अधिवेशन में तत्कालीन शालेय शिक्षा मंत्री जी ने आश्वासन दिया था कि शिक्षण सेवक भरती के समय स्थानिक लोगों का विचार किया जाएगा और इस आशय का जी.आर. निकाला जाएगा. लेकिन अब तक इस आशय का जी.आर. निकाला नहीं गया है. इसलिए महाराष्ट्र के भूमिपुत्रों पर अन्याय न हो इसलिए क्या इस आशय का जी.आर. फौरन निकाला जाएगा ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, कर्नाटकात डीएड पास झालेल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपल्या माध्यमातून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या बाबतीत मला काही शिष्टमंडळे येऊन भेटली. या दोन-तीन दिवसात या संदर्भात बैठक घेऊन सरकार याबाबतीत निश्चितपणे धोरण जाहीर करील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय कळकर यानी 70:30 बद्दल या ठिकाणी प्रश्न विचारला होता. या संदर्भात कोर्टाचे काही निर्णय झालेले आहेत. त्यामुळे स्थानिक लोकांना घेता येत नव्हते. यामध्ये सगळयात महत्वाची अडचण अशी आहे की, महाराष्ट्रातील वेगवेगळया भागातील आणि वेगवेगळया जिल्हयातील भाषिक गट वेगळे आहेत. विदर्भातील भाषा वेगळी आहे. गडचिरोलीतील, झाडीपट्टीतील भाषा वेगळी आहे. कोकणातील भाषा वेगळी आहे कोरकू भाषा वेगळी आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षक तेथील भाषा कळणारा असेल तर त्याला शिकवणे सोपे जाते. अशा पध्दतीने स्थानिक बोली भाषा अवगत असणारे अशा प्रकारची दुरुस्ती करुन घ्यावी लागेल. अशी दुरुस्ती केली तरच स्थानिक उमेदवारांची निवड करता येईल अन्यथा स्थानिक उमेदवांराची निवड करता येणार नाही. अन्यथा कोर्टाचे निर्णय वेगळे आहेत. याची कल्पना माननीय मंत्रिमहोदयांना आहे काय? अतिदुर्गम भागातील प्राथमिक शाळांमध्ये तेथील स्थानिक बोलीभाषा येणारे शिक्षक घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सर्वंकष धोरण आखण्यात येत आहे त्यामध्ये जरुर या सूचनेचा विचार केला जाईल.

श्री. रामनाथ मोते : राज्यातील हजारो रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात हा प्रस्ताव दिला होता. जरी माननीय मंत्रिमहोदय म्हणत असतील तरी हजारो पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळणे आवश्यक आहे. म्हणून काहीही असले तरी ही पदे भरण्याच्या संदर्भात तातडीने काय उपाययोजना करणार ते सांगावे आणि प्राथमिक शिक्षकांच्य भरतीच्या संदभारत यावर्षी जी सीईटी घ्यावयाची आहे, तिची कार्यवाही किती दिवसात तातडीने सुरु करणार?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, दि.31 ऑगस्टपूर्वी ही सगळी परीक्षा प्रक्रिया पूर्ण करुन भरतीच्या संदर्भातील सूचना दि.31 ऑगस्ट पूर्वी दिल्या जातील.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 3 बाबत

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात माननीय वित्त मंत्री स्वत: उत्तर देणार आहेत. विधानसभा सभागृहामध्ये त्यांचे उत्तर अजूनही चालू आहे त्यामुळे त्यांनी विनंती केलेली आहे....

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हे निवेदन आजच घ्यावे.

सभापती : माननीय मत्रिमहोदयांनी सांगितले की, माननीय वित्त मंत्री विधानसभा सभागृहात उत्तर देत आहेत.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे आणि धोरणात्मक निर्णय असल्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळाले तर आपल्याला न्याय मिळू शकेल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हे निवेदन आजच घ्यावे.

सभापती : ठीक आहे. यानंतर निवेदन क्रमांक 6 घेण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या सफाई कामगारांची रिक्त पदे भरण्यात न येणे

मु. शी. : मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या सफाई कामगारांची रिक्त पदे भरण्यात न येणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या सफाई कामगारांची रिक्त पदे भरण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सर्वसामान्य माणसांच्या संदर्भात शासन किती उदासिन आहे याबाबतचा हा प्रश्न आहे. मुंबईमध्ये 16 हजार कुटुंबे बी.डी.डी. चाळीत राहतात. ज्या 16553 खोल्या आहेत त्यांच्या सफाईसाठी 250 ते 300 सफाई कामगारांची गरज आहे. पदे भरण्यासाठी काय करावे लागते याबाबत निवेदनामध्ये उल्लेख केला आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदर समितीने पदांच्या आढाव्यास सहमती दिल्यानंतर त्यास विभागाच्या प्रभारी मंत्री महोदयांची मान्यता घेऊन असा प्रस्ताव माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षेतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीसमोर अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. आकृतीबंध संयुक्त सचिव समितीची बैठक 2 मे, 2008 ला झाली. त्यानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली 22 मे, 2009 ला बैठक झाली. यामध्ये साधे बी.डी.डी. चाळीसाठी सफाई कामगार भरावयाचे आहेत. शासन न्याय देत नाही म्हणून लोक वर्तमानपत्रांकडे जातात. 1 वर्षाचा कालावधी का लागला ? कंत्राटी कामगार ठेवले म्हणून लोक औद्योगिक न्यायालयात गेले आहेत. त्याचा निर्णय आल्यानंतर ही पदे भरु असे निवेदनात म्हटले आहे. त्याचा निर्णय येण्यासाठी आपण औद्योगिक न्यायालयामध्ये सांगणार काय की, आता आमच्या समितीचा निर्णय झाला आहे आणि आता आम्ही अधिकृत पदे भरणार आहोत. यामध्ये 1 वर्षाचा जो कालावधी लागला त्याला कोण जबाबदार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आज 5.00 वाजता बैठक आहे. मधल्या काळामध्ये आचारसंहिता लागू झाल्यामुळे दोन वेळा तारखा देऊनही बैठक होऊ शकली नाही. आचारसंहिता लागू असताना भरतीची कार्यवाही करता येत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आकृतीबंध संयुक्त सचिव समितीची बैठक 2 मे, 2008 रोजी झाली. आचारसंहिता आता लागली. यामध्ये साधे सफाई कामगार भरावयाचे आहेत. वरळी बी.डी.डी. चाळीमध्ये नाक मुठीत धरुन बसावे लागते. त्या ठिकाणी घाणीचे ढीग उभे आहेत. सामान्य माणसांकडे कोण बघणार ? यामध्ये 1 वर्षाचा कालावधी का लागला ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, एक वर्षाचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत हे तपासून ती माहिती सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : हे कामगार कधी भरणार ?

डॉ. सुनील देशमुख : मी सांगितले की, आज 5.00 वाजता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अंतिम बैठक आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जी. टी. हॉस्पिटलच्या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवासाची व्यवस्था नसणे

मु. शी. : जी. टी. हॉस्पिटलच्या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवासाची व्यवस्था नसणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. कपिल पाटील, वि.प.स.. यांनी "जी. टी. हॉस्पिटलच्या निवासी वैद्यकीय अधिकाऱ्यांची निवासाची व्यवस्था नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी तात्काळ दखल घेतली त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. आपण दोघांना जागा दिलेली आहे. उर्वरित अधिकाऱ्यांना जागा कधी देणार ? ज्यांनी बेकायदेशीर जागा ताब्यात घेतल्या त्या जागा रिक्त कधी करणार ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मूळ प्रश्न डॉ. राहुल घुले यांच्या संदर्भात आहे. त्याला वैद्यकीय अधिकारी वर्ग 2 या ग्रेडमध्ये तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्यांसाठी घेतले.

श्री. कपिल पाटील : आपण त्यांची वैद्यकीय सेवा घेतो. त्यांच्या बाबतीत आदराने आणि जबाबदारीने बोलले पाहिजे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आदरानेच बोलत आहे. त्यांना 11 महिन्यांसाठी त्यात्पुरत्या स्वरुपामध्ये जी. टी. हॉस्पिटलमध्ये सेवेत घेतले. त्यांच्या सर्व्हिस कंडिशनमध्ये असे कोठेही म्हटलेले नाही की, त्यांना निवासस्थान द्यावयाचे आहे. मानवतेच्या दृष्टीने डॉ. राहुल घुले यांना हॉस्पिटलच्या प्रिमायसेसमधील गेस्ट हाऊसमध्ये निवासस्थान दिले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

त्यांनी दिनांक 22.5.2009 रोजी हॉस्पिटलला पत्र दिले की, मला निवासस्थान द्यावे. त्यानंतर त्यांनी दिनांक 1.6.2009 रोजी मीडियासमोर बॅच, बिस्तर दाखविले, त्याचे फोटो काढले. ते गेस्ट हाऊस आहे. परंतु प्रशासनावर दबाव आणण्याचा हा प्रकार आहे. प्रशासनाने घाबरुन त्यांना दुसऱ्या दिवशी अकोमोडेशन सुध्दा दिले आहे. त्याठिकाणी जे तात्पुरत्या स्वरुपात काम करणारे जे डॉक्टर्स आहेत ते अकोमोडेशन मिळण्यास पात्र नाहीत. त्यामुळे याप्रकरणाची चौकशी करण्यात येईल आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुरबाड तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेली अनियमितता

मु. शी. : मुरबाड तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेली अनियमितता याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.मदन पाटील (रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "मुरबाड तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर झालेली अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाची सा.बां.उपविभाग क्र.2 यांनी तपासणी केली असून या कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले आहे. काम केलेल्या मजुरांना मजुरीचे पैसे न देता त्यांच्या खोटया सहया दाखवून पेमेंट उचलण्यात आले आहे. यासंबंधी उपविभागीय अधिका-यांनी दि.21.1.2009 रोजी सविस्तर चौकशी अहवाल जिल्हाधिका-यांना सादर केला आहे. त्यावरुन संबंधित उप अभियंता व शाखा अभियंता हे दोषी असल्याचे आढळून आले आहे व याप्रकरणी 1.70 लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले आहे. ज्यांनी पैशाचा गैरव्यवहार केला आहे त्या उप अभियंत्यांना शासनाने निलंबित केलेले नाही. जिल्हाधिका-यांनी याप्रकरणाचा अहवाल विभागीय आयुक्तांना सादर केला, विभागीय आयुक्तांनी तो शासनाकडे पाठविला आणि शासनाने पुन्हा विभागीय आयुक्तांना दि.5.5.2009 राजी निलंबन निश्चितीची कार्यवाही तातडीने प्रस्तावित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. म्हणजे ही फाईल सारखी इकडे तिकडे फिरत आहे. ज्या उप अभियंत्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्यांना आज निलंबित करण्याचे आदेश शासन देणार आहे काय ? तसेच त्या मजुरांचे पैसे अद्यापपावेतो मिळाले नसल्यामुळे ते आता उपोषणाला बसलेले आहेत. त्या मजुरांनी रो.ह.यो.चे काम केल्यावर या अधिका-यांनी त्यांच्या नावाचे मस्टर तयार केले, त्यावर खोटया सहया घेतल्या आणि पैसे काढले आहेत. काम केलेल्या मजुरांना आजपर्यंत मजुरीचे पैसे मिळालेले नाहीत. ते ताबडतोब देण्याची व्यवस्था केली जाईल काय ?

श्री.मदन पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले ते खरे आहे. ठाणे जिल्हयात रोजगार हमी योजनेची 20 कामे चालू होती. त्यापैकी 9 कामांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्याची चौकशीही झालेली आहे. यामध्ये श्री.वैराळे व श्री.मेश्राम यांना जबाबदार धरण्यात आले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या मजुरांचे अंगठे घेऊन पैसे काढले होते. ते पैसे मजुरांना देण्याचे आदेश दिले जातील आणि जे दोन अधिकारी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी विभागीय आयुक्तांना दि.5.5.2009 रोजी सूचना दिल्या आहेत. त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. त्यांना निलंबित केले जाईल आणि त्यांच्याकडून पैसे वसूल केले जातील.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या मजुरांनी 6 महिन्यांपूर्वी केलेल्या कामाची मजुरी अद्याप मिळालेली नाही. त्यांच्या मजुरीचे पैसे आज किंवा उद्या दिले जातील अशाप्रकारचे आश्वासन द्यावे. त्यामुळे त्यांचे उपोषण थांबले. त्या अधिका-यांना आजच्या आज निलंबित केले जाईल काय आणि त्यांची मजुरी देण्याची व्यवस्था तातडीने केली जाईल काय ?

श्री.मदन पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना आजच्या आज निलंबित करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांचे निवेदन राहिलेले आहे. सन्माननीय वित्त मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील हे अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी येतील त्यावेळी ते घेण्यात येईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

सभापती : आपण साधारणत: दर शुकवारी औचित्याचे मुद्दे घेत असतो. परंतु सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आज औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. एक अपवाद म्हणून मी त्यांना आज औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देत आहे. शुक्रवारी 20-25 औचित्याचे मुद्दे घेणे आणि अन्य दिवशीही ते घेणे, असे न झालेले बरे. एक अपवाद म्हणून मी आज औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली त्याबद्दल धन्यवाद. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाशी निगडित असा महत्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. दोन दिवसापूर्वी या सभागृहामध्ये ऑन लाईनच्या संदर्भात चर्चा सुरु असताना माननीय शिक्षण मंत्र्यांनी आयसीएसई आणि सीबीएसई व अन्य बोर्ड यांच्यासाठी ॲडमिशनमध्ये 10 टक्के कोटा ठेवला जाईल आणि 90 टक्के कोटा एस.एस.सी.बोर्डाच्या मुलांसाठी राखून ठेवले जाईल अशी घोषणा केली. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. गेल्या वर्षी देखील शासनाने पर्सेण्टाईलच्या बाबतीत भूमिका घेतली होती आणि त्याबाबतीत अनेक क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटल्या होत्या. झेविअर्स लुईस नावाची व्यक्ती कोर्टात गेली आणि तिने एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना मदत करण्याचा राज्य शासनाचा मानस हाणून पाडला. एस.एस.सी. बोर्डाच्या मुलांना अन्य बोर्डाच्या मुलांपेक्षा कमी गुण मिळतात. सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना 85 ते 95 टक्के गुण मिळतात. या बाबतीत आम्ही सातत्याने आवाज उठवित होतो. या औचित्याच्या मुद्याद्वारे माझी राज्य शासनाला विनंती आहे की, शासनाने केलेल्या घोषणेच्या संदर्भात टाईम्स ऑफ इंडियाने आपल्या विरुध्द मोहीम उघडली आहे. अनेक पालक, शाळांचे प्रिन्सिलपॉल्स यांनी विरोधात प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. लुईस असे म्हणतात की, राज्य शासन कोटा तर ठरवू दे, मग आम्ही पहातो. अशी भूमिका लुईस यांनी घेतलेली आहे. राज्य शासनाने 90 आणि 10 टक्के कोट्याचा निर्णय जाहीर केला. हा निर्णय स्वागतार्ह आहे. परंतु नंतर एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना बॅकफूटवर जावे लागले तर त्यामुळे त्यांना प्रचंड मन:स्ताप सहन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावा लागेल आणि प्रचंड जनक्षोभाला शासनाला सामोरे जावे लागेल. म्हणून लोकांच्या तोंडचे पाणी पळावयास नको म्हणून शासनाने पूर्ण तयारी करुन केलेल्या घोषणेसंबंधी सभागृहाला आश्वासित करावे असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रथमत: सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याचे मी समर्थन करते. ॲडमिशन कोटयाच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी सकारात्मक निर्णय झाला पाहिजे.

माझा औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 8 जून 2009 रोजी रिलायन्सच्या विरोधात शिवसेनेचा मोर्चा होता त्यावेळी पोलिसांनी केलेल्या लाठीमारामध्ये श्रीमती सुभद्रा कदम यांचा डोळा निकामी झालेला आहे...(अडथळा)..

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : या विषयी याआधी सभागृहामध्ये मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे.

डॉ. नीलम गो-हे : या विषयासंबंधी विधानसभेमध्ये निवेदन करण्यात आलेले आहे. हा विषय जेव्हा विधानपरिषदेमध्ये उपस्थित करण्यात आला त्यावेळी माननीय उपसभापतींनी निर्देश दिले होते आणि त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी हे देखील सभागृहामध्ये हजर होते. माननीय गृहराज्यमंत्री श्री. नितीन राऊत यांनी सांगितले की...(अडथळा) माझे म्हणणे असे आहे की, श्रीमती सुभद्रा कदम हिला झालेल्या मारहाणीमुळे तिचा डोळा निकामी झालेला आहे. तेव्हा ज्याने मारहाण केली त्या संबंधित पोलीस अधिका-यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे ? तसेच श्रीमती सुभद्रा कदम यांना सरकार कोणती मदत करणार आहे ? या माझ्या दोन प्रश्नाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.... (अडथळा)...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने एक ते दीड मिनिटात बोलावयास पाहिजे होते, परंतु आपण जवळपास 5-6 मिनिटे बोलला आहात. तुमच्या मुद्याच्या आशय एवढाच होता की, याबाबतीत विधानसभेत निवेदन झाले आहे, ते निवेदन या सभागृहात झालेले नाही. ते निवेदन या सभागृहात करण्यात यावे. आपण फक्त दोन ओळीत बोलला असतात तरी चालले असते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो मुद्दा या सभागृहाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. मागच्या वेळेला पर्सेंटाईलच्या निर्णयाबाबत जो घोटाळा झाला तो यावेळेला होऊ नये. 90 टक्क्यांच्या निर्णय माननीय शिक्षण मंत्र्यांनी घेतला त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु या निर्णयाच्या बाबतीत इंग्रजी वृत्तपत्रातून आणि ब्युरोक्रसीतून जी मोहिम सुरु झाली आहे.(अडथळा) सभापती महोदय, 90 टक्क्यांच्या संदर्भात माननीय शिक्षण मत्र्यांनी निर्णय घेतला आहे त्याचे मी पुन्हा स्वागत करतो. परंतु आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.च्या ज्युनिअर कॉलेजेस् आहेत तेथील 90 टक्के विद्यार्थी घेण्यासबंधी तरतूद करुन घ्यावी. म्हणजे त्यांना कोर्टात जाण्याची संधी राहणार नाही. अन्यथा आपले 90 टक्के विद्यार्थ्यांवर अन्याय होईल. उद्या ती मंडळी कोटात गेली तर ब्युरोक्रसीत आणि ज्युडिशियलीमध्ये सगळीकडे एकच माणसे आहेत. त्यामुळे शासन पुन्हा अडचणीत येईल. गेल्या वेळी अशाच पध्दतीने शासन अडचणीत आले होते. 90 टक्के विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. याबाबतीत शासनाने ताबडतोबीने ठोस निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे काल माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, एस.एस.सी.बोर्डाचे रिव्हॅल्यूएशन करण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत देखील लवकरात लवकर निर्णय घेतला जावा.

श्री. भास्कर जाधव : मला आपण बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे. मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. आपल्या सभागृहाचे सन्माननीय ज्येष्ठ नेते व माजी विधानसभा अध्यक्ष श्री. अरुणभाई गुजराथी यांचा उद्या वाढदिवस आहे. उद्या ते सभागृहात उपस्थित रहाणार नाहीत, ते आपल्या मूळ गावी जाणार आहेत अशी मला माहिती मिळालेली आहे. उद्या आपल्याला त्यांच्या वाढदिवसा निमित्ताने अभिनंदन करण्याची संधी मिळणार नाही. म्हणून सभागृहाच्या वतीने त्यांचे आजच अभिनंदन करावे अशी माझी विनंती आहे. त्याच प्रमाणे या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांचा आज वाढदिवस आहे.म्हणून त्यांचे देखील सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करावे अशी मी दुसरी विनंती आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय श्री. अरुणभाई गुजराथी हे या सभागृहातील ज्येष्ठ सदस्य आहेत. राज्यातील एक अत्यंत जाणकार, अत्यंत शांत आणि अभ्यासू असे ते लोकप्रितिनधी आहेत. त्यांचा उद्या वाढदिवस आहे. आपल्या सर्वांच्या माध्यमातून आणि मी स्वत: त्यांचे वाढदिवसानिमित्त त्यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांचा आज वाढदिवस आहे. श्री.चंद्रकांत पाटील म्हणजे एक मोठे व्यासंगी व्यक्तिमत्व आहे. श्री.चंद्रकांत पाटील हे किती व्यासंगी आहेत यासंबंधीची माहिती आम्हाला गेल्या दोन-चार महिन्यात कळली आहे. त्यांच्या ज्ञानाचा, त्यांच्या अनुभवाचा उपयोग तुम्हा आम्हाला होत असतो. त्यांचे देखील वाढदिवसाच्या निमित्ताने सर्वांच्या वतीने मी अभिनंदन करतो.

डॉ.दीपक सावंत : मी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्दयाबाबत माननीय शिक्षण मंत्र्यांना काही सांगावयाचे आहे काय ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अकरावीच्या प्रवेशाबाबत जो 90:10 चा मुद्दा मांडला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र सरकार यासंबंधीचा निर्णय ज्यावेळी घोषित करीत होते त्यावेळी आयसीएसई व सीबीएसई बोर्डावर किती अन्याय केला जात आहे अशी आरडाओरड लोकांच्या मनात उत्पन्न झाल्याचे दिसून आले. एका बाजूला 3.5 लाख विद्यार्थी आणि दुसऱ्या बाजूला 24 हजाराच्या आसपास विद्यार्थी अशी संख्या आहे. 3.5 लाख विद्यार्थ्यांना तीन भाषा आणि इतर विषयातील गुणाची बेरीज करुन प्रवेश घ्यावा लागतो तर आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या मुलांना विषयाची संख्या कमी त्यामुळे टक्केवारी वाढते.

सभापती महोदय, आम्ही ज्यावेळी दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालो त्यावेळी आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना गुण कमी मिळत असत म्हणून त्यांना 5 टक्के गुण वाढवून दिले जायचे. ते कोणत्या नियमात बसत होते हे मला माहित नाही. त्यावेळी एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होतो अशी आरडाओरड झाल्याचे आमच्या ऐकिवात नाही. या विषयाबाबत मिडियाच्या माध्यमातून जे चित्र उभे रहात आहे. 5 विषयांच्या गुणांची बेरीज केल्याने सरासरी वाढते आणि 7 विषयांच्या गुणांची बेरीज केल्याने सरासरी कमी होते. चांगल्या कॉलेजमधील बहुसंख्य जागा या आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी मिळविल्यामुळे एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळूनही अशा चांगल्या कॉलेजमध्ये अकरावीला प्रवेश मिळत नाही. या संदर्भात योग्य ती जागृती करण्यासाठी कोर्टात कॅव्हेट दाखल करण्याची गरज आहे. अन्यथा स्टे लगेच मिळतो आणि ॲडमिशनचा बोजवारा उडतो. आयसीएसई व सीबीएसई बोर्डातील संस्था चालकांची मुजोरी मोडून काढण्यासाठी कडक कायदा करण्यात यावा. सध्याच्या नियमांचे ते पालन करीत नाहीत. काही राज्यकर्ते असतील, ब्युरोक्रॅटसी असतील, यांची मुले अशा शाळांमध्ये शिकत आहेत. बॉम्बे स्कॉटिश स्कूलच्या परिसरात नेहमी ट्रफिक जॅम असते. मी अनेकदा तक्रारी करुनही कारवाई होत नाही. बऱ्याच ट्रॅफिक विभागातील डीसीपींची मुले या शाळेत शिकत आहेत. आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांविरुध्द आम्ही नाही. शेवटी ते याच राज्यातील विद्यार्थी आहेत. समानतेचे धोरण असले पाहिजे हा मॅसेज जनतेपर्यंत केला पाहिजे. तो जाण्याची काळजी सरकारने घ्यावी आणि एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून अगोदरच कॅव्हेट दाखल करुन घ्यावा अशी मी विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, राज्य सरकारने अकरावी प्रवेश प्रक्रियेबाबत 90:10 चे धोरण जाहीर केले आहे. याबाबत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे. एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांना संरक्षण मिळावे यासाठी ही भूमिका घेतली आहे. याचा अर्थ असा नाही की, आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या विरोधात सरकारची ही भूमिका आहे. शेवटी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी म्हटल्याप्रमाणे आयसीएसई व सीबीएसई बोर्डाचे विद्यार्थी हे देखील याच राज्याचे आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भूमिका मांडली की, सरकारला आता या निर्णयापासून मागे जाता येणार नाही. सभापती महोदय, कायदेशीर मत घेऊनच या संदर्भात निर्णय आज किंवा उद्या राज्य सरकारच्या वतीने घेतल्यानंतर पुढे जावे लागेल. मी इतर राज्यातील आयसीएसई व सीबीएसई बोर्डाची माहिती घेतली असता बऱ्याच राज्यांमध्ये या बोर्डांनी आपली ज्युनिअर कॉलेज सुरु केलेली आहेत. महाराष्ट्रामध्ये मात्र दुर्दैवाने आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या ज्या शाळा आहेत त्यांचा दर्जा एसएससी बोर्डाच्या शाळांच्या दर्जापेक्षा चांगला आहे म्हणून एसएससी बोर्डाकडे विद्यार्थी येत नाहीत. या संदर्भात आम्ही एक बैठक घेतली त्यावेळी आम्ही स्पष्ट सुचविले, राज्याच्या बोर्डाच्या शाळांचा दर्जा कमी आहे असे म्हणणे असेल तर तुमच्या बोर्डातील दहावी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अकरावीसाठी एसएससी बोर्डाच्या शाळांमध्ये का प्रवेश घेतात? तुम्ही आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या अकरावीच्या शाळा का सुरु करीत नाहीत? मुंबईतील सर्व आयसीएसई व सीबीएसई बोर्डाच्या शाळांनी अकरावीच्या शाळा सुरु केल्यातर हा प्रश्न आपोआप मिटेल. आम्ही त्यांना हेही सांगितले की, राज्य सरकार अशा शाळा सुरु करण्याविषयी तुमचा अर्ज येईल त्याच दिवशी तुम्हाला एनओसी देईल. तुमची अडवणूक करण्यासाठी राज्य सरकारने ही भूमिका घेतलेली नाही. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑनलाईनसाठी त्यांचा डाटा मागितला.....

वाय.1....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

ऑनलाईन साठी सुध्दा सीबीएसई व आयसीएसई कडून डेटा दिला जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट सांगितले होते. याचा अर्थ राज्य शासनाच्या भूमिकेला सुध्दा त्यांनी मान दिला नाही. शासन यामध्ये द्वेष भावनेने कारवाई करीत नाही तर मागील वर्षी पर्सेंटाईलचे सूत्र अवलंब केले त्यावेळेस सुध्दा या संस्थांनी हीच भूमिका घेतली होती. म्हणून सर्वोच्च न्यायालयात जाण्याची भूमिका शासनाची आहे. आता शासनापुढे या वर्षासाठी जो मार्ग खुला आहे तो म्हणजे "बेस्ट ऑफ फाईव्ह" च्या प्रस्तावसंबंधीचा. परंतु असा प्रस्ताव हे शैक्षणिक वर्ष सुरु होत असताना द्यायला पाहिजे होता. म्हणून आता जो पर्याय शिल्लक आहे तो म्हणजे 90:10 या सूत्राचा. अशा सर्व धोरणामध्ये शासनाचा कोणावरही अन्याय करण्याचा उद्देश नाही, शासनाची तशी भूमिकाही नाही. म्हणून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपल्या बोर्डाच्या मुलांना संरक्षण देण्यासाठी शासनाने पाऊल उचलले आहे व त्यामुळे अन्य बोर्डातील मुलांनी कोणतीही वेगळी भावना मनात ठेवू नये. तसेच वर्तमानपत्र आणि संबंधित पालकांनी शासनाबरोबर चर्चा केली आणि शासनाची भूमिका जाणून घेतली तर आपोआपच गैरसमज दूर होतील व शासनाच्या धोरणाला ते पाठिंबा देतील.

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दि. 8 जून, 2009 रोजी रिलायन्सने आकारलेल्या वीज बिलाच्या संदर्भात सांताक्रुझ येथे झालेल्या लाठीचार्जमध्ये शिवसेनेच्या श्रीमती सुभद्रा कदम यांना आपला डोळा गमवावा लागला यासंदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. विधानसभेतही यासंबंधीचे निवेदन करण्यात आलेले आहे. तसेच यासंदर्भात दि. 8 जून, 2009 रोजी विधानपरिषदेत मुद्दा उपस्थित झाला असता माननीय उपसभापतींनी देखील शासनाने निवेदन करावे, असे निदेश दिले होते. यासंदर्भात शासनाने सभागृहात निवेदन करावे.

श्री. नितीन राऊत : महोदय, यासंदर्भातील निवेदन सभागृहात करण्यात येईल.

सभापती : आता सभा□हाची बैठ□ मध्यंतरासाठी स्था□ आणि दुपारी 1.40 वाजता पुन: भरेल.

(1.07 ते 1.40 मध्यंतर)

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यांतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी.: अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2009-10 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु .....

श्री. दिलीप वळसे-पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर यासभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ...

वेळेची बचत व्हावी म्हणून सर्वच सन्माननीय सदस्यांची नावे मी या ठिकाणी घेणार नाही परंतु ज्या सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेतला आहे त्या सर्वांचे मी आभार मानतो. या चर्चेतून राज्य सरकारला नवीन सूचना प्राप्त होतात, शासनाचे काही चुकले असेल तर ते दाखविण्याचा प्रयत्न होतो आणि त्यातून सुधारणा करण्याची शासनाला संधी मिळते या दृष्टीकोनातून मी या चर्चेकडे पाहतो. हा अर्थसंकल्प अत्यंत महत्वाचा असल्यामुळे सन्माननीय विरोध पक्षाच्या सन्माननीय सदस्य जर या चर्चेत सहभागी झाले असते तर माझ्या सारख्या व्यक्तिला अधिक फादा झाला असता.

सभापती महोदय, 26.11.2008 च्या घटनेनंतर गेल्या चार पाच महिन्यापूर्वी या राज्याच्या वित्त आणि नियोजन मंत्र्यांची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मार्च महिन्यामध्ये अंदाजपत्रक सादर करावयाचे होते परंतु लोकसभेच्या निवडणुकीमुळे आचारसंहिता लागू झाल्याने संपूर्ण अर्थसंकल्प मांडता आला नाही. म्हणूनच अंतरिम अर्थसंकल्प त्यावेळी मांडण्यात आला होता. 26 हजार कोटी रुपयांची योजना त्यावेळी जाहीर करण्यात आली होती आणि 26 हजार कोटी रुपयापैकी 1/3 रक्कम बजेटेड केली गेली आणि बाकीच्या 2/3 रकमांची ठोक तरतूद नियोजन आणि अन्य विभागाच्या अंतर्गत दाखवली होती.

सभापती महोदय, दिनांक 4 जून 2009 रोजी ज्यावेळी राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प मांडला होता त्यावेळी जिल्हा योजनेला थोडे झुकते माप दिले होते. गेल्या वर्षी जिल्हा योजनेसाठी 2 हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती या वर्षी 2 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद यासाठी करण्यात आली आहे. विशेष घटक योजनेसाठी जिल्हयात 632 कोटी रुपये आणि आदिवासी उप योजनेसाठी 1155 कोटी रुपये अशा प्रकारे 4 हजार 288 कोटी रुपये जिल्हा योजनेसाठी उपलब्ध करुन दिले आहेत राज्य योजनेमध्ये सर्वसाधारण कार्यक्रमासाठी 18 हजार 534 कोटी रुपये , विशेष कार्यक्रमासाठी 11 हजार 915 कोटी रुपये, विशेष घटक योजनेसाठी 2 हजार 19 कोटी रुपये, आदिवासी उप योजनेसाठी 1158 कोटी रुपये अशा प्रकारे एकूण 33 हजार 627 कोटी रुपयांची ही योजना असून एकूण 37 हजार 915.37 कोटी रुपयांची योजना या सदनामध्ये मांडण्यात आली आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ...

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावर या सभागृहात चर्चा झाली त्याचबरोबर खालच्या सभागृहातसुध्दा चर्चा झाली होती. दोन्ही सभागृहात एकाच वेळी ही चर्चा झालेली असल्यामुळे मला संपूर्ण वेळ या सभागृहात उपस्थित राहता आले नसले तरी राज्याच्या दृष्टीने काही महत्वाचे मुद्दे विधानसभेत आणि विधान परिषदेमध्ये जे उपस्थित करण्यात आले होते त्या दोन्ही मुद्यांचा मी एकत्रितपणे विचार करणार आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा एक मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आला होता. या अर्थसंकल्पाचे भाषण करीत असतांना या अर्थसंकल्पामध्ये 8 हजार 462 कोटी रुपयांची वर्षाच्या अखेरीस महसूली तूट येईल असा अंदाज मी व्यक्त केला असून एवढी मोठी महसुली तूट येणार असल्यामुळे राज्य कर्जबाजारी झाले आहे, राज्य देशोधडीला लागले आहे , राज्य चांगल्या प्रकारे चालविले नाही अशा प्रकारच्या निष्कर्षाप्रत येण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी केला. काहीना त्यातील समजत असूनही त्यांनी अशा प्रकारचा प्रयत्न केला होता तर काही सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आले नसेल म्हणून त्यांनी तसा प्रयत्न केला असेल.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

अशाचप्रकारची भूमिका मिडियामधील आमच्या सहकारी मित्रांनी घेतली. सभापती महोदय, माझ्या हातामध्ये तत्कालीन वित्तमंत्री श्री. महादेवराव शिवणकर यांनी दिनांक 22.3.1999 रोजी केलेल्या अर्थसंकल्पाच्या भाषणाची प्रत आहे. त्यावेळी देखील सरकारचा पाच वर्षाचा कालावधी संपत आल्यामुळे निवडणुकीला सामोरे जावयाचे होते. त्याचप्रमाणे राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू झाल्यामुळे त्याचा आर्थिक बोजा राज्य सरकारला स्वीकारावा लागला होता. त्यामुळे तत्कालीन वित्तमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये 7981 कोटी रुपयांची महसूली तूट दाखविली होती. सभापती महोदय, 1999 मधील रुपयाची किंमत आणि आता सन 2008-09 मधील रुपयाची किंमत पाहिली तर 8462 कोटी रुपयांच्या महसूली तुटीचा हा अर्थसंकल्प असल्यामुळे त्यामध्ये 1030 कोटीच्या आसपास बजेटरी तूट आहे. त्यामध्ये 950 कोटी रुपये कर रुपाने उभे केल्यामुळे ती तूट 130 कोटींची राहिली आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभापती महोदय, मी ज्यावेळी हा अर्थसंकल्प मांडला त्यावेळी 26 हजार कोटी रुपयांची मूळ योजना आणि 11 हजार 915 कोटी रुपयांचे सुवर्ण महोत्सव पॅकेज असे दोन भाग केले. अनेक माननीय सदस्यांच्या मनामध्ये अशी शंका निर्माण झाली की, हे 11 हजार 915 कोटी रुपये सुवर्ण महोत्सव पॅकेजच्या रुपाने बाजूला काढले आहेत. याचा अर्थ सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसाठी, मंत्र्यांसाठी अन्य वेगळया पध्दतीने काही तरी खर्च करण्यासाठी हा निधी उपलब्ध करुन दिला आहे. सभापती महोदय, अशाप्रकारची भूमिका या शासनाची नाही. या 11 हजार 915 कोटी रुपयांच्या पॅकेजचे वाटप करीत असतांना त्यामध्ये विशेष करुन एनर्जी सेक्टर, विमानतळ सुधारणा, होम ट्रान्सपोर्ट, हाऊसिंग, पी.डब्लू.डी. रोड आणि नियोजन विभागाने ज्या योजना तयार केल्या आहेत, त्यामध्ये पब्लिक हेल्थ, टुरिझम, अर्बन डेव्हलपमेंट आणि पाटबंधारे प्रकल्पांसाठी हा पैसा खर्च करण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, आपण प्लॅन आणि नॉन प्लॅनच्या खर्चाचा विचार करीत असतांना नॉन प्लॅन एक्सपेंडिचर वाढत आहे. अशावेळी भांडवली खर्चाचे प्रमाण दिवसें दिवस कमी होत चालले आहे अशाप्रकारची भूमिका सदनाच्या काही सन्माननीय सदस्यांनी घेतली. कर्ज काढून अन्य बाबींवर खर्च केला जातो, कर्ज काढल्यानंतर त्याचा उपयोग भांडवली खर्चासाठी होतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. दिलीप वळसे पाटील...

अशाप्रकारची चर्चा केली गेली. आपण सन 2007-08 मध्ये 7 हजार 154 कोटींचे कर्ज काढले त्यावेळी 11 हजार 489 कोटी रुपये भांडवली खर्च केला. सन 2008-09 मध्ये 15 हजार 504 कोटींचे कर्ज काढले असून त्यामधून 18 हजार कोटी पेक्षा जास्त भांडवली खर्च होईल अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, हे करीत असतांना एका बाजूला राज्याच्या महसूली उत्पन्नात वाढ करण्याचा राज्य सरकार प्रयत्न करीत आहे. गेल्या वर्षीचे विक्री कराचे उत्पन्न पाहिले तर जगात आणि देशात आर्थिक मंदी असतांना सुध्दा राज्य सरकारला 33 हजार 954 कोटींचा महसूल प्राप्त झाला. सन 2007-08 च्या तुलनेत यावर्षी विक्री करामध्ये 9.28 टक्के वाढ झाली. याशिवाय अर्थसंकल्पाच्या भाग-2 मध्ये नियमामध्ये व कायद्यामध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा सुचविल्या आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

गत पंचवार्षिक योजनमध्ये देशात डॉ.मनमोहन सिंगसाहेबांचे सरकार होते. त्या सरकारने एक निर्धार केलेला आहे की, कोणत्याही परिस्थितीत या देशात 2010 पर्यंत जी.एस.टी.ची आकारणी सुरु होईल. आज आपल्याकडे वेगवेगळया प्रकारचा कर भरावा लागतो. जगामध्ये एकच कर असतो. जर आपण या देशामध्ये तो कर लागू केला तर आज उद्योजक, व्यापारी आणि बाकी इतर वर्गातील लोक आहेत, त्यांना वेगवेगळया प्रकारची विवरणपत्रे भरावी लागतात, ती भरावी लागणार नाहीत. आपण त्या दृष्टीकोनातून सुध्दा एक प्रयत्न करीत आहोत. आपण थोडयाफार प्रमाणात काही कर सवलती दिल्या आणि काही थोडयाफार प्रमाणात करामध्ये वाढ करण्याच्या बाबतीत सुध्दा आपण अर्थसंकल्पामध्ये प्रस्ताव मांडलेले आहेत. परंतु त्यामधून सामान्य माणसाला दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून आजपर्यंत 2500 रुपये इतके उत्पन्न असलेल्या व्यक्तीला प्रोफेशन टॅक्स भरावा लागत होता, ती मर्यादा वाढवून 5000 रुपयापर्यंत नेली आहे.त्यामधून राज्यातील सर्वसामान्य जनतेला निश्चितपणे एक प्रकारचा दिलासा मिळणार आहे. काही सन्माननीय सदस्यांनी अशीही भूमिका मांडली की, दिवसेंदिवस राज्याचे कर्ज वाढत चालले आहे हे कर्ज वाढत असताना, हे राज्य दिवाळखोरीकडे जात आहे की काय ? काही सन्माननीय सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, या राज्यामध्ये फिस्कल डेफीशिट एका प्रमाणामध्ये ठेवण्याच्या दृष्टीकोनातून आपण जो कायदा मंजूर केला आहे, त्याचे उल्लंघन झालेले आहे. मी या सभागृहामध्ये सांगू इच्छितो की, राज्यकोषिय उत्तरदायित्व आणि अर्थसंकल्प व्यवस्थापन कायद्याचे कोणतेही उल्लंघन राज्य शासनाने केलेले नाही. सध्या देशात असलेली मंदीची परिस्थिती लक्षात घेता अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाने राज्यकोषिय तुटीचे प्रमाण 3 टक्क्यावरुन 3.5 टक्क्यापर्यंत नेण्याची मुभा दिली आणि काही काळासाठी महसुली तूट सुध्दा शुन्यावर आणण्याची तरतूद देखील स्थगित करण्यात आलेली आहे. याचा अर्थ केंद्र शासनाने मुभा दिली किंवा काही स्थगिती दिली म्हणून आम्ही आर्थिक नियोजन करावयाचे नाही असे नाही. पण तरी सुध्दा महाराष्ट्र राज्याची राजकोषिय जी तूट आहे, ती केंद्र शासनाने घालून दिलेल्या 3.5 टक्के या मर्यादेच्या आत म्हणजे 3.3 टक्के एवढीच आज राजकोषिय तूट आहे. त्यामुळे मी या सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की,कोणत्याही कायद्याचे उल्लंघन न करता आर्थिक व्यवस्थापन स्थिर करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्न करु. आपण बऱ्याच वेळेला एका बाजूला खर्च प्लॅन केलेले असतात आणि त्यामानाने

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

रिर्सोसेसच्या बाजूला आपल्याला काही मर्यादा असतात. परंतु अनेक ठिकाणी वसूल न झालेला जो कर असतो, त्यामध्ये हजारो-कोटी रुपये अडकलेले असतात. हा वसूल न झालेला कर हा अपिलामध्ये किंवा न्यायालयीन प्रकरणमध्ये गुंतलेला असतो.तो कर वसूल करण्याच्या दृष्टीकोनातून काय करता येईल यासाठी आपल्याला प्रयत्न करणे गरजेचे आहे. राज्य शासन वेगवेगळया महामंडळांना हमी देते. परंतु ही हमी देत असताना, सिंचन प्रकल्पांना कर्ज उभारणीसाठी जी हमी दिलेली होती, ती रक्कम आपण वसुलीपात्र रक्कम म्हणून नोंदवत होतो. त्यामुळे आता अशी नोंद करण्याऐवजी तेवढया रकमेचे अंशदान त्या महामंडळांना देऊन ही शुल्क हमीची रक्कम निर्लेखित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आणि महामंडळांना त्याचा फायदा होणार आहे. अर्थसंकल्पिय अंदाज करताना ते अचूक असले पाहिजेत अशा प्रकारची भूमिका मांडली जाते. परंतु बऱ्याच वेळेला नैसर्गिक आपत्ती येते, काही अनपेक्षित गोष्टी घडतात, त्यामुळे ही आकडेवारी तंतोतंत जुळत नसली तरी याबाबतीत आम्ही अधिक बिनचूक रहाण्याचा प्रयत्न करणार आहोत.

यानंतर कु.थोरात . . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

विकास खर्चमध्ये कट झाली अशा प्रकारचा दावा या ठिकाणी केला जातो. परंतु एका बाजूला वेतन आयोगाच्या शिफारशी पण स्वीकारल्या पाहिजेत हाच आग्रह सभागृहातील सन्माननीय सदस्य सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही धरतात. दुसऱ्या बाजूला विकास खर्चासाठी जास्त निधी उपलब्ध झाला पाहिजे ही भूमिका मांडली जाते. अनेक वेळेला काढलेल्या कर्जाचे व्याज, आपत्तीच्या प्रसंगी कलेली मदत, वेतन व पेन्शन यासाठी केलेली तरतूद यामूळे सुध्दा बऱ्याच वेळेला विकास खर्चाकडे थोडासा निधी कमी जात असल तरी तो निधी कसा वाढवावयाचा, जागतिक मंदीचा परिणाम झाला असला तरी राज्याचे उत्पान्न कसे वाढवावयाचे याचा प्रयत्न करीत आहोत. सन 2008-2009 च्या अंदाजानुसार राज्यावरील कर्ज 1 कोटी 61 लाख 276 रुपये एवढे असेल. आणि सन 2009-2010 च्या अखेरीस साधारणता 1 कोटी 85 लाख 801 रुपये एवढे राहील असा अंदाज आहे.बऱ्याच सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की,राजकोशीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय कायद्यातील तरतुदीमुळे याचे उल्लंघन होत आहे.पण मी आधीच सांगितले की, याचे उल्लंघन होत नाही. याचे प्रमाण 3.5 च्या तुलनेत 3.3 एवढे ठेवलेले आहे.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित नाहीत पण ज्या सन्माननीय सदस्यांनी हे राज्य कर्जबाजारी झाले अशा प्रकारची भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, गुजरात हे आर्थिक शिस्तीचे राज्य मानले तरी गुजरात राज्याने काढलेले कर्ज आणि त्या राज्याची जी.एस.डी.पी. पोजिशन याची तुलना केली तर आज गुजरात राज्यामध्ये सन 2007-2008 मध्ये 33.1 टक्के आणि महाराष्ट्र राज्यामध्ये 28.0 टक्के इतका जी.एस.टी.पी. असे कर्जाच्या रेशियोचे प्रमाण आहे. आणि हे केंद्र सरकारने घालून दिलेल्या सर्व निकषामध्ये असल्यामुळे आपले राज्य हे पूर्णपणाने एका दिशेने चाललेले आहे. विकासाच्या कामासाठी अधिकाधिक पैसा उपलब्ध झाला पाहिजे. परंतु बऱ्याचवेळा असे काही निर्णय घ्यावे लागतात. काही वर्षापूर्वी महामंडळे निर्माण केले. या महामंडळांचा उल्लेख पांढरे हत्ती असा कला जातो. म्हणून राज्य सरकारने याबाबतीत वासनिक समिती नेमली. त्यांचा अहवाल शासनाला प्राप्त झाल्यानंतर राज्यातील काही महामंडळे बंद करण्याचा सुध्दा प्रयत्न केला. त्यामुळे कोकण विकास महामंडळ,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ MAP/ SBT/ KGS/

श्री. दिलीप वळसे-पाटील....

विदर्भ विकास महामंडळ, मराठवाडा विकास महामडळ, मेल्ट्रॉन मॅफ्को, चितळे डिस्टिलरी राज्य वस्त्रोद्योक मंडळ यांच्या सारखे औसायनाचे किंवा निर्गुंतवणुकीचे काम जवळपास पूर्णत्वाला आलेले आहे. परंतु काही महामंडळे अशी आहेत मग ते एस.टी.असेल,एम.एस.आर.टी.सी., पर्यटण महामंडळ असेल किंवा लघुद्योग महामंडळ असेल ही समाजाची गरज आहे. आज एस.टी.महामंडळ तोटयात जात आहे म्हणून एस.टी. महामंडळ बंद करण्याची भूमिका कोणी घेणार असेल तर लोककल्याणकारी राज्यामध्ये ही संकल्पना मान्य होणार नाही. सामाजिकदृष्टया न्यायाची भाषा आम्ही सगळेजण करतो आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून गरीब माणसाला आर्थिकदृष्टया किंवा समाजिकदृष्टया मागास व्यक्तिला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून जाणूवपूर्वक या राज्यामध्ये जी भूमिका घेतली गेलेली आहे. त्यामध्ये मग सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत येणारी महामंडळे असतील आदिवासी न्याय विभागाच्या अंतर्गत येणारी महामंडळे असतील, अल्पसंख्याक विभागाच्या अंतर्गत येणारी महामंडळे असतील या सगळया महामंडळाच्या माध्यमातून गरीब माणसाला मदत करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. विशेषकरुन इन्फ्रास्ट्रक्चरच्या क्षेत्रामध्ये म्हाडा, सिडको आणि एम.आय.डी.सी. क्षेत्रामध्ये जी महामंडळे काम करीत आहेत ते एक चांगल्या प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याचे काम या राज्यामध्ये करीत आहेत. त्यामुळे सरसकट या महामंडळाना पांढरा हत्ती किंवा असे काही समजणे बरोबर होणार नाही. तरी सुध्दा या महामंडळामध्ये राज्याची गुंतवणूक झालेली आहे ती गुंतवणूक सुरक्षित राहण्याच्या दृष्टीकोनातून चालणारी महामंडळे प्रभावीपणे चालविणे आणि जी तोटयामध्ये असतील किंवा जी अडचणीमध्ये असतील त्या महामंडळांचा काय विचार करावयाचा याबाबतीत जरुर मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊ.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 11 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले आणि ती तरतूद कार्यक्रम अंतिम होईपर्यंत ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत या शीर्षाखाली दाखविली होती. मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, याच अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांव्दारे त्या रकमा अर्थसंकल्पामध्ये वर्ग करण्यात येतील त्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या व्यक्तींकडून कोणत्या तरी कामासाठी या रकमा लपवून ठेवलेल्या आहेत आणि त्याचा कोठे तरी गैरवापर केला जाणार आहे अशी जी भूमिका काही सन्माननीय सदस्यांनी मांडली ती भूमिका योग्य आहे असे मला वाटत नाही म्हणून ही बाब मी मुद्दा सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती महोदय, राज्याचे उत्पन्न पाहिले तर सन 2005-06 मध्ये राज्याचा जीएसटीपी 4 लाख 38 हजार 731 कोटीच्या आसपास होता तो सन 2009-10 मध्ये 7 लाख 97 हजार 841 कोटीच्या आसपास राहील. या राज्यामध्ये इन्फ्रॉस्ट्रक्चरच्या क्षेत्रामध्ये करण्यात येत असलेली गुंतवणूक, या राज्यामध्ये सर्व्हिस सेक्टरला देण्यात येत असलेले प्रोत्साहन तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे देण्यात येत असलेले इन्सेन्टिव्हज, या इन्सेन्टिव्हजच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढविणे आणि दुसऱ्या बाजूला रोजगार वाढविणे या बाबींचा प्रयत्न यामध्ये करीत आहोत. या अर्थसंकल्पामध्ये जी महत्वाची कामे आहेत त्यामध्ये बॅकलॉगचा विषय या सभागृहामध्ये, विधानसभा सभागृहामध्ये तसेच सभागृहाच्या बाहेर गेली अनेक वर्षे चर्चिला गेला. 1994 सालामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राचा जो बॅकलॉग मोजण्यात आला तो बॅकलॉग दूर करण्याच्या दृष्टीने राज्याच्या लोकशाही आघाडीच्या सरकारने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला आणि माननीय राज्यपालांनी सांगितल्याप्रमाणे जवळपास 558 कोटी रुपयांची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये नॉन इरिगेशन सेक्टरसाठी केलेली आहे आणि इरिगेशन सेक्टरसाठी 659.36 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामुळे आता आपल्याला या राज्यामध्ये विदर्भाला आणि मराठवाड्याला सिंचनाच्या कामासाठी पैसे देता येतीलच त्याचबरोबरीने अन्य विभागामध्ये गेल्या अनेक वर्षामध्ये त्या विभागातील अपूर्ण प्रकल्प सुरु होऊनही त्याचा लाभ आपल्याला घेता येत नव्हता. सरकारची गुंतवणूक झाली परंतु त्याचे उत्पन्न येण्याच्या कामामध्ये मर्यादा येत होत्या.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

त्याला सुध्दा गती देण्याचा प्रयत्न करता येईल. एक प्रकारे इन्फ्रॉस्ट्रक्चरच्या क्षेत्रामध्ये मोठी गुंतवणूक आपल्याला बघता येईल. अनेक सन्माननीय सदस्य सांगतात की, शेतीच्या क्षेत्रामध्ये या राज्यात आपल्याला मोठी पिछाडी सहन करावे लागली आहे. परंतु ही बाब आपणा सर्वांना चिंता करावयास लावणारी आहे. देशाच्या पातळीवर अडीच टक्क्यावरुन चार टक्क्यावर कृषी विकासाचा दर गेल्यानंतर, केंद्र सरकारने, देशाच्या माननीय पंतप्रधानांनी तसेच देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांनी अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या. शेतकऱ्यांना 2 लाख 80 हजार कोटीपर्यंतचे कर्ज वाटण्याचे काम केले. व्याजाचा दर कमी करण्याचा प्रयत्न केला. अन्नधान्याला अधिक सपोर्ट प्राईस द्यावयास पाहिजे ती दिली आणि शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले अन्नधान्य सरकारने खरेदी करण्याचा सुध्दा निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणजे आज या देशामध्ये केंद्र सरकारच्या गोडाऊन्समध्ये अन्नधान्याची रेलचेल आहे. त्यामुळे त्याबाबत आज या अर्थसंकल्पामध्ये विचार केलेला नाही. काही सन्माननीय सरदस्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, गोरगरीब लोकांना दोन रुपये, तीन रुपये किलो दराने गहू, तांदूळ देण्याची भूमिका घ्यावयास पाहिजे. याबाबतीत केंद्र शासनाने सुतोवाच केलेला असल्यामुळे केंद्राची काय योजना येते त्याकडे लक्ष ठेऊन आहोत. निश्चितपणे या देशातील गोरगरीब माणसाला त्याचा फायदा होईल. आज मी सांगू इच्छितो की, बॅकलॉगचा हा प्रश्न सोडविल्यानंतर या वर्षी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला 1613 कोटी रुपये, गोदावरी पाटबंधारे महामंडळाला 1365 कोटी रुपये, तापी महामंडळाला 494 कोटी रुपये, कोकणाला 489 कोटी रुपये

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि विदर्भाला 3115कोटी रुपये, असा हा निधी या वर्षी उपलब्ध होणार आहे. सिंचनाच्या क्षेत्रात इतक्या मोठ्या प्राणावर गुंतवणूक होणार आहे. हे करीत असताना केवळ राज्य शासनाचा निधी नाही तर केन्द्राचा निधी देखील अेआयबीपी योजनेअंतर्गत आपण मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्य सरकारने केन्द्राकडून निधी घेतलेला आहे असे विधानसभेमध्ये काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. सन 2008-2009मध्ये राज्य सरकारने अेआयबीपी योजनेअंतर्गत सिंचन प्रकल्पासाठी 2200 कोटी रुपयाचा निधी केन्द्र शासनाकडून मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे हे मी मुद्दाम या ठिकाणी नमूद करु इच्छितो. मुंबईसाठी या अर्थसंकल्पामध्ये काही नाही, असा काही सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला. परंतु सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की ज्यावेळी मी अंतिरिम अर्थसंकल्प सादर केला त्यावेळी या सभागृहामध्ये माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अंतरिम अर्थसंकल्पीय भाषण वाचले होते. त्यामध्ये मुंबईतील प्रश्नाचा संपूर्णपणे उहापोह करण्यात आला होता. या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये अंतरिम अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये आलेल्या मुद्यांची द्विरुक्ती होणार नाही याची काळजी घेण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा नाही की मुंबईसाठी काही केलेले नाही. मुंबई शहराचे पाणीपुरवठा विषयक प्रकल्प, मलनिस्सारण प्रकल्प, ब्रिमस्टोवॅड प्रकल्प, बेस्ट उपक्रमाला नवीन बसेस देणे, मिठी नदी परिसर विकास आणि संरक्षण प्रकल्प, परिवहन विषयक अन्य प्रकल्प, मेट्रोरेल, मोनो रेल, विविध रल्वेस्टेशन परिसरात स्कायवॉक बांधणे, वडाळा येथे विमानतळ बांधणे, सागरी मार्ग, गृहनिर्माण प्रकल्प, विविध पायाभूत सुविधा प्रकल्प शासन राबवित आहे. यामुळे हौसिंग, ड्रेनेज वॉटर पासून ते वाहतुकीपर्यन्तच्या सर्व समस्यामध्ये सुधारणा होईल आणि त्यामुळे सर्वसामान्यांना निश्चितच दिलासा मिळाले. सभापती महोदय, मुंबईमध्ये 20 हजार कोटीची कामे सुरु आहेत. त्यामध्ये राज्याचा आणि केन्द्राचा वाटा आहे. हे पैसे व्यवस्थित खर्च झाले तर मुंबईची आजची वाहतुकीची समस्या आणि अन्य अडचणीमध्ये सुधारणा व्हायला ब-यापैकी मदत होणार आहे. या संदर्भात माझ्याकडे जी नोट आहे ती मी सन्माननीय सदस्यांच्या पिजन होलमध्ये वितरित करीन. ज्यावेळी मी अंतरित अर्थसंकल्प मांडला त्यावेळी 6व्या वेतन आयोगाचा खर्च राज्य शासनाला सहन करावा लागला, केन्द्र सरकारने या देशातील शेतक-यांना सवलत देण्याच्या संदर्भात 71 हजार कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले होते आणि त्याचा लाभ राज्यातील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

काही शेतक-यांना झाला. परंतु जे शेतकरी केन्द्र सरकारच्या कर्जमाफीच्या योजनेमध्ये बसू शकले नाहीत अशा शेतक-यांना मदत करण्याच्यादृष्टीने 6208 कोटी रुपयाचे पॅकेज राज्य शासनाने जाहीर केले. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी अडीच हजार कोटीची तरतूद करण्यात आली होती आणि यावेळी सुध्दा अडीच हजार कोटीची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागाच्या संदर्भात जेव्हा आपण चर्चा करतो त्यावेळी या नक्षलग्रस्त भागामध्ये जोपर्यन्त सोईसुविधा निर्माण करुन तेथील लोकांचे जीवन सुसह्य करणार नाही तोपर्यन्त अशा प्रकारच्या ॲक्टीव्हीटीज थांबणार नाहीत. म्हणून नक्षलग्रस्त भागाच्या विकासाच्या संदर्भात जो विशेष कृती कार्यक्रम तयार केलेला आहे त्याला निधी उपलब्ध करुन देऊन त्यामध्ये निश्चितपणे रिलिफ देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, जेव्हा नागपूरचा मिहान प्रकल्प पूर्ण होईल त्यावेळी नागपूरमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माया होतील. जगातील सर्व विमाने त्या ठिकाणी दुरुस्तीसाठी येथील.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे (पाटील) .....

एका बाजूला रस्ते दुरुस्त करावयाचे असतील, तसेच राज्याला पुढे न्यावयाचे असेल आणि औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करावयाची असेल, तर राज्यातील विमानतळे चांगली झाली पाहिजेत. जळगाव, अमरावती, सोलापूर, शिर्डी, चाकण येथील विमानतळाच्या विकासासाठी राज्य शासनाने भूमिका घेतलेली आहे, त्यासाठी या अर्थसंकल्पात मोठया प्रमाणात तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या अंतर्गत आतापर्यंत 6 कोटी रुपये खर्च करुन 3139 रस्त्यांची कामे पूर्ण केली आहेत. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत 47610 शाळा खोल्यांची बांधकामे पूर्ण केली आहेत. शाळा खोल्यांची बांधकामे करुन विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी चांगली सोय उपलब्ध करुन दिली आहे. अपंग व्यक्तींच्या कल्याणासाठी मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात 183 कोटी तरतूद केली होती, तशाच प्रकारची तरतूद या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्नात घट होत आहे अशा प्रकारचा मुद्दा सातत्याने मांडला जातो आहे. महाराष्ट्रात अन्न धान्याच्या बाबतीत वस्तुस्थिती खरी असली तरी सुध्दा आज आपण पाहिले तर विदर्भ, खानदेश, मराठवाडा किंवा महाराष्ट्रातील उर्वरित भागात कापूस पिकतो. त्या सर्व भागामध्ये या वर्षी केंद्र आणि राज्य सरकारच्या एजन्सीच्या माध्यमातून शेतक-यांच्या साडेचार हजार कोटी रुपयांचा कापूस खरेदी केला. 2800 रुपयांपासून ते 3000 रुपयांपर्यंत शेतक-यांना कापसाला भाव दिला गेला. सोयाबीन पिकाला देखील चांगल्या प्रकारचा भाव दिला गेला. एका बाजुला कर्ज माफी आणि दुस-या बाजुला शेतक-यांच्या मालाला चांगल्या प्रकारचा भाव या गोष्टी राज्य सरकारने जाणीवपूर्वक केलेल्या आहेत.

सभापती महोदय, महिला बचत गटाला सामाजिक न्यायाच्या भूमिकेमधून 4 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. ब-याच वेळा असे म्हटले जाते की, तुम्ही निधीची गुंतवणूक करता आणि निधीच्या गुंतवणुकीतून मत्ता तयार होत नाही. कदाचित हजार कोटी रुपये खर्च केले तर त्यातून एखादा नवीन प्रकल्प उभा राहू शकेल. आज या राज्यामध्ये शासनाने अशीही भूमिका घेतलेली आहे की, या राज्यातील आर्थिकदृष्टया, सामाजिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षण घेता यावे. त्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निधीतून कदाचित इमारत वा इन्फ्रास्ट्रक्चर उभे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे (पाटील) .....

राहिले नाही तरी या राज्यातील तरुण पिढी आहे, त्या तरुणांना शिक्षणाची संधी कदाचित मिळाली नसती. त्या तरुणांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून शासनाने मोठया प्रमाणात तरतूद राज्याच्या सामाजिक न्यायाच्या माध्यमातून केली आहे. या तरतुदीमुळे शिक्षण क्षेत्रात एक चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील व्यक्ती आजारी पडली, त्याला हृदयविकाराचा आजार झाला तर तशा कुटुंबास जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात येतो. जीवनदायी योजनेतून 50 हजार रुपयांची मदत देण्यात येत होती. ती मदत आता 1 लाख रुपयांपर्यंत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या योजनेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला आर्थिक मदत मिळणार आहे. ज्यावेळेला अतिरिक्त अर्थसंकल्प ज्यावेळी मांडला त्यावेळी अशी टीका झाली की, आपण निवडणुका डोळयाच्या समोर ठेवून अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एका बाजुला इन्फ्रास्ट्रक्चर दुस-या बाजुला शेती सिंचन, व्यापार उद्योग, पायाभूत क्षेत्र, सामाजिक न्याय देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने काही बाबी शासनाने केल्या आहेत. गेल्या वर्षी संत तुकोबारायांची 400 वी जन्मशताब्दी होती. 400 वर्षापूर्वी संत निर्माण झाले होते, त्यांचे आचार, विचार आणि साहित्य तसेच लोकांची श्रध्दा ज्या विचारावर आहे, त्याचे आचार, विचार पुढील पिढीस मिळावेत म्हणून राज्य शसासनाने एखादी योजना वर्षभर तयार केली व त्यासाठी काही तरतूद केली तर निवडणुका डोळयासमोर ठेवून हा अर्थसंकल्प तयार केलेला असे म्हणणे उचित नाही. या राज्यात लहान वर्गास संधी देतो. त्याप्रमाणे मोठया वर्गास देखील संधी दिली गेली पाहिजे. या राज्यात कारखानदारी यावी म्हणून राज्य शासनाने सामुदायिक प्रोत्साहन योजनेचा लाभ उद्योगपतींना देतो. या योजनेसाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पात 400 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, या राज्यात विजेची टंचाई आहे. शेतीचे उत्पन्न घटता कामा नये, म्हणून या राज्यातील शेतक-यांचे दोन तृतीयांश वीज बील भरण्यासाठी 2082 कोटी रुपयांची तरतूद खर्च करणार आहोत. शेतक-याला जगविण्याचे काम या माध्यमातून करण्यात आले आहे.

सभापती महोदय, या वर्षी ऊर्जा क्षेत्रासाठी सुध्दा जवळपास 1945 कोटी रुपयांची तरतूद राज्य शासनाने केलेली आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

आज जरी 1945 कोटीची तरतूद दिसत असली तरी सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, वीज मंडळाचे विभाजन केल्यानंतर निर्मिती, वितरण व पारेषण या तीन वेगवेगळया कंपन्या करताना 60 हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार केला गेला. राज्य सरकारने 10 किंवा 20 टक्के इक्विटी द्यायची आणि बाकीचा निधी त्यांनी उभा करायचा. त्या माध्यमातून वीज निर्मिती किंवा विजेच्या संदर्भातील भूमिका घ्यायची ही बाब त्यामध्ये आहे. शिक्षणासाठी आपण तरतूद केलेली आहे. अल्पसंख्याक विभागासाठी सुध्दा यावर्षी 210 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या शिवाय रस्त्यांच्या कामासाठी फार मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. रस्ते आणि पूल यासाठी 2451 कोटी रुपये, केंद्रीय मार्ग निधी 250 कोटी रुपये, नाबार्ड सहाय्यित रस्त्यांसाठी 275 कोटी रुपये, पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत जास्तीत जास्त निधी केंद्राकडून कसा मिळेल यासाठी सगळयांचा प्रयत्न त्यामध्ये असतो. इमारत आणि निवासस्थाने हा एक विषय आहे. 50-50 वर्षे होऊन गेली. एखादा तालुका निर्माण झाला तरी अजून तहसीलदार कार्यालय नाही, तेथे बसायला जागा नाही. न्यायालय मंजूर झाले परंतु इमारत नाही, निवासस्थाने नाहीत. त्याचा विचार यावेळी केलेला आहे.

मेडिकल एज्युकेशनसाठी 216 कोटी रुपयांची तरतूद करीत असताना विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळेल, मेडिकल कॉलेजला अटॅच हॉस्पिटल्स सुधारतील ही भूमिका घेतली आहे. प्रत्येक महसुली विभागाच्या ठिकाणी कर्करोग रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी पुणे आणि अमरावती येथे कर्करोग रुग्णालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. औरंगाबाद येथील रुग्णालयाचे काम यापूर्वीच सुरु झाले आहे.

विदर्भ पॅकेज अंतर्गत विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयांमध्ये केंद्र शासनाने 3075 कोटी रुपये आणि राज्य शासनाने 1050 कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन दिला. तो निधी खर्च करण्यात आला. अतिरिक्त खर्चासाठी अतिरिक्त 50 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. महिला बचत गटांना प्रोत्साहन देत आहोत. महिला बचत गटांनी निर्माण केलेल्या मालांची विक्री करण्यासाठी रु.72.55 कोटी प्रदर्शने व इतर कामांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत. तीर्थक्षेत्रांचा विकास, इंदिरा आवास योजनेमध्ये 2 लाख घरे, सामाजिक वनीकरणासाठी आवश्यक असणारा निधी, सरपंचांच्या मानधनामध्ये केलेली वाढ, ग्रामपंचायत महिला सरपंचांना मोफत प्रवास आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

एमआरईजीएस अंतर्गत करण्यात येणारी वाढ या सर्व गोष्टी ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या आहेत. एस.सी., एस.टी. हाऊसिंग पॉलिसीच्या संदर्भात धोरण मंत्रिमंडळामध्ये अडकले आहे. लवकरच या संदर्भात निर्णय घेऊ. मुंबईपुरती 2-2.5 लाख घरे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ती योजना मंजूर होऊन काही घरे बांधून झाला. त्याचा फायदा सुध्दा करीत आहोत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या 50 व्या वर्षाच्या निमित्ताने काही आपल्या आदरणीय नेत्यांचे स्मरण करणे आवश्यक होते. कै.यशवंतराव चव्हाण साहेब असतील, वि.स.पागे असतील किंवा साधुसंत आहेत, देहू आळंदी तीर्थक्षेत्र असेल, गजानन महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जन्मशताब्दी असेल, गजानन महाराज यांचा शताब्दी महोत्सव आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्मशताब्दी महोत्सव आहे या कार्यक्रमासाठी आज पैसे उपलब्ध करुन दिले आहेत. जेएनएनआरयुएम अंतर्गत या राज्यात केंद्राकडून मोठया प्रमाणात पैसा आणून उपयोग करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, ग्रामीण भागाला सुविधा देत असताना त्यामध्ये शहरांना सुध्दा, अर्बन एरियाला सुध्दा निधी कमी पडू देणार नाही. सर्वसाधारणपणे प्रश्न विचारला जातो की, एवढ्या योजना जाहीर करता, एवढे कर्ज राज्यावर आहे, एवढ्या योजना जाहीर केल्यानंतर एवढा निधी आणणार कुठून? मला या निमित्ताने सभागृहाला सांगितले पाहिजे की, महसुली लेखा आहे त्यानुसार 2009-2010 च्या अर्थसंकल्पामध्ये जरी आपल्याला तूट दिसत असली तरी जमा रक्कम रु.89060 कोटी आणि खर्च रु.96,184 कोटी, भांडवली जमामध्ये रु.25906 कोटी आणि भांडवली खर्चामध्ये रु.29806 कोटी आहे.

2आय.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

एकूण जमा 1,14,967/- कोटी आणि 1,15,990/- कोटी एवढा खर्च, अर्थसंकल्पिय तूट 1029/- कोटीपर्यंत राहील. अतिरिक्त महसुलाची उभारणी ही कररुपाने 910 कोटीची ठरविलेली असल्याने बजेटरी तूट ही अत्यल्प म्हणजेच जवळपास 113 कोटीच्या आसपास असेल. परंतु या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, देशात डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकार पुन्हा एकदा सत्तेवर आल्यामुळे या सरकारने आपल्या देशाची अर्थव्यवस्था पुढे नेण्याच्या दृष्टीनेच भूमिका घेतलेली आहे. त्या अनुषंगाने माननीय पंतप्रधानांनी सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांची एक परिषद उद्या बोलावलेली असून ज्याप्रमाणे आपण बजेटपूर्व सर्व इंडस्ट्रीज, चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यासोबत चर्चा करतो त्याप्रमाणे राज्यातील अर्थमंत्र्यांशी चर्चा करुन त्यांच्या, आपल्या राज्यासंबंधीच्या काही सूचना असतील तर त्या जाणून घेण्याचा प्रयत्न करतील. उद्याच्या परिषदेसाठी मला जाता येईल की नाही याबाबत शंका आहे परंतु आपल्या राज्यामार्फत सध्या विकास योजनांसाठी केंद्राची 26 हजार कोटीची जी तरतूद आहे ती 70 हजार कोटीपर्यंत वाढवून मिळावी अशी विनंती आपण केंद्रशासनाला केली आहे. तसेच सहाव्या वेतन आयोगाचा भार या राज्यावर आला असून त्यातील काही वाटा केंद्राने उचलला तर कर्मचाऱ्यांच्या उर्वरित मागण्या पूर्ण करण्याचा शासन प्रयत्न करणार. आज आपल्या देशाचा जी.डी.पी. जो 3.5 टक्क्याच्या आसपास आहे तो 4 टक्क्यापर्यंत नेण्याचाही शासनाचा विचार आहे. तसेच राज्यातील विकास कामासाठी ओपन मार्केट बारोइंगमधून निधी उभा करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत. ओपन मार्केट बॉरोइंग म्हणजे बाजारातून प्रत्यक्ष कर्ज काढत नाही तर त्यासाठी आरबीआयची परवानगी लागते अशी परवानगी फेब्रुवारी-मार्चच्या दरम्यान येते ती लवकर आणि वेळेत आली तर त्याचा निश्चितपणे आपल्याला फायदा आहे. व्हॅटच्या कॉम्पेन्सेशनपोटी 3 हजार कोटी रुपये केंद्राकडून येणार आहेत. 12 व्या वित्त आयोगाचे 2100 कोटी रुपये केंद्राकडून येणे आहेत. जेएनएनयुआरएमच्या योजनांमध्ये काही कारणास्तव शासनाला तोटा सहन करावा लागतो त्यातील काही वाटा केंद्राने सहन केला आणि ती भूमिका मान्य झाली तर त्याचाही आपल्या राज्याला फायदा होईल. त्याचबरोबर वेगवेगळ्या महामंडळांना दिलेल्या गॅरंटीज हा सभागृहात नेहमीच चर्चेचा विषय असतो. त्याबाबतीत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन 2008-09 मध्ये ज्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

गॅरंटीज अशा महामंडळांना शासनाने दिलेल्या आहेत त्यात रत्नागिरी गॅस पॉवर, कापूस खरेदीसाठी गॅरंटी देत असतो आणि त्यापोटी दुरावा रक्कम शासनाला भरावी लागते. तसेच अपंग विकास वित्त महामंडळ अशा महामंडळांना शासनाने गॅरंटीज दिल्या आहेत. अशा प्रकारे सामाजिक व आर्थिक दृष्टीने जास्त फायदा राज्याला होईल. कृषी विभागाला खते उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तसेच वाहतुकीसाठी आपल्याला गॅरंटी द्यावी लागली आहे. खालच्या सभागृहात मी आणि या सभागृहात माननीय राज्यमंत्री यांनी अर्थसंकल्प ज्यावेळी सादर केला त्यावेळेस राज्यातील काही महामंडळांची कर्ज माफ करण्याच्या संदर्भातील भूमिकाही जाहीर केली. सामाजिक न्याय विभागाअंतर्गत महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, शाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ, वसंतराव नाईक भटक्या व विमुक्त जाती विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग विकास व वित्त महामंडळ अशा सहा महामंडळातील ज्या व्यक्तिना राज्यसरकारच्या वतीने कर्ज देण्यात आली त्यासंबंधीची कट-ऑफ डेट शासन निश्चित करील व त्या डेटपासूनची कर्जे माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याच पध्दतीने आदिवासी विकास महामंडळाच्या अंतर्गत जी महामंडळे आहेत त्यांना दिलेली कर्जे याबाबत मी सांगू इच्छितो की, आदिवासी बांधवांना ज्या परिसरात जास्त पाऊस पडतो म्हणून चार-चार महिने घराच्या बाहेर पडता येत नाही त्यासाठी त्यांना घरातच चार महिन्याचे धान्य साठवण करावे लागते. यासाठी मे महिन्यात आदिवासींना खावटी कर्ज दिले जाते. हे कर्ज देत असताना ते परत करावयाचे नसते अशीच भूमिका या आदिवासी शेतकऱ्यांच्या मनात असते म्हणून ही कर्जे थकलेली आहेत. या राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना दिलली अशा प्रकारची खावटी कर्जे जवळपास 189.37 कोटीचे आणि न्युक्लिअस बजेटमधून दिलेले 4.50 कोटीचे कर्ज माफ करण्याचा निर्णय या शासनाने घेतलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

हे कर्ज माफ करण्याच्या संदर्भातील निर्णय शासनाने घेतलेला आहे. बजेटमध्ये तरतूद करुन यासंदर्भात निर्णय घेतलेला असल्यामुळे आपल्याला अतिरिक्त पैसे यासाठी उपलब्ध करावे लागणार नाहीत. शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, खादी ग्रामोद्योग महामंडळ, मौलाना आझाद वित्त महामंडळ या महामंडळांचे सुध्दा कर्ज माफ करावे असे सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर सन्माननीय सदस्यांनी इच्छा व्यक्त केली होती. यासंदर्भात मी खालच्या सभागृहात बजेटला रिप्लाय देतांना याही महामंडळांचे कर्ज माफ करण्याच्या संदर्भात राज्य सरकार निर्णय करेल असे जाहीर केलेले असून यासंदर्भातील प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर नेण्यात येईल. मंत्रीमंडळासमोर हा प्रस्ताव घेऊन गेल्यावर आपल्याला निश्चितपणे गरीब वर्गाला मदत करता येईल. अधिक बोलून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावर विचार मांडतांना सन्माननीय सदस्यांनी काही वैयक्तिक सूचना देखील केलेल्या आहेत. परंतु त्या वैयक्तिक सूचनांच्या डिटेलमध्ये मी जाणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पर्यटनाच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी जे काही महत्वाचे मुद्दे मांडलेले आहेत त्यासंदर्भात मी अगोदरच उल्लेख केलेला आहे. शासनाने काही अध्यासने निर्माण केलेली आहेत. अध्यासने निर्माण करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नाशिक येथील ओपन युनीव्हर्सीटी मध्ये अध्यासन निर्माण करावे व त्यासाठी 2 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी अध्यासनाच्या संदर्भात जी मागणी केलेली आहे ती मागणी शासनाने मान्य केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. जैनुद्दीन जव्हेरी, रमेश शेंडगे यांनी महामंडळाच्या संदर्भात भूमिका मांडलेली आहे. खानदेश मधील उपसासिंचन योजनेचे कर्ज माफ करण्याची मागणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी केली होती परंतु या क्षणाला त्यांच्या मागणीचा विचार करणे शक्य होणार नाही. या संदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय झाला असला तरी ही सूचना मान्य करणे शक्य होणार नाही. सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जेट्टी बांधण्याच्या संदर्भात तरतूद करावी अशी मागणी केलेली आहे. खरे म्हणजे जेट्टी बांधण्यासाठी वेगळी पॉलीसी केलेली असून पैसा देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या ठिकाणी जो अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे त्यामुळे या राज्याच्या विकासाला गती येईल, राज्याच्या इन्फ्रास्ट्रक्चर मध्ये वाढ होईल, राज्याच्या विकासाला गती येईल, या राज्यातील गोरगरीब माणसाची चिंता मिटेल व या महाराष्ट्र राज्याला पुढे घेऊन जाण्यात मदत होईल व सर्वांना समाधान देईल असा विश्वास व्यक्त करतो व या अर्थसंकल्पाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सन 2009-10 जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याचे आम्ही स्वागत केलेले आहे. अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असतांना मी काही महत्वाच्या मागण्या केल्या होत्या. कोकणात कुणबी आर्थिक विकास महामंडळ निर्माण होईल अशा प्रकारचा निर्णय मागे झाला होता व यासंदर्भात टोकन प्रोव्हीजन सुध्दा करण्यात आली होती. कुणबी आर्थिक विकास महामंडळ व्हावे अशी कोकणातील कुणबी समाजाचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. रायगड, ठाणे, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी येथे मोठया प्रमाणात कुणबी समाजाचे वास्तव्य आहे त्यामुळे कुणबी आर्थिक विकास महामंडळ निर्माण करण्याच्या संदर्भातील शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कुणबी आर्थिक विकास महामंडळांच्या संदर्भातील महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. गेल्या वर्षी माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात कुणबी आर्थिक विकास महामंडळ सन 2008-09 या आर्थिक वर्षात सुरु करण्यात येईल अशी स्पष्ट घोषणा केली होती. त्यामुळे कुणबी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची अंमलबजावणी केव्हा होणार, कशा प्रकारे होणार व त्याचे स्वरुप काय असणार आहे याबाबतीत मंत्रीमहोदयांनी विस्ताराने विवेचन करावे अशी विनंती करतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कुणबी आर्थिक विकास महामंडळाची स्थापन करण्याच्या संदर्भात सूचना केलेली आहे त्याबाबतीत मला आता उत्तर देता येणार नाही परंतु या संदर्भात पूर्वीची काय परिस्थिती आहे हे मी तपासून घेईन. त्याचप्रमाणे सर्व सबंधित सन्माननीय सदस्यांची त्यासाठी बैठक घेईन. एखादे महामंडळ नव्याने निर्माण करावयाचे असेल तर त्यासाठी मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. तेव्हा ही बाब मी तपासून पाहीन.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय,उत्तम सामाजिक न्याय देणारा अर्थसंकल्प माननीय वित्त मंत्र्यांनी सादर केलेला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. जीवनदायी योजनेसाठी अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद केलेली आहे परंतु ती तरतूदआणखी वाढवून 100 कोटी रुपयापर्यत करण्यात यावी अशी मला मागणी करावयाची आहे सामाजिक न्याय देण्याच्या संदर्भात बेटर दॅन बेस्ट अशा प्रकारचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे. मौलाना आझाद आर्थिक विकाय महामंडळ,महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी आर्थिक विकास महामंडळ किंवा अन्य जी महामंडळे आहेत त्यांना जेवढी रक्कम वाढवून देता येईल तेवढी रक्कम वाढवून देण्यांसबंधी शासनाने प्रयत्न करावा त्याचबरोबर खानदेशसाठी वेगळे वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी ज्या प्रमाणे कुणबी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी केलेली आहे त्याप्रमाणें ते महामंडळ स्थापन करण्यात यावे अशा प्रकारे ही दोन्ही महामंडळाची स्थापना होणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे त्या संदर्भात सभागृहात आश्वासन द्यावे.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विधान सभेचे माजी अध्यक्ष श्री.अरुण गुजराथी यांनी जी भूमिका मांडली आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, जीवनदायी योजनेच्या संदर्भात या वर्षी दोन गोष्टी करण्यात आलेल्या आहेत पूर्वी 50 हजार रुपयांची मर्यादा आता 1 लाख रुपयापर्यत करण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे गेल्या वर्षी 23 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती ती या वर्षी 46 कोटी रुपये करण्यात आलेली आहे आता निधीचे वाटप करण्यात आलेले आहे परंतु मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. आपण जी मागणी केलेली आहे त्याबाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डिसेंबर महिन्यापर्यंत आढावा घेण्यात यईल आणि आवश्यकता वाटली तर पुरवणी मागण्यांमध्ये विचार करण्यात येईल किंवा सीएफच्या माध्यमातून निधी वाढवून घेता येईल. तेव्हा आपले पेन्डीग काम किती आहे ते पहावे लागेल. खानदेशच्या संदर्भात तसेच कुणबी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत या ठिकाणी जो उल्लेख करण्यात आलेला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की याबाबत मी सन्माननीय सदस्यांशी पुन्हा चर्चा करीन आणि आपल्या अपेक्षा काय आहेत त्या समजावून घेऊन त्यानंतर मंत्रीमंडळासमोर जाईन.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात)

उपसभापती :- सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. मला माननीय वित्त मंत्र्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, मार्च महिन्यात अंतरिम अर्थसंकल्प मांडला होता त्यावेळी एका गोष्टीची मी आपल्याला जाणीव करुन दिली होती. नंतरच्या काळात सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेल्या विविध महामंडळाची कर्जे माफ केली असून तो एक अभिनंदनीय निर्णय शासनाने घेतला आहे. शेतक-यांवरील कर्जाच्या बाबतीत केन्द्र सरकारने आणि राज्य सरकारने अत्यंत चांगली भूमिका बजावली होती. मी मागच्या वेळी एक गोष्ट आपल्या समोर मांडली होती आणि त्यावर विचार करण्याचे तत्वत: आपण मान्यसुध्दा केले होते. ज्या वित्तीय संस्थामध्ये गोर गरीब,मध्यमवर्गीय जनतेने पैसे गुंतविले होते त्या वित्तीय संस्थांनी या गरीब लोकांचे पैसे बुडवले होते. सुवर्ण सहकारी बॅन्केमध्ये ज्या व्यक्तिनी गुंतवणूक केली होती त्यांच्या पैशाच्या बाबतीत राज्य शासनाने विचार केला होता. मागे मी आपल्याला भूदरगड सहकारी पत संस्थेंचे उदाहरण दिले होते. त्याप्रमाणे इतरही काही पतसंस्था असतील की ज्यामध्ये लोकांनी पैसे गुंतवले होते परंतु त्यांचे पैसे बुडालेले आहेत. ज्या लोकांनी या संस्थांमध्ये पैसे गुंतविले होते त्या लोकांना त्यांचे पैसे परत मिळणे आवश्यक आहे. परतु या लोकांचे पैसे या संस्थांनी बुडवलेले आहेत. शासनाने महामंडळाचे तसेच शेतक-यांचे कर्ज माफ केले आहे. परंतु ज्या लोकांनी स्वत:चे पैसे या वित्तीय संस्थामध्ये गुंतविले होते त्या संस्थांनी हे पैसे बुडवलेले आहेत. ते पैसे त्यांना परत मिळावेत म्हणून सुवर्ण सहकारी बॅन्केच्या प्रकरणात ज्याप्रमाणे शासनाने विचार केला आहे त्याप्रमाणे ज्यांनी पैसे बुडविलेले आहेत अशा राज्यामध्ये पाच सहा वित्तीय संस्था आहेत व त्यामध्ये भूदरगड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सहकारी पत संस्थासुध्दा आहे. या अर्थसंकल्पात त्या दृष्टीनेसुध्दा राज्य सरकार निश्चितपणे विचार करील असे मला वाटले होते. वर्तमानपत्रात आपण त्यासंबंधीच्या बातम्या वाचत असतो काल सुध्दा मी वर्तमानपत्रात असे वाचले आहे की , या संस्थांमध्ये राज्यातील ज्यांनी पैसे गुंतविलेले आहेत ते सर्व ठेवीदार एकत्र येऊन आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत . त्यांची मागणी अत्यंत न्याय्य आहे. तेव्हा त्यांच्या न्याय्य मागणीसाठी तातडीने आपण आणि सहकार मंत्र्यांनी एकत्र येऊन या संस्थाना , त्यांच्या भागिदारांना, वा शिष्टमडळांना एकत्र बोलावले पाहिजे. त्या संदर्भात उपाययोजना करण्यासंबंधी देखील त्यांनी काही सूचित केलेले आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

ते कोर्टामध्येही गेले आहेत. मला असे वाटते की, एका फार मोठया वर्गाला यामधून जरुर न्याय देण्यात यावा अशाप्रकारची सूचना या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मी करतो. त्यासंदर्भात आपण निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. काही पतसंस्था आणि बिगर ग्रामीण पत पुरवठा करण्यासाठी रजिस्टर झालेल्या पत संस्थांमध्ये कोटयावधी रुपयांच्या ठेवी अडकलेल्या आहेत. यापैकी बऱ्याच संस्था लिक्विडिशनमध्ये गेल्या आहेत, तर काही संस्थांविरुध्द फौजदारी केसेस सुरु आहेत. सभापती महोदय, या विषयासंबंधी आपल्या ज्या भावना आहेत तशाच प्रकारच्या आमच्या सुध्दा भावना असल्यामुळे त्या संदर्भात विचार करण्यासाठी माझ्या स्तरावर दोन-तीन बैठका झाल्या आहेत. याबाबतीत नेमका काय मार्ग काढावयाचा याकरिता सन्माननीय श्री. अण्णा हजारे यांच्या उपस्थितीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर यापूर्वी एक बैठक झाली. यामध्ये अडकलेल्या ठेवीच्या एकूण रकमा किती आहेत? हे समजण्यासाठी त्यांची वर्गवारी केली असून त्यामध्ये 25 हजाराच्या किती, 50 हजाराच्या किती आणि 1 लाखाच्या वर असलेल्या किती ठेवी आहेत? अशाप्रकारची वर्गवारी करुन संपूर्ण माहिती माझ्या विभागाच्या माध्यमातून एकत्रित करण्याचा प्रयत्न करीत आहोत. विशेष करुन जळगाव, धुळे, नंदूरबार, कोल्हापूर आणि काही प्रमाणात सांगली, सोलापूरच्या परिसरात अशाप्रकारच्या जास्त तक्रारी आल्या असल्यामुळे त्याबाबत तातडीची उपाय योजना करण्यासाठी म्हणून विशेष अधिकारी नियुक्त केला आहे. त्याचप्रमाणे आपण उल्लेख केलेल्या कोल्हापूरच्या भुदरगड सहकारी पतसंस्थेबाबतची सुध्दा विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे. यामध्ये वसूली फोर्सफुली झाली पाहिजे यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. मुळामध्ये याला संचालक मंडळ जबाबदार आहे. याचे कारण त्यांनी अशाप्रकारे ठेवीदारांचा विश्वासघात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पतसंस्थेकडे आलेल्या ठेवीमधून बोगस पध्दतीने कर्ज वाटप करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबाबत शासनाने भूमिका स्वीकारली असून वसुलीच्या बाबतीत डायरेक्टिव्हज देऊन वसूली काटेकोरपणे करण्याचा आपला प्रयत्न राहील. तसेच, आपण म्हटल्याप्रमाणे याबाबतीत आणखी कोणता मार्ग शोधून काढता येईल किंवा त्यांना आणखी कोणत्या प्रकारची मदत करता येईल याबाबत हे शासन सहानुभूतीपूर्वक विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा यह सुझाव है कि ऐसे मामलों में संचालक मंडल को जिम्मेदार ठहराते हुए संचालकों की प्रापर्टी एक्वायर करके उससे जो पैसा प्राप्त होगा वह ठेवी रखने वालों को देने के लिए उपयोग कर सकते हैं. क्या इस दृष्टि से .....

उप सभापति : संचालकों ने अपने नाम पर कर्ज नहीं लिया है.

श्रीमती फौजिया खान : लेकिन ऐसे मामलों में संचालक जिम्मेदार है.

उपसभापती : मंत्रिमहोदय, या प्रकरणामध्ये यापूर्वी आपण एक सरळसोट मार्ग सुचविला होता की, ज्या पध्दतीने आपण सुवर्ण सहकारी बँकेला अलाऊ केले त्याप्रमाणे भुदरगड सहकारी पतसंस्थेला बुलढाणा येथील कुठलीतरी एक संस्था विलिनीकरण करुन घेण्यास तयार आहे. राज्य सरकारने त्याबाबत त्यांच्याकडून हमी घेऊन ठेवीदारांचे पैसे परत करावयाचे आहेत. ही साधी आणि सोपी गोष्ट असल्यामुळे तिचा पहिल्यांदा अवलंब करावा. त्याप्रमाणे इतर प्रकरणाच्या बाबतीत अवलंब करता येईल काय हे पहावे. तसे केल्यामुळे हा प्रश्न सुटेल असे मला वाटते.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, निश्चितपणे अशा ज्या संस्था आहेत त्यांच्या विलीनीकरणाच्या संदर्भात अे कॅटॅगरी, बी कॅटॅगरी अशाप्रकारचे त्या संस्थांची यादी तयार केली आहे. आपण या ठिकाणी सुवर्ण बँकेचा उल्लेख केला. इंडियन ओव्हरसीज बँकेच्या माध्यमातून ती बँक ताब्यात घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्यामध्ये 250 कोटींचा तोटा असतांना सुध्दा इंडियन ओव्हरसीज बँकेने संपूर्ण बँक टेकओव्हर करण्याबाबत निर्णय घेतला. त्याबाबत आम्ही एक टास्कफोर्स तयार केला आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन त्यांची मालमत्ता अटॅच करण्यासंदर्भात निश्चितपणे कारवाई करण्याचा प्रयत्न करु.

उपसभापती : मंत्रिमहोदय, मी हा विषय जास्त लांबवत नाही. मी एक अत्यंत महत्वाची गोष्ट सांगतो. या सहकारी बँका आणि पत संस्थांच्या बाबतीत माझ्यापेक्षा आपण जास्त जाणता, आपण त्या खात्याचे प्रमुख आहात. या संदर्भात भविष्यात जी काही संकटे येणार आहेत. त्या संदर्भात देखील मी आपल्या कार्यालयाला सूचित करतो. काही ठिकाणी सहकारी बँकांनी 2-2 कोटी रुपयांचे कर्ज कोणतेही तारण न घेता दिले आहे. अशाप्रकारचे कर्ज ठाण्यातील एका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

उपसभापती...

सहकारी बँकेने दिले असून एक वर्ष होऊन देखील त्याची कोणत्याही प्रकारची वसूली करण्यात आलेली नाही. ही कर्जाची रक्कम 10 ते 15 कोटींवर आहे. असे जर चालू राहिले तर सर्वसामान्य माणूस त्यामध्ये भरडला जाईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

आज भूदरगडच्या बाबतीत बुलढाणा पतसंस्था आहे, ज्यांनी ही गोष्ट मान्य केलेली आहे की, आम्ही विलिनीकरण करीत आहोत. कारण जवळपास 3 लाख लोक यामध्ये भरडले जात आहेत. अशा वेळी राज्य शासनाने याबाबतीतील जे काही निकष आहेत, ते तपासून या विलिनीकरणाला ताबडतोब हिरवा कंदील दिला, तर मला असे वाटते की, 3 लाख लोकांचा प्रश्न सुटेल. आपल्याला देखील कल्पना आहे की, मी गेले सहा महिने माननीय मंत्री महोदयांकडे जात आहे आणि त्यांनीही याला न्याय देण्याचा प्रयत्न केला, माननीय अर्थमंत्र्यांनी देखील केला, म्हणजे आपण तसे करीत नाही असे मला म्हणावयाचे नाही. परंतु जर ही बाब शीघ्रगतीने झाली तर मला असे वाटते की, या तीन लाख लोकांचा प्रश्न तरी सुटेल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझी आपल्याला सूचना आहे की, आपण याबाबतीत पुढाकार घेऊन लोकप्रतिनिधींची बैठक बोलवावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण याठिकाणी माहिती दिली की, तारण घेतल्या शिवाय 2 कोटी रुपयांचे, 10 ते 15 कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. यासंबंधातील माहिती माझ्या कडे द्यावी. मी तात्काळ त्या संबंधित बँकेवर कारवाई करीन. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही. विलिनीकरणाच्या संदर्भात सांगावयाचे तर अशा पध्दतीने एखादी बँक किंवा एखादी नॅशनलाईज बँक, अशा प्रकारच्या बँकांचे विलिनीकरण करुन घेण्यास तयार असतील आणि ते जर आमच्या निकषामध्ये बसत असेल तर त्याबाबतीत संमती देण्यामध्ये आम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. भूदरगडच्या बाबतीत सुध्दा बुलढाणा बँकेचा प्रस्ताव असून तो अंतिम टप्प्यामध्ये आलेला आहे. त्यामुळे याबाबतीत आमची सकारात्मक भूमिका रहाणार आहे.

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आदरणीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी अध्यासनाला 2 कोटी रुपयांची मंजुरी दिल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. या अध्यासनाला कुसूमाग्रज यांचे नाव द्यावे अशी आमची मागणी होती. त्याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जी विनंती केलेली आहे, ती मान्य करण्यात येत आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आम्ही कालच अर्थसंकल्पावर बोलत असताना अशी मागणी केली की, सगळया महामंडळांची कर्जे माफ करण्यात यावी आणि आदरणीय अर्थमंत्री आणि आदरणीय अर्थ राज्यमंत्री यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी महामंडळाचेही कर्ज माफ केले. याबाबतीत त्वरित निर्णय घेतल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे 1978 पासून 2009 पर्यंत या महामंडळाला कर्ज वाटप करण्यासाठी फक्त दहा कोटी रुपये मिळालेले आहेत. ज्याप्रमाणे आपण इतर महामंडळांना कर्ज वाटप करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला, त्या प्रमाणेच या महामंडळाला सुध्दा कर्ज वाटप करण्यासाठी निधी द्यावा अशी विनंती करतो आणि पुन्हा एकदा आपले आभार मानतो.

श्रीमती मधु जैन :सभापति महोदय, मैंने अपने कल के बजट भाषण में खानदेश वैधानिक विकास मंडल गठित किए जाने की मांग की थी. मैं इस संबंध में मंत्री महोदय से निवेदन करना चाहती हूं कि खानदेश वैधानिक विकास मंडल के गठन का विचार किया जाए और खानदेश वैधानिक विकास मंडल के गठन होने तक विशेष खानदेश विकास पॅकेज दिया जाए और इस पॅकेज के तहत विकास के लिए धनराशि का प्रावधान किया जाए ताकि खानदेश का सर्वांगीण विकास हो सके.

(उत्तर नाही)

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, अल्पसंख्याक विकास मंत्रालय के लिए जो धनराशि का प्रावधान किया गया है, उसके लिए मैं माननीय मंत्री जी की आभारी हूं. लेकिन मैं यह कहना चाहती हूं कि यह यह धनराशि पर्याप्त नहीं है इसलिए यह धनराशि बढ़ाई जाए. 210 करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. एक अच्छी शुरुआत है लेकिन इससे भी ज्यादा धनराशि की जरुरत है. इसलिए मेरी यह मांग है कि अल्पसंख्याक विकास मंत्रालय के लिए दी गई धनराशि को बढ़ाया जाए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, याठिकाणी मी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे मनापासून स्वागत करते आणि आदरणीय वित्त मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील आणि वित्त राज्यमंत्री डॉ.सुनीलजी देशमुख यांचे मनापासून अभिनंदन करते. त्यांनी सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पाच्या माध्यमातून अतिशय भरभरुन सर्वकाही दिलेले आहे. माझी एकच मागणी आहे की, समुद्र किनाऱ्यावर सुरक्षेसाठी होम गार्डस्ची भरती करणार आहोत. माननीय मंत्री महोदयांना माझी एवढीच विनंती आहे की, त्याठिकाणी होम गार्डस्ची भरती करीत असताना, समुद्र किनाऱ्यावर रहात असलेल्या मच्छिमारांची जी मुले आहेत, त्यांना जर प्रशिक्षण देऊन त्यांची होम गार्ड म्हणून नेमणूक केली तर त्यांना स्वयंरोजगार मिळेल. कारण तेथील लोकांचे समुद्राशी नाते असल्यामुळे तेथे काम करणे सोयीचे होईल.

(उत्तर नाही)

उपसभापती : अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनाबाबत

उपसभापती : नियम 93 अन्वये सूचनेचे एकच निवेदन राहिले होते ते आता घेण्यात येईल

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भातील 25 लाख शिक्षक कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. (अडथळा) विरोधी पक्षाचा बहिष्कार अर्थसंकल्पावरील चर्चेपर्यंत होता,आता बहिष्कार नाही, हे लक्षात घ्यावे. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात नाहीत. हा सभागृहाचा आणि राज्याचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या निवेदनावरील चर्चा उद्या घेण्यात यावी.

उपसभापती : माननीय सभापतींनी मला ही सूचना आता घ्यावयास सांगितले होते. मी या संदर्भातील सन्माननीय सदस्यांची सूचन माननीय सभापतींना अवगत करतो. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1 घेण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात येतात.)

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनावर चर्चा घेण्यास माझी तयारी आहे.

उपसभापती : Now it is over.आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1घेण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, हा अन्याय आहे, या निवेदनावर चर्चा झाली पाहिजे.

उपसभापती : मी नियम 93 अन्वयेचे निवेदन रद्द केले असे म्हटले नाही. मी म्हटले सभापतींनी मला आता घ्यावयास सांगितले होते त्याप्रमाणे मी ते पुकारले. त्यानंतर आपण असे सांगितले की, ते पुढे ढकलावे. त्यावेळी मी असे म्हटले की, पुढे ढकलण्याच्या संदर्भातील आपली सूचना मी माननीय सभापतींना अवगत करीन. मी चुकीचे काय बोललो? मी अन्याय कधीच करत नाही. हा माझ्यावर तुम्ही अन्याय केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

पृ. शी. : धामणी व यादववाडी (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) या वाडयांजवळील नदीवर साकवाचे काम तातडीने होण्याची आवश्यकता.

मु. शी. : धामणी व यादववाडी (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) या वाडयांजवळील नदीवर साकवाचे काम तातडीने होण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान, सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, अरुण गुजराथी वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" धामणी व यादववाडी (ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी) या दोन वाडया नदीपलीकडे वसलेल्या असणे, यादववाडीत जाण्यासाठी नदीवर साकव नसल्याने दरवर्षी जून ते सप्टेंबर या महिन्यात या वाडीचा बाह्य जगाशी संपर्क तुटणे, त्यामुळे शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे चार महिने अतोनात शैक्षणिक नुकसान होणे, सदर वाडीतील अबाल वृध्दांचे साकव नसल्याने अतोनात हाल होणे, सदर साकवासाठी 8.40 लाख रुपये खर्च अपेक्षित असताना निधी अभावी साकवाचे काम न होणे, त्यामुळे सदर वाडीतील लोकांचा पावसाळयाच्या चार महिन्यात संपर्क तुटत असल्याने साकवाचे काम तातडीने होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

श्री. गरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत शासनाने चांगली भूमिका घेतलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या गावांवर हा अन्याय होतो हे शासनाने मान्य केलेले आहे. "पावासाळयात या नदीला सुमारे 2.50 मी.उंच पर्यंत पुराचे पाणी असते. त्यामुळे पावसाळयात यादववाडीतील रहिवाश्यांचा धामणी गावाशी संपर्क तुटतो, ही बाब खरी आहे." त्याचप्रमाणे पुढे असे कबूल केलेले आहे की, "प्रस्तुत साकव बांधण्यासाठी रु.12 लाख इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे." व डी.पी.डी.सी. या जिल्हास्तरावरील समितीने या कामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा असे म्हटले आहे. माझी याठिकाणी आग्रहाची अशी विनंती आहे की, शासनाने डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून लवकरात लवकर रक्कम उपलब्ध होईल आणि कामाला लवकरात लवकर सुरुवात होईल एवढे बघावे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय,'होय'.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MAP/ SBT/

पृ. शी. : ठाणे जिल्हयातील काशिमिरा, मिरा रोड व भाईंदर या ठिकाणी वेगवेगळया गुन्हयांमध्ये होत असलेली वाढ.

मु. शी. : ठाणे जिल्हयातील काशिमिरा, मिरा रोड व भाईंदर या ठिकाणी वेगवेगळया गुन्हयांमध्ये होत असलेली वाढ.यासंबंधी सर्वश्री मुझफ्फर हुसेन, जैनुद्दीन जव्हेरी, गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, जयप्रकाश छाजेड वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" ठाणे जिल्ह्यातील काशिमिरा, मिरारोड व भाईंदर (पश्चिम) भागातील गुंड व्यापाऱ्यांकडून खंडणीची मागणी करणे, जॉगर्स पार्क व कमी रहदारीच्या भागात महिलांचे दागिने चोरी होणे, छेडछाड होणे अशा घटनांमध्ये सततची वाढ होत असणे, चोरी घरफोड्या, दागिन्यांची दुकाने लुटणे, अमली पदार्थ व औषधाच्या दुकानातून कौरकचे सेवन करणाऱ्या लोकांकडून स्थानिक नागरिकांना त्रास होणे, हे प्रकार माहे जानेवारी, 2009 ते मे, 2009 या कालावधीत मोठ्या प्रमाणात वारंवार घडणे, भाईंदर उत्तन येथे गुंडगिरी वाढणे, राजरोसपणे लोकांना गुडांनी मारहाण करणे, याप्रकरणी स्थानिक पोलीस स्टेशनला वेळोवेळी तक्रारी, निवेदने देऊनही स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये नागरिकांच्या तक्रारी नोंदविण्यास टाळाटाळ होत असल्याने स्थानिक नागरिकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सदर प्रकाराबाबत ठोस कारवाई करण्यात यावी, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधिक्षक व सहाय्यक उपअधिक्षक मिरारोड पोलीस ठाणे यांना लेखी निवेदन देण्यात येणे, या प्रकारांना त्वरीत आळा घालण्यासाठी स्थानिक पोलीसांनी त्वरीत कारवाई करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन :सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील काशिमिरा, मिरा रोड व भाईंदर या तीन पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये सातत्याने वाढत असलेले गुन्हे, चोरी, घरफोडया, चेन खेचने,दादागिरी, गुंडागर्दी, लोकांना मारहाण करणे या प्रकरणामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. मर्डर, सुसाईड अशा प्रकारच्या केसेस त्याठिकाणी मोठया प्रमाणावर घडत आहेत. संपूर्ण ठाणे जिल्हयात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा एक विशिष्ट प्रकार त्या ठिकाणी घडत आहे. मिरा, भाईंदर व काशिमिरा या तिन्ही पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये तसेच प्रकार घडत आहेत. रस्त्यावर चालत असलेल्या नागरिकांवर या गुंडामार्फत घेराव घालून मारहाण करण्यात येते. त्याबाबतची तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनला पोहचल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये त्याची कोणत्याही प्रकारची नोंद घेतली जात नाही. उलट पोलीस त्यांना असे विचारतात की, तुम्हाला कुठे लागले आहे ते दाखवा, मेडिकल सर्टिफिकेट घेऊन या. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, ठाणे जिल्हयामध्ये सातत्याने अशा प्रकारचा माफियाईजम पूर्ण जिल्हयामध्ये वावरत आहे. गुंडागर्दी वाढवण्याचा आणि दहशतवाद निर्माण करण्याचा हा एक वेगळा प्रकार असतो.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन ....

त्यामध्ये पोलिसांची साथ त्या गुंडांना मिळत असते. कारण मार्केटमध्ये उभे असताना कोणत्याही नागरिकाला कोणी नुसती धक्काबुक्की केली किंवा शिविगाळ केली किंवा मारहाण केली तर त्याचे रक्त निघत नाही, स्क्रेचेस येत नाहीत किंवा शस्त्र वापरण्याची गरज पडत नाही. पण त्या शहरामध्ये आणि त्या परिसरामध्ये दहशतवाद निर्माण होतो आणि त्या गुंडाच्या बाबतीत पोलीसही तक्रार घेत नाहीत. असाच एक प्रकार उत्तन या ठिकाणी 5 तारखेला घडला. आऊटपोस्ट पोलीस स्टेशनपासून साधारणत: 500 मीटर अंतरावर एका नागरिकाला त्याच्या कार्यालयामध्ये जाऊन मारहाण करण्यात आली आणि पोलिसांनी चार तासानंतर हॉस्पिटलमध्ये जाऊन त्याची नोंद घेतली. फिर्यादीने जी नावे दिली होती त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा एफआयआर दाखल न करता दुसऱ्या दिवशी त्या आरोपींना कोर्टामध्ये डायरेक्ट हजर करुन कोर्टाची दिशाभूल केली. कोर्टाला हे सांगण्यात आले नाही की, ज्याला मारहाण करण्यात आली आहे तो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे. त्या ठिकाणी व्यवस्थित सेक्शन लावले नाहीत. अशा प्रकारचा कारभार त्या तीनही पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये चालतो. प्रॉस्टीट्यूशन, लॉजिंग, बोर्डीन्ग हे सर्व असते. अशा परिस्थितीमध्ये माझा एक स्पेसिफिक प्रश्न आहे की, 5 तारखेला उत्तन या ठिकाणी घडलेल्या गुन्ह्यामध्ये शासन संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहे ? या तीनही पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये वाढत असलेल्या गुन्ह्यांच्या बाबतीमध्ये शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मिरारोड, भाईंदर आणि काशिमिरा या भागात चाललेल्या प्रकाराबद्दल पोटतिडिकीने या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी माझ्याकडे सुध्दा अनेक तक्रारी आल्या. त्या तक्रारींमध्ये रात्री-बेरात्रीपर्यंत ऑर्केस्ट्रा चालणे, भूमाफियांची प्रकरणे, दरोडे, जबरी चोऱ्या, धमक्या यासंदर्भात तक्रारी येतात. गुन्हेगारीचा अत्यंत गंभीर असा प्रकार त्या ठिकाणी वाढीस लागलेला आहे आणि एक प्रकारे त्या ठिकाणी दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र निर्माण झालेले आहे. त्यामुळे मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, तेथील पोलीस अधिक्षक आणि अधिकारी आणि आमचे आमदार यांच्यासोबत एक स्वतंत्र बैठक घेऊन त्या ठिकाणचे प्रश्न मार्गी लावून त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था कशी राखली जाईल यासंबंधीची योग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत .....

कार्यवाही केली जाईल. तव्दतच त्या ठिकाणी दहशतवादाला किंवा गुन्हेगारीला प्रोत्साहित करीत असतील अशा अधिकाऱ्यांवर वेळप्रसंगी निलंबनाची सुध्दा कठोर कारवाई केली जाईल. दुसरे असे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी 27.5.2009 रोजी झालेल्या एका गुन्ह्याच्या प्रकरणाबद्दल माहिती दिली. त्यात भारतीय दंड विधान संहितेच्या कलम 384, 385 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे आणि ज्या व्यक्तीला काही लोकांनी मारहाण केली होती आणि त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये त्याची तक्रार आली होती त्याला आम्ही सुरक्षा देखील प्रदान केलेली आहे.

उपसभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, त्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व मी देखील करतो. सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडलेली आहे त्यामध्ये त्यांनी खरोखरच या ठिकाणी एका योग्य अशा प्रश्नाला तोंड फोडलेले आहे. मी माझ्या अनुभवनातून मुद्दाम या ठिकाणी सांगतो. सर्वसाधारणतः आपण लोकप्रतिनिधी यासंदर्भात बोलावयास लागलो तर त्याला कधी कधी राजकीय वास निर्माण होतो. ही जी तीन पोलीस ठाणी या ठिकाणी सांगितली ही सगळी सुपारी पोलीस ठाणी आहेत. माझ्या शब्दाचा आपण पक्का अर्थ घ्यावा. आता इकडे सुपारी शब्द फार प्रचलित झालेला आहे. ही सुपारी पोलीस स्टेशन्स आहेत. मी गेली पाच-सहा वर्षे पाहात आहे की, त्या ठिकाणचे सगळे अधिकारी, निरीक्षकापासून खाली कॉन्स्टेबलपर्यंत त्या ठिकाणी बिल्डरांचे हस्तक म्हणून वावरत असतात. म्हणजे काही ठिकाणी तर अशी उदाहरणे आहेत की, प्लॉट अडविण्यासाठी, ज्याचा रेग्युलर प्लॉट आहे त्याचा प्लॉट अडवावयाचा असेल, दुसरा कोणी एन्क्रोच करीत असेल तर लिटरली त्या ठिकाणी गाडगी-मडकी घेणारे जे आहेत त्यांनी फक्त त्या ठिकाणी ती गाडगी-मडकी आणून ठेवावयाची, त्या पोलीस इन्स्पेक्टरने हे मॅनेज करावयाचे, त्यांना दररोज त्या ठिकाणी मडकी आणून ठेवण्यासाठी पोलीस इन्स्पेक्टर 100 रुपये, 200 रुपये, 500 रुपये देईल. याचा अर्थ कळत नकळत का होईना तो इन्स्पेक्टर त्या प्लॉटचे अशा प्रकारे संरक्षण करतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

हे मी आज सभागृहात बोलत आहे त्याचे कारण असे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून तक्रार केली आहे. परंतु मी स्वत: यापूर्वी अशा प्रकारच्या लेखी स्वरुपातील तक्रारी गृह विभागाकडे पाठविलेल्या आहेत. त्यासंबंधी शासनाकडून कोणतीही कार्यवाही झाल्याचे मला समजलेले नाही. त्याठिकणी शासनाचे राज्य आहे, प्रशासनाचे आहे की लोकप्रतिनिधींचे आहे की या बिल्डरांच्या टोळयांच्या हस्तकांचे आहे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी व्यक्तिश: कोणालाही दोष देऊ इच्छित नाही. मी आपल्याला या परिस्थितीची सर्वसाधारण कल्पना दिली आहे. परंतु त्याठिकाणच्या सर्व अधिका-यांची मोनोपली तयार झालेली आहे. जर शासनाला या अधिका-यांविरुध्द कारवाई करावयाची असेल तर या परिक्षेत्रामध्ये काम करणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांचे रेकॉर्ड ताबडतोब मागवून तपासावेत. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होईल तेव्हा होईल. कारण या लोकांचे संरक्षण करण्यासाठी मॅट नावाचे कोर्ट अस्तित्वात आहे. शासनाने आदेश काढले की, ते लोक मॅटमध्ये जाऊन आदेश कशाप्रकारे फिरवितात हे आपल्यालाही चांगले माहीत आहे. शासनातील प्रतिनिधींशी किंवा प्रशासनातील वरिष्ठ अधिका-यांशी माझे चांगले संबंध आहेत. या प्रशासनामध्ये निरपेक्ष भावनेतून चांगल्या प्रकारे काम करणारे आय.पी.एस.अधिकारी मला माहीत आहेत. त्यांनी तर मला असे सांगितले की, राज्य शासनाने जो कायदा केला आहे तोच मुळात चुकीचा आहे. या कायद्यानुसार त्या अधिका-यांची तीन वर्षे बदली होत नाही. दोन वर्षापर्यंत बदली न करणे येथपर्यंत ठीक होते. यापूर्वी प्रशासनातील काही अधिकारी त्यांच्याबद्दल डिफॉल्ट रिपोर्ट झाल्यानंतर त्यांची बदली झाली की ते ताबडतोब मॅटमध्ये जातात. जे काय असेल ते व्यवस्थित सेट करुन तिस-या दिवशी पुन्हा मॅटची ऑर्डर आणतात. म्हणजे कनिष्ठ दर्जाचे अधिकारी देखील तुमचे, आमचे एवढेच नव्हे तर प्रशासकीय अधिका-यांचे देखील वरिष्ठ झालेले आहेत. शासनाला हे कोठे तरी निपटून काढावे लागेल. शेवटी अशा अधिका-यांवर राज्य शासनाचा, लोकप्रतिनिधींचा, वरिष्ठ अधिका-यांचा काही तरी आदरयुक्त दरारा वा दबाव असावयास पाहिजे. पण हे अधिकारी हे सर्व कोळून प्यायलेले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

आहेत. या अधिका-यांवर निलंबनाची कारवाई करण्यासाठी मंत्रिमहोदय आपण स्वत: सन्माननीय सदस्य, पोलीस अधीक्षक यांच्याबरोबर बसून चर्चा कराल. परंतु निलंबनाची कारवाई करावयाची असेल तर त्यासाठी फार मोठी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. जर शासनाला यावर ताबडतोब मलमपट्टी करावयाची असेल तर या अधिका-यांची जी मोनोपली निर्माण झालेली आहे ती मोडून काढण्यासाठी त्यांची केंद्रे ताबडतोब हलविण्यात यावीत. यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार शासनाला आहेत. हा निर्णय आपण ताबडतोब घ्यावा आणि त्यानंतर निलंबनाच्या कारवाईला सुरुवात करावी, अन्यथा याप्रकरणी आमच्यापैकी कोणालाही न्याय मिळू शकत नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण आता ज्या गंभीरतेने वेदना या सभागृहात मांडली त्याच्याशी सहमत होताना मी केवळ दोन वाक्यात माझ्या भावना व्यक्त करतो. आपण बोलताना असे म्हणालात की, या विषयी मी सुध्दा गृह विभागाला पत्रे पाठविली आहेत. सन्माननीय उपसभापतींनी लिहिलेल्या पत्रांची दखल सुध्दा घेतली जात नाही हा या सदनाचा अवमान आहे आणि शासनाला लांच्छनास्पद आहे, राज्यकर्त्यांवर कार्यकारी अधिकारी किती दबाव टाकतात आणि मनमानी कारभार करतात हे शासनाला भूषणावह नाही. म्हणून आपल्या म्हणण्याची दखल मी स्वत: व्यक्तिश: घेतली आहे आणि म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो आहे. सन्माननीय उपसभापतींनी पाठविलेल्या पत्रांची दखल गृह विभागामार्फत कशाप्रकारे घेण्यात आली त्याचाही या सभागृहात खुलासा झाला पाहिजे. सन्माननीय उपसभापती यांनी कोणत्या तारखेला पत्र लिहिले, त्या पत्राबाबत गृह खात्याने काय कार्यवाही केली त्याची माहितीही यानिमित्ताने या सदनासमोर यावी अशी अपेक्षा करतो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आपण आता जो संताप व शल्य व्यक्त केले. त्याच्याशी आम्ही देखील सहमत आहोत. ठाणे जिल्हयासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. ठाणे जिल्हयातील काशिमिरा, मिरा रोड व भायंदर या ठिकाणीच नाही तर जिल्हयातील संपूर्ण ग्रामीण भागामध्ये हे शासन, प्रशासन सामान्य माणसांना न्याय, सज्जन माणसांना न्याय देण्यासाठी आहे की, ठाणे जिल्हा वाढत असल्याने

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

भूमाफियांना हातात हात घालून न्याय देण्यासाठी बसलेले आहे ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. निवेदनामध्ये जो तक्ता दिलेला आहे त्यामध्ये चो-या आणि घरफोडी या गुन्हयांपैकी उघड झालेले गुन्हे फार थोडे आहेत. 10 पैकी 6, 46 पैकी 10, 141 पैकी 34 गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामुळे सामान्य माणूस हतबल झालेला आहे. पोलीस खाते याकडे लक्ष न देता दुसऱ्या भानगडींकडे लक्ष देत आहे. या तीन पोलीस स्टेशन्सच्या व्यतिरिक्त पडघा येथील पोलीस स्टेशन देखील या कामामध्ये अग्रेसर आहे. मागील वर्षी तत्कालीन सन्माननीय गृह राज्यमंत्री यांनी त्यांच्या चेंबरमध्ये बैठक घेऊन नवघर पोलीस स्टेशनची निर्मिती केली जाईल आणि पदांची निर्मिती केली जाईल असे मान्य केले होते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याठिकाणी इमारत तयार आहे. परंतु पोलीस स्टेशन अजून सुरु झालेले नाही. या सर्व परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या प्रश्नांकडे गंभीरतेने पाहिले नाही तर सर्वसामान्य माणसाला वा-यावर सोडल्यासारखे होईल. म्हणून याबाबतीत मंत्री महोदयांनी निवेदन करावे.

श्री. नितीन राऊत : उपसभापती महोदय, या ठिकाणी जी माहिती देण्यात आली जे शल्य या ठिकाणी व्यक्त करण्यात आले त्याची दखल शासनातर्फे निश्चितपणे घेण्यात येईल. या प्रकरणी डिलिमिटेशनच्या दृष्टीने निश्चितपणे पावले उचलून त्या ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था कशी राखली जाईल याची काळजी घेऊ. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी नवघर पोलीस स्टेशनबाबत सांगितले. मी त्याची माहिती घेतो आणि सभागृहापुढे ठेवतो.

श्री. अरविंद सावंत : माननीय उपसभापतींनी दिलेल्या पत्रांबाबत कोणती कारवाई करण्यात आली यासंबंधीची माहिती सभागृहाला द्यावी...

उपसभापती : या ठिकाणी मी इतके ठोसपणे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी इतके व्यवस्थित सांगितल्यानंतर गृह राज्यमंत्री महोदयांनी दिलेले उत्तर हे त्यांच्या प्रकृतीला शोभणारे नव्हते. वास्तविक सन्माननीय सदस्यांनी इतकी गंभीर बाब या ठिकाणी सांगितली आणि मी देखील काही गंभीर प्रकार उदाहरणासहीत सांगितले, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी महत्वाचे प्रश्न मांडले या सर्व प्रश्नांच्या संदर्भात निश्चितपणे करु, तपासून बघून कारवाई करु अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. अशा उत्तराने दोन-चार दिवसात या प्रकरणी रिझल्ट मिळेल असे वाटत नाही. बाळासाहेब देसाईसारखे गृहमंत्री आम्ही बघितलेले आहेत. त्या मंत्र्यांसमोर जायचे म्हटले तरी अधिका-याला हजार वेळा विचार करावा लागत होता. आपण सर्वजण त्यांच्या इतके मोठे नाही. पण कधी तरी आपल्या बोलण्यामधून, चालण्यामधून, कर्तव्यामधून अधिका-यांना कमीत कमी जरब बसली पाहिजे. अधिका-यांना समजले पाहिजे की, राज्य शासन हे आमचे मालक आहे. आपण शासन आहोत, ते इम्प्लिमेंटिंग ॲथॉरिटी आहेत. आपण केलेल्या आदेशांची त्यांनी अंमलबजावणी करावयाची असते. परंतु या ठिकाणी उलट होत आहे. उत्तर काय द्यावे हा माननीय राज्यमंत्री महोदयांचा हक्क आहे. परंतु माननीय राज्यमंत्री महोदयांच्या उत्तरावर मी बिलकूल समाधानी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत : उपसभापती महोदय, मी निश्चितपणे या प्रकरणांची गंभीरतेने दखल घेतलेली आहे आणि आपल्याला ते दिसूनही येईल की निश्चितपणे कायदा आणि सुव्यस्था राखण्यामध्ये शासना तर्फे योग्य निर्देश दिले जातील. मी आधी सांगितले की, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्याबाबतीत एक बैठक घेऊन त्याच्या इप्लिमेंटेशनच्या दृष्टीने योग्य ती कारवाई करण्यात येईल....

उपसभापती : दोन-तीन लोकांनी गुन्हा केला की त्यांना मोक्का लावला जातो..

श्री. नितीन राऊत : या प्रकरणी गंभीरतेने दखल घेऊन चौकशी करुन योग्य ती कारवाई करुन माहिती पटलावर ठेवण्याविषयी मी बोललो. अधिवेशन 16 जून पर्यन्त आहे. त्याआधी योग्य ती कारवाई होईल.

उपसभापती : या प्रकरणी माननीय राज्यमंत्र्यांना खरोखर ॲक्शन घ्यावयाची असेल तर त्यानी उद्या डी.जी.ंना बैठकीसाठी बोलवावे, सन्माननीय सदस्य देखील त्या बैठकीस आवश्यकता असेल तर पुराव्यासहीत येतील.

श्री. नितीन राऊत : मी आपल्या दालनात बैठक आयोजित करतो आणि तसे आपणाला कळवितो.

श्री. संजय केळकर : नवघर पोलीस स्टेशनची इमारत तयार आहे. तेथे पोलीस स्टेशन केव्हा सुरु होणार आहे ?

श्री. नितीन राऊत : सन्माननीय सदस्यांनी नवघर पोलीस स्टेशनच्या संदर्भात येथे विचारणा केली. त्यासंदर्भातील माहिती घेऊन ती मी आपल्यापुढे ठेवतो.

....नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन राऊत...

सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी नवघर पोलीस स्टेशनच्या निर्मितीसंबंधीचा वेगळा प्रश्न विचारला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे विषय सभागृहात उपस्थित झाले आहेत, त्याबाबत मी उद्या डी.जी.यांना बोलावितो आणि त्यांचे समवेत बैठक घेतो आणि त्या बैठकीत काय चर्चा झाली यासंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. संजय केळकर : भाईंदर पोलीस स्टेशन अंतर्गत नवघर येते. नवेगाव येथे पोलीस स्टेशनसाठी इमारत तयार आहे. त्या ठिकाणी पोलीस स्टेशन कधीपर्यंत कार्यरत करण्यात येईल यासंबंधीची फक्त माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावयाची आहे. दालनामध्ये बैठक घेण्याचे कारणच नाही. माझ्या प्रश्नाचे उत्तर सभागृहातच आले पाहिजे.

उपसभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी नवघर पोलीस स्टेशनच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी स्वत: लक्ष घालतो. त्या ठिकाणी इमारत तयार आहे असे आपण म्हणालात. पोलीस स्टेशनची निर्मिती करण्यासाठी त्यांना कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन द्यावा लागेल, तसेच त्यासाठी आर्थिक तरतूदही शासनास करावी लागेल. उद्या डी.जी.समवेत बैठक घेण्यात येईल त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांना देखील बोलाविण्यात येईल. त्या बैठकीत आपण या विषयाच्या अनुषंगाने चर्चा करु आणि एकत्रितपणे निर्णय घेऊ.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, उद्या डी.जी.यांना बोलावून बैठक आयोजित केली जाणार आहे. त्या बैठकीत काय निर्णय झाले यासंबंधीची माहिती माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री. मधुकर चव्हाण : राज्य शासनाने वॉकी-टॉकी सह बीट मार्शलच्या माध्यमातून पेट्रोलिंगची पध्दत सुरु केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी म्हटले आहे की, दिवसा ढवळया महिलांच्या गळयातील सोन्याच्या चैन खेचणे, तसेच दिवसा ढवळया मारामा-या होणे, वेगवेगळया प्रकारचे गुन्हे दिवसा होत आहेत. तसे प्रकार होऊ नयेत म्हणून बीट मार्शलच्या माध्यमातून पेट्रोलिंगची पध्दत सुरु केली आहे. वॉकी-टॉकीचे बीट मार्शलने गेल्या वर्षात किती गुन्हे शोधून काढले? सध्या या बीट मार्शलचे काम फक्त हप्ते वसुली करणे एवढेच आहे. आपण डी.जी.यांच्याकडून विविध गुन्हयांची माहिती दालनात घ्याल. दिवसा ढवळया भुरटया चोरांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

रोखण्यासाठी वॉकी-टॉकी बीट मार्शलने शहरात सतत गस्त घातली पाहिजे. हे सर्व बीट मार्शल रात्रीच्या वेळी वडा-पावच्या गाडया लागलेल्या असतात, चायनीजच्या गाडया लागलेल्या असतात,त्या ठिकाणी दादागिरी करुन दारु पीत बसलेले असतात. आपण दादर पोलीस स्टेशनच्या पूर्व भागात जाऊन प्रत्यक्ष बघा. हा प्रकार ग्रामीण भागातही सुरु आहे. लोक घरी उपाशी राहतील, पण त्या लोकांना सुरक्षितता ही महत्वाची असते. अर्धपोटी राहू पण आम्ही सुरक्षित आहोत ही गोष्ट महत्वाची आहे. जे लोक श्रीमंत असतात, ते कारमधून दागिने घालून फिरत असतात. परंतु सर्वसामान्य महिलेकडे एक मंगळसूत्र असते. एखादी चेन असते. त्या महिलांच्या गळयातील मंगळसूत्र आणि चेन खेचून भुरटे चोर दिवसा ढवळया निघून जातात ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. आपण कुठे तरी सामाजिक टच दिला पाहिजे. आम्ही चौकशी करु. कारवाई करु, आम्ही हे करु, ते करु आणि निवडणुकीला जाऊ. माझा फक्त एवढाच प्रश्न आहे की, वॉकी-टॉकी बीट मार्शलने गेल्या एका वर्षात किती गुन्हे शोधून काढले आहेत ? लक्षवेधी सूचनेमध्ये जे विषय नमूद केले आहेत ते विषय डी.जी.यांना सांगा. सदस्यांनी काही उदाहरणे दिले आहेत, त्या अनुषंगाने त्यांच्याकडून माहिती घ्यावी.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, एस.पी. आणि डी.जी.यांना बोलावून घेऊन आज सभागृहात चर्चिल्या गेलेल्या सर्व प्रश्नांबद्दल चर्चा करण्यात येईल. तसेच माझ्याकडे देखील या विभागातील बरेच इश्यू आलेले आहेत. त्यावर देखील चर्चा करण्यात येईल व चर्चेसंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

उपसभापती : माझ्या समोर एक प्रश्न निर्माण झाला की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण रोज रात्री दादर स्टेशनच्या बाहेर काय करतात ?

(हशां)

श्री. मधुकर चव्हाण : त्या ठिकाणी माझे कार्यालय आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : केंद्र शासनाच्या अंत्योदय योजनेंतर्गत मिळणारे धान्य वेळेवर न मिळाल्यामुळे गरीब व आदिवासी जनतेची **झालेली** उपासमार

मु. शी. : केंद्र शासनाच्या अंत्योदय योजनेंतर्गत मिळणारे धान्य वेळेवर न मिळाल्यामुळे गरीब व आदिवासी जनतेची **झालेली** उपासमार यासंबंधी ॲड.अनिल परब ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील दारिद्रयरेषेखालील जनतेला केंद्र शासनाच्या अंत्योदय योजनेंतर्गत राज्य शासनातर्फे अत्यल्प दराने केले जाणारे एप्रिल २००९ चे सुमारे १५० कोटी किंमतीचे धान्य वाटप मे, २००९ मधील दोन आठवडे उलटूनही झाले नसल्याची गंभीर बाब नुकतीच उघडकीस येणे, आधीच्या महिन्याचे सर्व धान्य वितरित झाल्याची 'ऑनलाईन' माहिती देणे तसेच निधीचा भरणा राज्य शासनाकडून पुरविण्यात न आल्याने गरीब व आदिवासी जनतेला उक्त धान्य पुरवठयापासून वंचित रहावे लागणे, त्यामुळे गरीब व आदिवासी जनतेची झालेली उपासमार परिणामी शासन यंत्रणेविरोधात सर्वसामान्य जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व निर्माण झालेली संतापाची भावना, दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सन २००२ मध्ये पुनर्सर्वेक्षण होऊनही उक्त धान्य वाटप सन १९९७ च्या सर्वेक्षण यादीनुसार केले जात असल्याने नव्याने सामविष्ट झालेल्या अतिगरीब जनतेला उक्त सवलतीपासून वंचित रहावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, उक्त गंभीर प्रकरणी चौकशी होऊन एप्रिल, २००९ चे धान्य केंद्र शासनाकडून मिळवून त्वरित वाटप होण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने प्राथम्याने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेशचंद्र बंग (नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, राज्य शासनाची आदिवासी गरीब जनतेच्या बाबतीत धान्य वितरणाच्या बाबतीत मोठी निष्क्रीयता आहे. जी दुरावस्था आहे, त्याचे हे एक प्रतिक आहे. दारिद्रय रेषेखालील जी योजना आहे, या योजनेत राज्य शासनाचे पैसे भरावयाचे असतात. ते पैसे न भरल्यामुळे या गरीब जनतेला आज उपासमारीची वेळ आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे लिहिता आहात की, केंद्र शासनाकडे आम्ही मुदतवाढ मागितली होती. त्याप्रमाणे केंद्र शासनाने आम्हाला मुदतवाढ दिली. धान्य मे महिन्याच्या शेवटी आले....

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

ॲड.अनिल परब....

आणि त्यामध्ये म्हटले आहे की, उपासमार झाली नाही. एप्रिल महिन्याचे धान्य मे महिन्याच्या शेवटी येते. एप्रिल आणि मे महिन्यामध्ये गरीब लोक कुठून पैसे आणून धान्य घेणार? त्यामुळे सभागृहात उत्तर देताना काळजी घेतली पाहिजे. सरकारी योजनेला हरताळ फासण्याचे काम ज्या अधिकाऱ्यांनी केले त्यामुळे ज्या लोकांची उपासमार झाली त्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात?

श्री.रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, 2009-2010 या वर्षासाठी जवळपास 22 कोटी 87 लाखाची पतमर्यादा अन्नधान्य खरेदी करण्यासाठी मंजूर केली आहे. चार महिन्याचा कोटा मंजूर केला होता. त्यासाठी निधी मंजूर केलेला होता. त्याच काळामध्ये प्रामुख्याने केंद्र सरकारकडून फार मोठया प्रमाणात गहू आणि तांदूळ याची पतमर्यादा वाढवून दिली गेली. त्यामुळे बीडीएस प्रणालीमध्ये अडचण निर्माण झाली हे मी मान्य करतो. लगेच आचारसंहिता लागू झाली. आचारसंहिता उठल्यामुळे ताबडतोब बीडीएसची व्यवस्था केली गेली. राज्याचे नियतन पूर्वी 40 हजार मे.टन होते. त्या काळात एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांचे नियतन वाढले. 1.15 लाख टन धान्य वाढवून दिले. शासनाने आदेश काढले व बीडीएसची व्यवस्था केली. आर्थिक तरतूद केली गेली. गोडाऊन्स नव्हते, त्यामुळे खाजगी गोडाऊन्स घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे प्रश्न मार्गी लागला. आता व्यवस्था सुरळीत चालू आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सुरुवातीला म्हटले की, 40 हजार मे.टन इतके नियतन होते त्यामध्ये 1.15 लाख टन इतकी वाढ झाली. मंत्रीमहोदयांनी पुन्हा एकदा ते वाक्य वाचावे अशी मी विनंती करतो.

श्री.रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, पूर्वी आपल्याकडे धान्य माहे एप्रिल, 2009 ते जून, 2009 पर्यंत 5154 टन गव्हाचे आणि 2987 टन तांदळाचे मासिक नियतन मंजूर झाले होते. राज्य सरकारने माहे एप्रिल, 2009 ते जून, 2009 या काळासाठी गव्हाचे 93,500 व तांदळाचे 18423 इतके नियतन मंजूर केले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, दारिद्र्य रेषेखालील कुटंबांचे सर्वेक्षण ग्रामीण भागात ग्रामविकास विभागामार्फत तर शहरी भागात नगरविकास विभागामार्फत करण्यात येते असे म्हटले आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या निकषानुसार ग्रामविकास विभागाने 2002 च्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले असून नागरी भागातील मुंबई शिधावाटप क्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही असे निवेदनामध्ये म्हटले आहे. ही गोष्ट अत्यंत गंभीर आहे. 2002 चे सर्वेक्षण अद्याप पूर्ण झालेले नाही. नियतन अचानक वाढले. निवडणुकीचा कालावधी आल्यानंतर प्रचंड प्रमाणात नियतन वाढले, हे नियतन वाढण्याची कारणे काय आहेत? त्याच काळात बीपीएल आणि बीडीएस प्रणाली अंतर्गत रेशनकार्डे अधिक उपलब्ध झाली का? निवडणुकीच्या काळात प्रचंड प्रमाणात बोगस रेशनकार्डे उपलब्ध झाल्याच्या बातम्या सातत्याने वृत्तपत्रातून वाचावयास मिळाल्या होत्या. नियतन अचानक कसे वाढले? 2002 चे सर्वेक्षण आजतागायत का पूर्ण झाले नाही?

सभापती महोदय, मोडस ऑपरेंडी सांगू इच्छितो. झोपडपट्टीमध्ये टेंपररी वीज कनेक्शन हवे म्हणून अर्ज केला जातो.

2टी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

तात्पुरती विजेची कनेक्शन्स पुरावा म्हणून नवीन रेशन कार्ड मिळण्यासाठी हे लोक अर्ज करतात आणि रेशन कार्ड काढून घेतात. एकदा रेशन कार्ड उपलब्ध झाले की मतदार यादीत नाव येते अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी आज राज्यात विशेषत: मुंबईत चालू आहे. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी अगोदर सांगितले की, 40 हजार मे.टन एवढे नियतन होते. दोन महिन्यानंतर 1.40 लाख मे.टन एवढे नियतन अचानक कसे वाढले ? तसेच विविध योजनांखाली सन 2002 साली सर्व्हेक्षण झालेले एकूण मुंबईतील रेशन कार्ड्स किती आहेत ? सन 2007 साली झालेल्या सर्व्हेक्षणानुसार ही कार्ड्स किती आहेत ? आणि हा सर्व्हे कधी पूर्ण होणार आहे ?

श्री. रमेशचंद्र बंग : महोदय, हे नियतन एप्रिल महिन्याचे वाढलेले आहे. राज्यात ग्राम विकास विभाग आणि नगरविकास विभागाच्या माध्यमातून ग्रामपंचायती आणि शहरातील सर्व्हेक्षण केले जाते. त्यात मुंबई आणि ठाणे सोडून नगरविकास विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार 9,21,108 एवढे कार्ड्स आहेत. तसेच दि. 8 डिसेंबर, 2008 रोजी मी पदभार स्वीकारलेला आहे. यासंदर्भात आपण प्रश्न उपस्थित केला होता. त्यानुसार मुंबई आणि ठाणे मधील रेशन कार्ड्स किती यासंबंधीची माहिती मिळण्याबाबत ताबडतोब नगरविकास विभागाच्या माध्यमातून महापालिकांना निदेश देण्यात येतील.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, अंत्योदय योजनेच्या यादीच्या संदर्भात प्रत्येक गावात प्रशासन व जिल्हाधिकारी स्तरावर अंत्योदय ोजनेत श्रीमंतांचीच नावे आहेत अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात आहेत, त्यांचा निपटारा लवकर होत नाही. गरिबांची नावे यादीत नसल्यामुळे त्यांना स्वस्त दराचे धान्य मिळत नाही. केंद्रशासनाने आपल्या जाहीरनाम्यात सांगितले होते की, अंत्योदर योजनेअंतर्गत 30 किलो धान्य देण्यात येईल. त्यानुसार गावोगावी अशा याद्या तयार केल्यापरंतु दुर्दैवाने त्यामध्ये गरिबांची नांवेच नाहीत. म्हणून अशा याद्यांचे सर्व्हेक्षण ग्रामसभेच्या माध्यमातून नव्याने मंजुरी मिळवून शासन करणार काय ?

श्री. रमेशचंद्र बंग : महोदय, राज्यामध्ये दर पाच वर्षांनी सर्व्हेक्षण केले जाते. सन 1997 नंतर 2002 व आता सन 2007 मध्ये सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. हे सर्व्हेक्षणाचे काम ग्रामसेवक किंवा शिक्षकांच्या माध्यमातून गाव पातळीवर करण्यात येते तर शहरातून नगरपालिकेमार्फत केले जाते. अंत्योदय योजनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली ती विचारात घेऊन अशा याद्या पुन्हा तयार करण्यासाठी शासन पुढाकार घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : महोदय, नवी मुंबईत जी 75 हजार बोगस रेशन कार्ड्स मिळाल्याची बातमी आपण वर्तमानपत्रातून वाचली. त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, बोगस कार्डांशी आमच्या विभागाचा संबंध नाही. कारण ही सर्व कार्ड बाहेरच्या लोकांनी छापली, त्या सर्वांना पकडले आहे. त्याबाबत शासन आता कायदा करणारच आहे.....अडथळा.....कुठल्याही पक्षाचा संबंध नाही.

उपसभापती : माझ्या माहितीप्रमाणे हे प्रकरण सीबीआयकडे दिलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : बोगस कार्ड्स कोणी तयार केली व कशी केली याची माहिती सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या नवी मुंबईतील आहेत, त्यांना व कदाचित आपणासही असेल.

श्रीमती मंदा म्हात्रे : नाही, मला यासंबंधीची माहिती नाही.

उपसभापती : मीही खरेच सांगतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आमचा आपल्यावर पूर्ण विश्वास आहे. कारण आपण त्या खुर्चीत बसल्यानंतर नेहमी सत्यच बोलता.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : याबाबतीत आपल्याला जर सत्य जाणून घ्यावयाचे असेल तर आपण आणि सन्माननीय सदस्य श्री. अरविद सावंत आपण माझ्या चेंबरमध्ये नंतर या. बरे झाले मला सभागृहात हे सांगितले नाही असे आपण त्यावेळी म्हणाल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, बोगस रेशन कार्डच्या संदर्भातील जबाबदारी पोलिसांची आहे असे म्हणून हा विषय झटकून चालणार नाही. यासंदर्भात आता टेक्नॉलॉजी बदलली आहे, इलेक्ट्रॅनिक्समध्ये बदल झालेला आहे, नवीन नवीन पध्दत येत आहे, आता इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने आपण कार्ड देऊ शकतो. त्यामुळे पारंपारिक पध्दतीची, जी जुनी पध्दत आहे ती पध्दत आपण बदलणार आहत काय ? आज पासपोर्ट ऑफिसमध्ये बोगस पासपोर्ट मिळतात, व्हिसा सुध्दा बोगस मिळू शकतो. अबुसालेम पासून ते फिल्म अभिनेत्रीपर्यंत सगळे बोगस कार्ड वापरीत होते हे सिध्द झालेले आहे. रेशन कार्डची जुनाट पध्दती बदलून नवीन पध्दत सुरु करण्याच्या संदर्भात आपण काही प्रयत्न करणार आहात की, नाही ?

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, पोलीस खात्याच्या संदर्भातील एक बैठक आपल्या दालनात झाली होती त्यावेळी पोलिसांच्या व्हेरीफिकेशनशिवाय रेशन कार्ड देऊ नये अशा पध्दतीचे आदेश आपण दिले होते. या ठिकाणी रेशन कार्डच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय स्तुत्य सूचना केलेली आहे. नवीन कार्ड वाटपाच्या धोरणाची अंमलबजावणी येत्या 3 महिन्यात निश्चितपणे केली जाईल.

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी तसेच अरविंद सावंत यांनी रेशनकार्डच्या संदर्भात गांभीर्याने प्रश्न विचारलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. 75 हजार की, 7500 बोगस रेशनकार्ड ठाण्यामध्ये पकडले गेले आहेत. हे रेशन कार्ड पकडण्यात आल्यानंतर त्यासंदर्भात रीतसर गुन्हा नोंदविण्यात आला. त्यामुळे गृहराज्यमंत्र्यांनी यासंदर्भात चौकशी करुन त्याची माहिती सभागृहाला द्यावी तसेच या गुन्हयामध्ये सापडलेल्या लोकांवर जे सेक्शन लावले गेले होते ते सेक्शन बदलण्याकरिता पोलिसांवर दबाव आणण्याकरिता कोण कोण गेले होते, कधी कधी गेले होते आणि ते सेक्शन त्यांनी बदलले की, बदलले नाही याची चौकशी करुन यासंदर्भातील माहिती गृहराज्यमंत्र्यांनी उद्या सभागृहाला द्यावी अन्यथा यासंदर्भात जी काही सत्य माहिती आहे ती सत्य माहिती मी सन्माननीय सदस्यांना देईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, शिधापत्रिकेच्या संदर्भात संगणीकरणाचे काम सुरु आहे. येत्या तीन महिन्यात संगणीकरणाचे काम पूर्ण होऊन नवीन कार्ड देण्याची व्यवस्था शासनाकडून केली जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात आपण असे म्हटले आहे की, "धान्याची उचल करण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या." आता 3-4 महिन्यामध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार असल्यामुळे पुन्हा आचारसंहिता लागू होईल, पावसाळा तोंडावर आलेला आहे, आदिवासी भागात पावसाळयात धान्य पोहचतांना अनेक अडचणी निर्माण होतात त्यामुळे धान्य पोहचवण्यामध्ये अडचणी निर्माण होऊ नये म्हणून आपण काय उपाययोजना केलेली आहे तसेच वर्तमानपत्रात आम्ही अशी बातमी वाचली आहे की, आता रेशन दुकानामध्ये धान्याच्या ऐवजी पीठ दिले जाणार आहे. रेशन दुकानात पीठ दिले गेले तर त्यामध्ये भेसळ मोठया प्रमाणात होईल, लोकांपर्यंत पीठ कसे पोहचणार याबाबत मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी.

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, धान्याच्या ऐवजी पीठ देण्याच्या संदर्भातील कोणताही निर्णय शासनाने घेतलेला नाही. धान्य पोहचविण्यासाठी वाहतुकीची चांगली व्यवस्था करण्यात आलेली असल्यामुळे कोणत्याही प्रकारची अडचण भासणार नाही यासंदर्भात विभागाने दक्षता घेतलेली आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुणे शहर हे अंमली पदार्थाचे केंद्र बनत असल्याबाबत

मु. शी. : पुणे शहर हे अंमली पदार्थाचे केंद्र बनत चालणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, जयप्रकाश छाजेड, श्रीमती मधु जैन, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सांस्कृतिक व विद्येची नगरी असलेले पुणे शहर आणि परिसर हे अंमली पदार्थांची केंद्र बनले असल्याचे गेल्या काही महिन्यात निदर्शनास येणे, गांजा, चरस, आफिम इत्यादी अंमली पदार्थांचा साठा पुणे शहरात केला जाऊन छोट्या पाऊच द्वारे तो अन्यत्र पाठविला जात असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कारवाई मध्ये उघडकीस येणे, इतकेच नव्हे तर बंड गार्डन पोलीसांनी दिनांक २९ मे, २००९ कोंडवा येथे २ टन इतका मोठ्या प्रमाणावर गांज्याचा साठा पकडणे, तसेच गेल्या वर्षभरात अंमली पदार्थ विरोधी पथकाने २० ठिकाणी छापे घालून ३९ जणांना अटक करुन २६ लाख रुपये किंमतीच्या अंमली पदार्थाचा मुद्देमाल हस्तगत करणे, मात्र अशा कारवाया करुन देखील अंमली पदार्थाबाबतच्या गुन्ह्यात सातत्याने वाढ होत असल्याने पुणे परिसर हा चरस, गांजा आणि गदुर्ले यांचा अड्डा बनणे, परिणामी सांस्कृतिक शहरातील नागरिक चिंतेने ग्रस्त होणे याबाबत तातडीने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नसीम खान (गृह (शहर) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहर ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी व विद्येची नगरी आहे. आज संपूर्ण देशामध्ये दहाव्या क्रमांकाचे शहर म्हणून पुणे शहराचा उल्लेख् केला जातो. पुणे शहराची लोकसंख्या सतत वाढत आहे. पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. या राज्याचे माजी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील असोत किंवा नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात श्री.जयंत पाटील गृहमंत्री असोत त्यांनी पुणे शहराशी आणि गृहखात्याशी सबंधित असलेल्या मागण्याबाबत लवकरात लवकर या प्रश्नाची सोडवणूक करु अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. परतु सहा महिन्या पेक्षा अधिक काळ झाल्या नंतरसुध्दा ज्या लहान लहान गोष्टी आहेत त्याची देखील पूर्तता झालेली नाही. पुणे शहरात ससून हॉस्पिटल आणि यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल या दोन हॉस्पिटलमध्ये पोस्टमार्टेम करण्यात येते. पुणे शहरामध्ये महानगरपालिकेची आणि शासनाची एकूण 12 हॉस्पिटल्स आहेत .पुणे शहरामध्ये अतिरेक्यांच्या कारवाया वाढत चालल्या आहेत तसेच या देशातील सर्व राज्यातून आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरुनसुदा काही विद्यार्थी शिकण्यासाठी पुणे शहरामध्ये येत असतात असे असतांना पुणे शहरामध्ये अंमली पदार्थाचे सेवन आणि अंमली पदार्थाचे व्यवसाय वाढत चालले आहेत. पुणे शहराजवळील रेव्ह पार्टीवर मध्यंतरी धाड टाकण्यात आली होती. त्याचबरोबर 29 मे 2009 रोजी अंमली पदार्थाच्या साठयासह एका व्यक्तिला अटक करण्यात आली होती तसेच त्याच्याविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या निवेदनात जे उत्तर देण्यात आले त्यात असे म्हटलेले आहे की, "त्याला पोलीस कस्टडी घेण्यात आली होती." याच आरोपीला या गुन्हयाखाली 1998 सालापासून चार वेळा अटक करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या व्यक्तिचा मुलगासुध्दा याच प्रकरणात तसेच इतरही अनेक गुन्हयांमध्ये वॉन्टेड आहे.गेल्या पाच वर्षातील आकडेवारी या निवेदनामध्ये देण्यात आलेली आहे.या सदंर्भात मला माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे. पुणे शहरामध्ये अंमली पदार्थाचे सेवन वाढत चालले आहे तसेच अंमली पदार्थाचे व्यवहार वाढत चालले आहेत परंतु पुणें् महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका या क्षेत्रासाठी अंमली पदार्थ विरोधी जे पथक आहे त्यामध्ये एक पोलीस इन्सपेक्टर आणि 10 ते 12 कॉन्स्टेबल्स आहेत त्यांची संख्या अपुरी असल्यामुळे अंमली

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी ....

पदार्थ विरोधी कारवाया करण्यासाठी असिस्टंट पोलीस कमिशनर सारख्या अधिका-याची नेमणूक करण्यात येणार आहे काय ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की , सांस्कृतिक राजधानीचे व विद्यानगरीचे हे शहर आहे. या शहरामध्ये अंमली पदार्थाचे सेवन वाढत चालले असून ते थांबविण्यात आले पाहिजे. मी त्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत शासन गंभीर असून या प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने गेल्या पाच महिन्यात 29 केसेस नोंदविण्यात आल्या आहेत, 55 व्यक्तिना अटक केली आहे आणि 71 हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे.

नंतर श्री.सरफरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान...

सभापती महोदय,या विशेष प्रकरणासंबंधी सांगितले पाहिजे की, या एकाच माणसाला चार-चार वेळा एका प्रकरणामध्ये अटक झाली आहे असे नाही. यामध्ये एकच गुन्हा झालेला आहे. त्यापूर्वीची कोणतीही गुन्हयाची नोंद नाही. तरीसुध्दा या बाबतीत संपूर्ण माहिती घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : एकाच गुन्हयामध्ये जर तो आरोपी पकडला गेला असेल तर त्याला मोक्का लावून तडीपार करा. तो आपला जावई आहे काय? त्याला आपण धक्का मारुन हाकलून लावा.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, अंमली पदार्थाच्या व्यवहारांना आळा घालण्यासाठी पुणे शहरामध्ये एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे. त्या पथकामध्ये दोन डीसीपी यांची नियुक्ती केली आहे. 9 पी.आय. आणि 20 ऐ.पी.आय. लेव्हलच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत वेळोवेळी माहिती घेऊन अशाप्रकारचे गुन्हे करणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करण्यात येत आहे.

श्रीमती मधु जैन : सभापति महोदय, पुणे शहर के गोदामों में अमली पदार्थों के छोटे छोटे पॅकिट्स बनाकर सब जगह सप्लाय हो रहे हैं. इसको 4 बार अटक की गई है, लेकिन अभी भी उसका धन्धा चालू है. छोटे छोटे पॅकिट्स बनाकर सब जगह बेच रहे हैं. इसके बारे में सरकार कार्रवाई क्यों नहीं कर रही है ?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माहिती दिल्यानुसार चार प्रकरणे असतील तर त्यांच्यावर जरुर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, उत्तर देतांना माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सांगितले की, माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून त्याबाबत कारवाई केली जाईल. सभापती महोदय, ज्यावेळी सभागृहामध्ये माननीय सदस्य पोटतिडिकीने प्रश्न मांडतात त्यावेळी तो प्रश्न प्रथमदर्शनी बरोबर आहे हे गृहीत धरुन आपण चौकशी करावयास पाहिजे तशी चौकशी आपण करणार काय?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार त्या माणसावर एकाच गुन्हयाची नोंद झालेली आहे.त्याप्रमाणे माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीनुसार मी या ठिकाणी उत्तर दिले आहे. अशाप्रकारचा कोणताही गुन्हेगार असेल तर त्यावर जरुर कडक कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

पृ. शी. : नाशिक शहरामध्ये मोठया प्रमाणात सुरु असलेले खून व दरोडयाचे प्रकार

मु. शी. : नाशिक शहरामध्ये मोठया प्रमाणात सुरु असलेले खून व दरोडयाचे प्रकार यासंबंधी डॉ.वसंत पवार, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, विक्रम काळे, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजीया खान, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक शहर परिसरामध्ये सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात चोऱ्या, खून, दरोड्यांचे गंभीर प्रकार, यामध्ये सामील असलेले गुन्हेगार मात्र मोकाट फिरत असणे, यास प्रतिबंध घालण्यास व शांतता व सुव्यवस्था राखण्यात पोलिस प्रशासनास येत असलेले प्रचंड अपयश, नाशिक परिसर वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष अनिल ठाकरे, यांचा खून झाला असून त्याच्या मारेकऱ्यांना अद्यापही अटक केलेली नसणे, शहर परिसरात वारंवार होत असलेल्या चोऱ्या घरफोड्या व फसवणुकीच्या घटनानांमुळे नागरिकांमध्ये असलेले दहशतीचे वातावरण, श्री. राजे छत्रपती सामाजिक संस्था व स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मे, २००९ रोजी पोलिस आयुक्त, नाशिक यांच्याकडे अलिकडील काळात वेळोवेळी केलेल्या मागणी यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नसीम खान (गृह (शहर) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, नाशिक शहराच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणात चोऱ्या, खून, घरफोडया, फसवणूक करणे हे प्रकार सुरु आहेत. त्यामध्ये काही शिक्षक व डॉक्टर यांच्यावर सुध्दा हल्ले होत आहेत. ऐटीएचएम कॉलेजच्या हॉस्टेलच्या रेक्टरवर गुंडांनी हल्ला केला.त्याबाबत शिक्षकांनी मोर्चा काढला. विश्वनाथ कांबळे नावाच्या यात्रेकरुंवर हल्ला झाला.

श्री. नितीन गडकरी (खाली बसून) : आपण भाईंदरला एक सांगा, पुण्याला एक सांगा,नाशिकला एक सांगा. काय चालले आहे हे?

डॉ. वसंत पवार : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आमच्या हक्कावर कशासाठी गदा आणता? आम्हाला प्रश्न विचारु द्या. या सभागृहामध्ये प्रश्न मांडल्यानंतर त्यावर आम्हाला न्याय मिळतो अशी आमची भावना आहे. म्हणून आम्ही लक्षवेधी सूचनेच्या रुपाने याठिकाणी हा विषय मांडीत आहे. याठिकाणी हा विष्य मांडण्याचा आम्हाला पूर्णपणे हक्क आहे. आमचे आर्किटेक्ट श्री. काब्रा यांच्यावर दिवसा ढवळया हल्ला झाला व त्यांना मारहाण करण्यात आली. डॉ. रविंद्र सपकाळ यांना सुध्दा या ठिकाणी मारहाण करण्यात आली. एका रिक्शा चालकाने श्री.रविंद्र आढाव यांना सुध्दा मारहाण केली. गस्त घालणाऱ्या दोन पोलिसांपैकी एका पोलिसाचा समाजकंटकाने खून केला. आणि एक पोलीस गंभीर जखमी असून तो दवाखान्यात ॲडमिट आहे....

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचबरोबर याठिकाणी 12 कामगारांची लूटालूट करुन त्यांना मारहाण केली. एक धूम नावाची टोळी आहे . . ..

(सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी खाली बसून बोलतात.)

उपसभापती : जर सन्माननीय सदस्यांना सभागृहाचे कामकाज नीट चालवावयाचे असेल तर मी या आसनावर बसतो नाहीतर निघून जातो.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्यासाठी परवानगी दिलेली नाही.

उपसभापती : मी डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, जर सभागृहामध्ये होणाऱ्या प्रोसीडींग्जची मिनिटस् काढली तर तुम्हाला प्रश्न विचारण्याच्या बाबतीत पहिला क्रमांक मिळेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.सत्तारुढ पक्ष काय ? विरोधी पक्ष काय ? सभागृहामध्ये प्रश्न कोणी विचारावयाचे ?

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, हे बरोबर नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सत्तारुढ पक्ष . . . .हा काय तमाशा सुरु आहे ? सन्माननीय सदस्यांनी जरा कौल व शकधर यांची पुस्तके वाचावयास पाहिजेत. याठिकाणी तुम्ही तुमच्याच पक्षाचे कपडे उतरवित आहात. त्या-त्या मंत्र्यांकडे जाऊन त्यांना ओरडा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी जे काल सांगत होतो, त्याची आज येथे प्रचिती येत आहे. समोरच्या बाजूकडील सन्माननीय सदस्यांना वारंवार प्रश्न विचारण्याची संधी दिली जाते, त्यांना बोलण्याची संधी दिली जाते आणि आम्ही येथे केवळ ऐकण्याचेच काम करावयाचे काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, चार लक्षवेधी सूचनांच्या बाबतीत असे झाले. असे कसे चालेल ?

एक सन्माननीय सदस्य : परंतु आम्हाला बोलू द्या.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सत्तारुढ पक्षाने सरकारचे समर्थन करणे आणि सरकारकडे जाऊन प्रश्न सोडविणे अपेक्षित आहे. तुम्ही सभागृहात असता की नाही ? तुमचे कोणी

. . . .2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

ऐकत नाही, मंत्री तुम्हाला विचारत नाहीत. तुम्ही बोलण्यासाठी विरोधी पक्षामध्ये यावे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, असे काही नाही. असे काही असते काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सरकारचे समर्थन हे मतदानाच्या वेळेस करावयाचे असते. पण आमची देखील जनतेशी बांधिलकी आहे. त्यामुळे आम्ही जनतेचा आवाज येथे उठविणार.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आम्हाला येथे बोलू द्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ठीक आहे. बोला.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, तुम्हाला बरे वाटत असेल तर ऐकून तरी घ्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्हाला बरे वाटते. तुम्ही आमचे काम करीत आहात.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, तुम्हाला 15 मिनिटे बोलावयास मिळाले नाही म्हणून अस्वस्थ झाला आहात.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, त्याठिकाणी "धूम" नावाची टोळी असून, ती मोबाईल्स्च्या चोऱ्या करीत असते. एक "ट्रिपर" नावाची टोळी आहे. एक कुठला तरी "बॉस ग्रुप" आहे. एक "सॉक्स गँग" आहे. एक "केन ग्रुप"आहे. आम्ही अण्णाची माणसे आहोत वगैरे सांगितले जाते. परवा मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने एक विषय उपस्थित केला होता की, त्याठिकाणी 64 मोटर सायकल्स् जाळून एक प्रकारची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तीन-तीन ट्रिपल सील, 50 मोटर सायकल्स् घेऊन . . .

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, याठिकाणी श्री.नंदलाल भाऊसाहेब गोसावी हा नवविवाहित तरुण होता आणि त्याचा खून करुन, तो मृतदेह पोत्यामध्ये भरुन रस्त्यावर टाकण्यात आले. या घटनेच्या बाबतीत त्याचे नातेवाईक संशयितांची नावे देण्यास तयार आहेत, परंतु आपण ती घेत नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा, नाहीतर मी लक्षवेधी सूचनेवरील चर्चा थांबवितो.

. . . .2 एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आज सकाळी रोटरी क्लबमध्ये सर्व प्रतिष्ठित नागरिकांची एक बैठक झाली.या बैठकीसाठी पोलीस कमिशनर यांना बोलाविण्यात आले होते. त्या वेळी त्यांना असे सांगण्यात आले की, तुम्ही आमच्या सुरक्षिततेची हमी द्यावी. माझा प्रश्न असा आहे की, मुंबई परिसरातील जे गुंड हद्दपार केलेले आहेत. तसे करीत असताना त्यांना चॉईस विचारला जातो की, "तुम्हाला कुठे जावयाचे आहे?" मग मुंबईतील गुंड ठाणे, पुणे येथे जात नाहीत तर ते तीन जिल्हे सोडून जातात.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : चोर जात नाहीत का ?

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, आपल्याकडून जे काही तयार झालेले आहे, ते आमच्याकडे हद्दपार, तडीपार म्हणून येतात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आमच्याकडे हद्दपार, तडीपार झालेले गुंड आलेले आहेत, त्यांच्यावर योग्य ती देखरेख करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? हा पहिला प्रश्न आहे. नाशिक जिल्हयातील, शहरातील तडीपारीची प्रकरणे आपल्याकडे येतात, त्याबाबत आपण काही कारवाई केलेली आहे की नाही ? याबाबतीत सुध्दा माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. तसेच माझी खास विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी समक्ष नाशिक येथे येऊन नागरिकांची गाऱ्हाणी ऐकावीत. तेव्हा माननीय मंत्री महोदय नाशिक कधी येणार आहेत याची तारीख आजच जाहीर करण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवारसाहेबांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो या लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही, तो एकदम वेगळा प्रश्न आहे. तरीसुध्दा सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी नाशिकच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मुंबई, ठाणे किंवा पुणे इ. अनेक ठिकाणी जे आरोपी हद्दपार होत आहेत, ते नाशिक येथे जाऊन गैरव्यवहार करीत आहेत, क्रिमिनल ॲक्टीव्हीटीज करीत आहेत. त्याबद्दल काही उपाययोजना करावयास पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा याबाबतीत नक्की विचार करुन जी उपाययोजना करणे आवश्यक आहे, ती नक्की केली जाईल.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीत प्रत/शीघ्रलिपीची नाही

श्री. नसीम खान...

हे अधिवेशन संपल्यानंतर वेळ ठरवून त्या विभागातील सर्व सन्माननीय सदस्यांना पूर्व सूचना देऊन नाशिक शहराचा दौरा करीन आणि या विभागातील लोकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यात येतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. मागच्या आठवडयामध्ये मी नाशिकला गेलो असताना नाशिकच्या पोलीस आयुक्तांबरोबर मी चर्चा केली आणि मिटिंग घेतली त्यावेळी शासकीय पोलीस आयुक्तालयामध्ये अस्तित्वात असलेला अधिकारी आणि कर्मचारीवर्ग अपुरा आहे ही गोष्ट त्यांनी निदर्शनास आणून दिली होती. सध्या नाशिकमध्ये आयुक्तानंतरच्या दर्जाचे जे अधिकारी आहेत ते सर्वच जण बहुतांशी निवृत्तीच्या वयाकडे झुकलेले आणि वयवर्षे 55 च्या पुढचे अशा प्रकारचे आहेत त्यामुळे काम करताना त्यांची कार्यक्षमता दिसत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करुन नाशिकची पोलीस यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

श्री. नसीम खान : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय श्री. टकले साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तशी परिस्थिती नाही. आवश्यकतेनुसार अधिकाऱ्यांची नेमणूक होत असते. नाशिकला सुध्दा पोलीस अधिकारी आहेत. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे त्याप्रमाणे काळजी घेण्यात येईल.

श्री. जयप्रकाश छाजेड : श्री. वसंत पवार यांनी या ठिकाणी जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. खरे म्हणजे समोरच्या बाजूने याबाबतीत अगदी लाईटमुडमध्ये आणि हसत-खेळत घेतले जात आहे. पण नाशिक शहरामध्ये गेल्या तीन-चार महिन्यात अतिशय गंभीर घटना घडलेल्या आहेत. त्याठिकाणी दोन दिवसापूर्वी जवळपास 50 मोटारसायकली जाळण्यात आल्या आहेत. याबाबत पोलिसांकडे चौकशी करण्यात आली असता असे सांगण्यात येते की, टिप्पर गँग होती, त्यांना तडीपार केल्यामुळे सूड उगवण्यासाठी त्यांनी हे कृत्य केले आहे. सभापती महोदय, या टिप्पर गँगला फक्त एक नोटीस दिल्यानंतर ज्यांचा काही संबंध नाही अशा 40 नागरिकांच्या मोटारसायकली जाळण्यात आल्या आहेत. तसेच पंधरा दिवसापूर्वी एका पोलिसावर हल्ला झाला. त्याच्या अगोदर नाशिकरोडमध्ये एक हल्ला झाला. वारंवार अशा घटना घटत आहेत. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, ज्या टोळयांची नावे पोलिसांना माहीत आहेत, त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

श्री. जयप्रकाश छाजेड....

टोळयांचा बीमोड ज्या पोलिसांनी केला नाही त्या पोलीस अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार? कुठल्याही परिस्थितीत या टोळयांचा बीमोड झाला पाहिजे, अशा तऱ्हेची तातडीने कारवाई करण्यात यावी. त्या ठिकाणी कार्यरत असलेले अधिकारी 55 वर्षाचे आहेत की 56 वर्षाचे आहेत हा विषय महत्वाचा नाही. लोकांचा जगण्याचा विषय महत्वाचा आहे तेव्हा शासन याबाबतीत कठोरपणे कारवाई करणार आहे काय आणि ती कारवाई किती दिवसात करण्यात येणार आहे? याचे उत्तर देण्यात यावे.

श्री. नसीम खान : सन्माननीय सदस्य श्री. छाजेड साहेबानी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो खरा आहे. नाशिकमध्ये गेल्या एक-दोन महिन्यात अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. दोन दिवसापूर्वीच माझी याबाबतीत तेथील आयुक्तांबरोबर चर्चा झालेली आहे. या ठिकाण्काच्या क्रिमिनिल ॲक्टिव्हिटिज वाढत आहेत. एक-दोन ठिकाणी मोटरसायकल्स जाळण्याची प्रकरणे घडलेली आहेत. या बाबतीत तेथील क्राईमबँचच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याबरोबर चर्चा झालेली आहे. नाशिक शहरामध्ये शांतता रहावी यादृष्टिकोनातून प्लॅनिंग करुन, बातमीदार तयार करुन त्या बातमीच्या आधारावर अशा प्रकारचे जेवढे ॲन्टीसोशल एलिमेंट्स आहेत,क्रिमिनल्स आहेत त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी एक मूलभूत प्रश्न विचारला. गेली दहा पंधरा वर्षे गुन्हेगारीच्या संदर्भात वेगवेगळे लेखक लिहितात. एखादा गुंड असेल त्याला आपण हद्दपार करतो आणि नाशिकला पाठवतो. त्या ठिकाणी तो गुन्हा करतो. परदेशामध्ये काही ठिकाणी असे आहे की, ज्यांना शिक्षा झालेली नाही पण हद्दपार केलेले जे लोक आहेत त्यांचे एक वेगळे झोन बनविले जाते. ते एक प्रकारच्या जेल सारखे असते. एखाद्या 'अ' व्यक्तीने गुन्हा केल्यानंतर त्याला नाशिकमध्ये हद्दपार केल्यानंतर तो त्या ठिकाणी गुन्हा करणार. हा राजकारणाचा विषय नाही. आता तीनही विषय सत्ताधारी पक्षाकडून आले. त्याबाबत ते लाईटली बोलले नाहीत. माझा प्रश्न असा आहे की, मिरा-भाईंदर, पुणे, नाशिक या सगळ्या महत्वाच्या शहरात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या टोळ्या वाढत आहेत. याचा शासनाने गांभीर्याने विचार करुन त्वरित एक उच्चस्तरीय समिती करुन ज्या शहरांमध्ये गुन्हेगारी वाढली आहे त्याच्यावर नियंत्रण करण्यासाठी त्वरित पावले उचलणार काय ? समितीच्या संदर्भात काय केले याबाबतची माहिती 16 तारखेच्या आत पटलावर ठेवणार काय ?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, समिती गठीत करण्याचा प्रश्नच नाही. कारण प्रत्येक ठिकाणी ग्रामीण भागामध्ये, जिल्ह्यामध्ये, शहरामध्ये तशा प्रकारचे अधिकारी आहेत आणि ठिकठिकाणी त्याचा आढावा घेतला जात असतो. जे लोक हद्दपार झाल्यानंतर दुसऱ्या शहरामध्ये जातात आणि तेथे गुन्हेगारी ॲक्टिव्हिटीज करतात त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, त्याकरिता एक वेगळा झोन करावा. आपल्या देशामध्ये अजून अशा प्रकारची कोणतीही तरतूद नाही. तरी सुध्दा याची माहिती मागविण्यात येईल्.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आता आम्हाला खूप उत्साह मिळाला. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे फार समाधान झाले. अधिकारी फार उत्तम काम करीत आहेत आणि एकदंर फार चांगले काम सुरु आहे. लक्ष्मीदर्शनाचा कार्यक्रम सगळीकडे व्यवस्थित सुरु आहे. मी आता समाधान व्यक्त केले आहे त्यामुळे आपण पुढची लक्षवेधी सूचना घ्यावी.

उपसभापती : नाशिकमध्ये जे अधिकारी आहेत त्यांना तिकडून तडीपार करावयाचे असे आपले म्हणणे आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी फक्त एकच सांगू इच्छितो की, या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या लक्षात घेऊन आपण योग्य ती कार्यवाही कराल ही गोष्ट नक्की आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी किंवा सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी एक चांगली सूचना केली. शक्य झाल्यास आपण दोन-तीन दिवसामध्ये त्या ठिकाणी मुद्दाम भेट द्यावी. आपण नाकरिकांना जरुर दिलासा द्यावा असे मला या ठिकाणी सूचवावयाचे आहे.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, नक्की.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील काही जिल्ह्यात पवनचक्क्यांसाठी पवन ऊर्जा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणे

मु. शी. : राज्यातील काही जिल्ह्यात पवनचक्क्यांसाठी पवन ऊर्जा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपरिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कवठेमहांकाळ, जत, तासगांव, खानापूर, शिराळा (जिल्हा सांगली), सांगोला (जि. सोलापूर) आणि सातारा, धुळे, नंदूरबार, नाशिक या जिल्ह्यात पवनचक्क्यांसाठी पवन ऊर्जा कंपनीकडून शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणे, यासंदर्भात राज्य शासनाने पवन ऊर्जा प्रकल्पास उद्योगाचा दर्जा देणे, या प्रकल्पासाठी औद्योगिक विकास अधिनियम, 1961 अन्वये महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने उपरोक्त ठिकाणच्या जमिनी संपादित करुन शेतकऱ्यांना या प्रकल्पात हिस्सेदारी न देणे, अन्य राज्यातील शेतकऱ्यांना पवन ऊर्जा प्रकल्पामध्ये भाडेपट्टी मिळणे, त्याच धर्तीवर राज्यातील शेतकऱ्यांच्या भाडेपट्टीचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे असे गत सत्रात दिलेल्या उत्तरात शासनाने आश्वासन देणे, याबाबत उद्योग विभागाने गेल्या अनेक वर्षापासून ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे असे सांगणे, तसेच शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पात गेल्या आहेत अशा शेतकऱ्यांच्या किमान दोन मुलांना सामावून न घेणे, कर्मचाऱ्यांना औद्योगिक कायद्याप्रमाणे कोणत्यांही सुविधा न मिळणे, परिणामी राज्यातील शेतकरी व कामगार यांच्यामध्ये वेळोवेळी तीव्र संघर्ष होत असणे, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. विनय कोरे (अपारंपरिक ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....5 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, राज्यातील सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, तासगाव, खानापूर, शिराळा त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामधील सांगोला, सातारा जिल्हा तसेच धुळे, नंदूरबार, नाशिक या जिल्ह्यांमध्ये पवनचक्क्याच्या माध्यमातून जी जमीन संपादित झाली त्यामध्ये उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांबाबत ही लक्षवेधी सूचना आहे. गेली पाच वर्षे सतत ही लक्षवेधी सूचना या सभागृहामध्ये येत आहे. पाच पाच वर्षे लक्षवेधी सूचना चर्चेला येऊन सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी प्रत्येक वेळी या लक्षवेधीला आता धोरण ठरवू, मग धोरण ठरवू अशी थातूरमातूर उत्तरे दिली असताना या शेतकऱ्यांना न्याय देण्यामध्ये हे सरकार सपशेल अपयशी ठरलेले आहे असा आरोप मी या माध्यमातून करीत आहे. या जमिनी दुष्काळी भागातील आहेत. हजारो शेकतरी उद्ध्वस्त झालेले आहेत. आपण या लक्षवेधीला थोडा वेळ द्यावा. या लक्षवेधीला पाच वर्षे होऊनही अजून न्याय मिळालेला नाही. या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन आहे. या शेतकऱ्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. माझी त्या शेतकऱ्यांच्या वतीने हात जोडून विनंती आहे. या दुष्काळी पट्टयातील शेतकऱ्यांना असे वाटले की, या भागामध्ये चार ते पाच हजार कोटीचा वीज प्रकल्प पवनचक्क्यांच्या माध्यमातून उभा राहिला आणि एवढा मोठा प्रकल्प आल्यामुळे आपल्याला सोन्याचे दिवस येतील. परंतु उलट झाले. शेतामध्ये विजेचा मळा निर्माण झाला पण विजेच्या मळ्यामध्ये या शेतकऱ्यांचे आयुष्य मात्र अंधारात लोटले गेले. या शेतकऱ्यांचे आयुष्य अंधारात लोटण्याला महाराष्ट्र शासन जबाबदार आहे. मी गेली पाच वर्षे मागणी करीत आहे की, शेतकऱ्यांच्या या जमिनी भाडेपट्टयाने दिल्या जाव्यात. त्यांना प्रत्येक वेळेला भाडे द्यावे अशी मी मागणी करीत आहे. त्याच्या कुटुंबातील प्रत्येकी दोन व्यक्तींना नोकरी मिळावी इतकी साधी मागणी गेली पाच वर्षे मी करीत आहे. या पवनचक्क्या कोणाच्या आहेत ? आपण ऐकले तर आपले मन अस्वस्थ होईल. ज्या धनदांडग्यांच्या या पवनचक्क्या आहेत त्यामध्ये नटनट्या आहेत. ऐश्वर्या राय सारख्या नट्या सुध्दा यामध्ये इन्व्हॉल्व आहेत.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

काही मंत्री आहेत. या पवन चक्क्यांसाठी ज्या जमिनी संपादित केल्या त्यामध्ये 3500 घोटाळे झाले आहेत. जमीन खरेदी-विक्रीमध्ये घोटाळे झालेले असल्यामुळे त्या जमिनी परत करणार काय, त्यांचे व्यवहार रद्द करणार काय ? त्याचप्रमाणे डिसेंबरमध्ये नागपूर येथील अधिवेशनात एक महिन्याच्या आत पवन चक्क्यांबद्दल धोरण निश्चित करण्यात येईल, भाडेपट्टा ठरविण्यात येईल असे आश्वासन दिले होते. ते आश्वासन पाळले जाईल काय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी भाडेपट्टा निश्चित केला जाईल काय ? तेथील जमिनीचे एकरी 25 लाख रुपये, 35 लाख रुपये या दराप्रमाणे खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले आहेत. त्यासाठी त्यांनी केंद्र सरकारकडून अनुदान उकळले आहे. त्यातून केंद्र सरकारची, राज्य सरकारची, शेतक-यांची फसवणूक झाली आहे. यामध्ये मोठे घोटाळे झाले आहेत. त्याची न्यायालयीन चौकशी करुन संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करणार काय, शेतक-यांच्या दोन मुलांना नोकरी देणार काय, जमिनीचा भाडेपट्टा ठरविण्यात येणार काय ?

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी पवन चक्क्यांच्या जमिनींसंबंधी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. मला प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, पवन चक्क्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात जी गुंतवणूक आली ती ज्या भागात आजपर्यंत कोणताही विकास पोहोचला नव्हता, ज्या भागाला इंटेरिअर असे म्हणता येईल, जो भाग विकासापासून वंचित राहिला होता त्या भागामध्ये गुंतवणूक आली आहे. आतापर्यंत पवन चक्की उभारण्यासाठी जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले ते शेतकरी व कंपन्या या दोघांच्या समन्वयातून हे व्यवहार पार पडले आहेत. हे व्यवहार करीत असताना काही ठिकाणी गैरव्यवहाराचा प्रकार आढळून आला आहे. म्हणून सांगली जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी ज्याला फास्ट ट्रॅक कोर्ट म्हणता येईल अशा कोर्टांची निर्मिती केली. या कंपन्यांना त्यांच्याकडे काही पैसे डिपॉझिट करावयास सांगितले होते. यासंबंधी आलेल्या तक्रारींपैकी ज्या तक्रारी योग्य वाटल्या अशा तक्रारींच्या अनुषंगाने फसवसणूक झालेल्या शेतक-यांना 38 लाख रुपये मोबदला देण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे. त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे सुध्दा दाखल केलेले आहेत. शासनाकडून या कंपन्यांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे....

इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून रिफंड जाणे आवश्यक आहे. त्यापैकी आजपर्यंत कोणताही पैसा त्यांना दिलेला नाही. या सगळया खरेदीचा व्यवहार योग्य असल्याचा दाखला जिल्हाधिका-यांकडून आणावा त्यानंतरच रिफंड मिळू शकेल अशाप्रकारची अट घातली आहे. सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांनी उल्लेख करताना असे म्हटले की, शासनाने मागील अधिवेशनामध्ये याबाबत घोषणा केली होती. या जमिनी एमआयडीसीच्या ॲक्टनुसार संपादित करता येतील काय, सेझमध्ये, सिडको वा म्हाडामध्ये जमीन विकसित झाल्यानंतर भूमिपुत्रांना 5 टक्के किंवा 10 टक्के जमिनीचा मोबदला दिला जातो. तशाप्रकारे भूमिपुत्रांना मोबदला मिळणारी एखादी योजना आखता येईल काय यादृष्टीने सकारात्मक भूमिका मी जाहीर केली होती. तशा प्रकारचा प्रस्ताव अपारंपारिक ऊर्जा विभागाकडून उद्योग विभागाकडे गेला आहे. या प्रस्तावावर विचार होण्यास वेळ लागला ही वस्तुस्थिती मान्य करतो. आजच सकाळी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. या लक्षवेधीच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा झाली त्यामुळे येणा-या 8-10 दिवसाच्या आत शासन नवीन धोरण निश्चित करील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांच्या काही गोष्टींशी मी सहमत आहे. महाराष्ट्रामध्ये ऊर्जा निर्मिती व्हावी, नवीन गुंतवणूक यावी, अशाप्रकारच्या पवन चक्क्या निर्माण व्हाव्या, त्यातून जास्तीत जास्त वीज निर्माण व्हावी हे धोरण योग्य आहे. या पवन चक्क्यांसाठी ग्रामीण भागातील शेतक-यांच्या, आदिवासींच्या जमिनी घेतल्या आहेत. त्याचा पुरावा मी आणला आहे. मी सात बारासहित सर्व रेकॉर्ड आणले आहे. या जमिनीच्या व्यवहारामध्ये शेतक-यांची फसवणूक झाली आहे त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. शासनाने या पवन चक्क्या उभ्या कराव्या, त्यातून वीज निर्माण करावी, त्यांना सवलती द्याव्या. धुळे व नंदुरबार जिल्हयामध्ये सुझलॉन कंपनीने ऐश्वर्या राय, ट्विंकल खन्ना व श्री.अमरसिंग यांच्या नावाने मोठया प्रमाणावर शेत जमिनी विकत घेतल्या आहेत. सदर कंपनीने 7 हजार, 15 हजार, 20 हजार या दराने जमिनी घेतलेल्या आहेत. माझ्याकडे सातबाराचे सर्व पुरावे आहेत. एकही नाव मी पुराव्याशिवाय घेत नाही. आज सर्व पुरावे मी शासनाला देतो.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी.....

या गंतवणूकदारांनी 12 लाख, 18लाख, 24 लाख, 36 लाख रु. दराने जमिनी विकत घेतल्या. मागासवर्गीय व आदिवासी शेतक-यांची फसवणूक करुन सुमारे 250 ते 300 कोटी रुपयामध्ये 1 लाख हेक्टर जमिनी विकत घेऊन त्या जमिनी पवन उर्जा निर्मिती कंपनीला सुमारे 5 हजार कोटी रुपयांना विकल्या आहेत. ऐश्वर्या राय, ट्विंकल खन्ना व अमरसिंह हे मोठे गुंतवणूकदार असून अशा सुजलॉन कंपनीमध्ये 213 गुंतवणूकदार आहेत. धुळे, नंदूरबार जिल्ह्यात तर पवनचक्क्या उभ्याच केल्या. तेथील जमिनी मागासवर्गीय आणि आदिवासी शेतक-यांच्या आहेत. परवा या कंपनीने तेथे सेक्युरिटी गार्डस् आणले आणि त्यांनी तेथील आदिवासी आणि दलित लोकांना मारहाण केली. त्यांना झोडपले. पोलीस त्यांची तक्रार घ्यायला तयार नाहीत. कोणी कारवाई करायला तयार नाही. माझ्याकडे पुरावे आहेत. ॲग्रीमेंट ऑफ सेलची प्रत आहे. याप्रकरणाची सर्व डिटेल माहिती माझ्याकडे आहे.

मौजा ढंढाणे, ता. जि. नंदूरबार येथील गट क्र. 10/अ/2 - एकूण क्षेत्रफळ 1.24 हे. -ॲग्रीमेंट टू सेल- पावती क्रमांक 5536 व 5537 - सदर जमीन 82 हजार रुपयात भंटू आनंदा ठाकरे या शेतमालकाकडून सर्जन रियालिटिज लि. पुणे अधिकृत प्रतिनिधी जयवंत वामन भोसले, प्लॉट न. 285/10कोरेगाव पार्क, सिंग मोटर्स, पुणे, शेतमालकाचे मुखत्यारपत्र - जयवंत वामन भोसले, शेतजमीन विकत घेणारी कंपनी -ऐश्वर्या रॉय-बच्चन, 12 ला मेंट, मिस्त्री पार्क, खंडेश्वर टेम्पल रोड, बांद्रा (प.) मुंबई, अधिकृत प्रतिनिधी दशरथ निकम. त्यानंतर मौजा ढंढाणे, ता. जि. नंदूरबार येथील गट क्र. 27/1/अ - पावती क्रमांक 4800. मूळ मालक - मनोहर तुकाराम ठाकरे याच्याकडून सर्जन रियालिटीज लि. पुणे अधिकृत प्रतिनिधी अविनाश राजाराम नलावडे प्लॉट नं. 285/10 कोरेगाव पार्क, सिंग मोटर्स, पुणे- शेतमालकाचे मुख्यत्यारपत्र - जयवंत वामन भोसले मे.ट्विकल इन्व्हायरोटेक लि. मुंबई, अधिकृत प्रतिनिधी शंकर दशरथ निकम. त्यानंतर गट कमांक 27/2, शेतमालक विष्णू तुकाराम ठाकरे, सर्जन रियालिटिज लि. पुणे, मुख्यत्यारपत्र अविनाश राजाराम नलावडे ..(अडथळा) ...

सभापती महोदय, यासंदर्भात विधानसभेमध्ये मंत्री महोदयांना प्रश्न विचारण्यात आलेला असताना मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यामध्ये ऐश्वर्या रॉय हे नाव आलेले आहे. पवनचक्कीवर अे राय असे नाव आहे. तिघांचे पत्ते, 7/12, त्यांची पत्रे आणि जमिनीचे सर्व उत्तारे यांच्या प्रती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

माझ्याकडे आहेत. हे पुरावे शंभरटक्के खरे आहेत. या प्रकल्पाबाबत मागे मी मंत्री महोदयांना विचारले होते. त्यावेळी ती जमीन ताबडतोब सीकॉमकडे गहाण टाकली. महार इनामाची जमीन असा उल्लेख असताना सदर जमीन सुजलॉन कंपनीने विकत घेतली. सगळी लूट सुरु आहे. या प्रकरणी तीन-तीन चार-चार हजार कोटीचे व्यवहार झाले.शासनाच्या नियमाप्रमाणे महार इनामाच्या जमिनी, आदिवासींच्या जमिनी विकत घेता येत नाहीत. 5 डिसेंबर 2005 पासून मूळ शेतकरी भूमिहीन झालेला आहे. याला जबाबदार कोण आहे ? सेक्शन महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू ॲक्टमध्ये बदल करण्याचा अधिकार कुणाला आहे काय ? मी आपणाला पाहिजे ते कागद देतो. माझा प्रश्न असा आहे की, मंत्री महोदयांच्या विभागामध्ये या सर्व व्यवहारात फ्रॉड सुरु आहे. माननीय मंत्री महोदयांचा या प्रकरणाशी संबंध नाही. परंतु या प्रकरणी महसूल आणि अन्य विभागांनी गोंधळ घातलेला आहे. आपणाला पाहिजे असतील ते कागद मी द्यायला तयार आहे. या सर्व लोकांनी महार वतनाच्या जमिनी आणि आदिवासींच्या जमिनी विकत घेतल्या. त्याबाबतीत फक्त ॲग्रीमेंट ऑफ सेल आहे. तहसीलदारांनी चुकीच्या नोंदी केल्या, ॲग्रीमेंट ऑफ सेलवर 7/12 बदलले. बदल करण्यासाठी मंत्र्यांचे फोन गेले. महार वतनाच्या जमिनींची, आदिवासींच्या जमिनींची तुम्ही लूट केली. हे राज्यामध्ये काय चालू आहे ? सभापती महोदय, मी आपणास सर्व पुरावे देतो. माझ्या बोलण्यातील एक शब्द जरी खोटा ठरला तरी आपण सांगाल ते हरायला मी तयार आहे. माझे याबाबतीत असे सांगणे आहे की, शासनाने असा कायदा करावा की, जेथे पवनचक्की उभी राहील तेथे महिन्याला 1 लाख रुपये एका पवनचक्कीमागे मूळ शेतमालकाला मिळाले पाहिजेत. पवनचक्कीवाले करोडे रुपये कमावितात आणि गरीब शेतमालकाला काही नाही ! त्याला कमीत कमी महिन्याला 1 लाख रुपये मिळायला पाहिजेत. या पवनचक्क्यावाल्यांना खूप फायदा होतो. एक-एक कोटी रुपयाच्या सबसिडी घेतल्या जातात. सिकॉममध्ये गहाण टाकलेल्या जमिनीची किमत दोन-दोन कोटी रुपये दाखविण्यात येते. दोन-दोन कोटी रुपये कर्ज घेतले जाते आणि गरीब आदिवासींच्या जमिनी, दलितांच्या जमिनी हजार रुपयांना घेतल्या जातात. हा सर्व फ्रॉड आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी सी.आय.डी.मार्फत करण्यात येणार आहे काय ? तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विचारल्याप्रमाणे ज्या आदिवासींच्या जमिनी घेतलेल्या आहेत, ज्यांच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....

महारवतनाच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्यांना प्रत्येकाला किंवा त्यांच्या वारसाला एका पवनचक्की मागे महिना एक लाख रुपये मिळाले पाहिजेत असा धोरणात्मक निर्णय घेऊन त्याला रेट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट द्या. गरीब आदिवासींचे शोषण करणारा हा कोण सुजलॉन आहे ?

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

या राज्यात पवनचक्क्या उभ्या राहिल्या पाहिजेत. मोठया प्रमाणात वीज निर्माण झाली पाहिजे. धोरणाला प्रोत्साहन दिले पाहिजे. पण हे एक्स्प्लॉयटेशन आहे. हा तर सावकारापेक्षाही भयंकर प्रकार आहे. सिनेमातील नट नटयांनी तेथे जावयाचे, हजारो रुपये दराने गरीब आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करावयाच्या आणि त्यांच्या जमिनीवर मात्र करोडो रुपये कमावयाचे असा प्रकार चालू आहे. तसेच त्यावर एक्झम्शन घ्यावयाचे. यात अजून मोठमोठया लोकांची नावे आहेत, परंतु ती नावे मी या ठिकाणी वाचली नाहीत. माझ्याकडे या प्रकरणाची सर्व कागदपत्रे तयार आहेत. सभापती महोदय, आपण मला आपल्या दालनात बोलवा आणि सगळी कागदपत्रे पहावीत. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, धुळे, नंदुरबार क्षेत्रातल्या यासंबंधीच्या सर्व व्यवहाराचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत. या व्यवहारामध्ये महसूल विभागाचे अधिकारी गुंतलेले आहेत. स्थानिक पोलिसांचा त्यांना सपोर्ट आहे. महसूल विभागाच्या अधिका-यांकडून असत्य कागदपत्रे दिली गेली आहेत. असत्य नावे नोंदविली गेली आहेत. त्या जमिनींच्या 7/12 मध्ये मोठया प्रमाणात बदल केले गेले आहेत. या सगळया गोष्टी मोठमोठया व्यक्तींनी केल्या आहेत. मंत्रालयातून दबाव टाकून तेथे निर्णय घेतले गेले आहेत. या सर्व प्रकरणाची सी.आय.डी. कडून चौकशी करण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या पवनचक्क्या होतील वा पूर्वी झाल्या असतील त्या पवनचक्क्या महार वतनाच्या जमिनीत असोत, आदिवासींच्या जमिनीत असोत, हे गरीब लोक आहेत, त्यांच्या अंगावर कपडे नाहीत. ते लोक अजूनही नंगे फिरत आहेत. ही वस्तुस्थिती तेथील लोकप्रतिनधींना विचारा. त्या विभागात काय चालले आहे याबाबतची परिस्थिती तेथील लोकप्रतिनिधींना विचारा. पवनचक्क्या काढणारे मालक हेलिकॉप्टरने तेथे व्हिजिट करीत आहेत. ही गोष्ट बरोबर नाही. हा एक सामाजिक अन्याय आहे. ज्या शेतक-यांच्या जमिनी पवनचक्क्यांखाली गेल्या असतील, त्या शेतक-यांना एका पवनचक्कीमागे दरमहा 1 लाख रुपये देण्यात यावे. त्या शेतक-यांना 12 महिन्यांचे 12 लाख रुपये मिळतील. त्या 12 लाख रुपयांवर त्या शेतक-यांना 12 कोटी रुपये कमावू द्या. तो शेतकरी गरीब आहे. अशिक्षित आहे. तो अज्ञानी आहे म्हणून त्याला लुटावयाचे काम तुम्ही करावयाचे हे योग्य नाही. प्रत्येक पवनचक्कीच्या माध्यमातून त्या शेतक-यांना 1 लाख रुपये दरमहा देण्यात येतील काय ? सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

शेंडगे सांगितले की, सांगली जिल्हयातील ज्या शेतक-यांच्या जमिनी पवनचक्क्यांसाठी दिल्या गेल्या, त्या शेतक-यांना 38 लाख रुपये देण्यात आले. सांगली जिल्हयातील जमिनीच्या बाबतीत 38 लाख रुपये म्हणजे काय खसखस आहे ? आज सांगली जिल्हयातील जमिनींच्या काय किंमती आहेत ? किती रुपयांची वीज तयार करतात ? इकॉनॉमिकल व्हायबिलिटी किती आहे ? पैसे किती मिळतात ? इन्कम टॅक्स रिबेट किती मिळाला ? एक्झम्शन किती घेतले ? मला वाटते की, हे जे काही होत आहे ते योग्य नाही. या प्रकरणाची चौकशी करावी. तसेच या धोरणाच्या अनुषंगाने उद्योग विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता. यासंदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी शासन ठोस निर्णय करणार काय आणि या गरीब माणसांना न्याय देण्यात येईल काय ?

श्री. विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ज्याप्रकारे हा विषय येथे मांडला त्यासंदर्भात खरे तर मला त्यांच्याबद्दल आदर राखून या ठिकाणी सांगितले पाहिजे की, या विषयाला मोठे स्वरुप देण्याचा प्रयत्न या ठिकाणी झाला. यासंबंधी चौकशी करण्याबाबतच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. कुठल्याही पातळीवर याची चौकशी करण्यास आमची कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. प्रामुख्याने मला एकच गोष्ट या ठिकाणी सांगावयाची आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात आतापर्यंत या प्रकल्पांतर्गत साडेनऊ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. जर जमीन खरेदीतच पाच हजार कोटी रुपये आले असतील तर हे प्रमाण कुठे तरी व्यस्त दिसते आहे. 7 हजार रुपयाने जमीन घेतली आणि 18 लाख रुपयाने विकली. ती जमीन त्या भावाने खरोखर विकली गेली असती तर त्या परिसरातील रेडी रेकनरचा दर तसा दिसून आला असता. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांना सांगू इच्छितो की, तुमचे बोलणे चालू असताना मी काहीही बोललो नाही. म्हणून माझे म्हणणे संपूर्णपणे ऐकून घेतले तर बरे होईल. जर तेथील जमीन प्रत्यक्षपणाने त्या किंमतीत विकली गेली असती तर रेडी रेकनरचा दर 18 लाख रुपये झाला असता. भविष्यातील सगळया जमिनी 18 लाखाच्या खाली स्टॅम्प ड्युटी न भरता खरेदी करता आल्या नसत्या. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गडकरी यांनी यासंबंधीचे रेकॉर्ड आपल्यासमोर ठेवले आहे. ते रेकॉर्ड मी निश्चितपणे बघितलेले नाही. पण या ज्या किंमती आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की,

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे...

तेथील जमीन डेव्हलप केली त्यावर अनेक प्रकारचे खर्च केले तसेच ते प्रकल्प डेव्हलप करण्यासाठी जी यंत्रणा लागली या सगळयाच्या अनुषंगाने 18 लाख रुपये खर्च झाला असण्याची शक्यता आहे. यात काही गैरव्यवहार झाला असेल तर त्याची चौकशी कुठल्याही एजन्सी मार्फत करण्यास माझी तयारी आहे. त्यात कुठलीही शंका बाळगण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांनी महार वतनाच्या जमिनी संदर्भातील विषय मांडला आहे. या दोन्ही जमिनीवर विकास करण्यासाठी शासन त्या ठिकाणी वस्तुस्थिती पाहून परवानगी देऊ शकते. एकंदर आज पवनऊर्जेचा विकास झाला आहे, त्या जमिनी किती याचा जर आपण हिशोब मांडावयास गेलो तर 0.01 टक्के सुध्दा अशा जमिनी त्यात असणार नाहीत. तिसरा भाडेपट्टयाचा महत्वाचा विषय सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मांडला आहे. या विषयाशी मी स्वत: सहमत आहे. मी मघाशी माझ्या उत्तरात सांगितले की, सेझमध्ये किंवा सिडकोमध्ये जसा भूमिपुत्राला डेव्हलपमेंट नंतरचा वाटा देतो तसा याही शेतक-याला वाटा मिळाला पाहिजे या अनुषंगाने सरकार धोरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. खरे तर मागच्या काळात विन्ड मिल्स झाल्या. तेथील प्रकल्पग्रस्तांना देखील लाभ मिळावा अशी जी भावना व्यक्त केली त्याही बाबतीत आम्ही बैठका घेतल्या आहेत. प्रत्यक्षपणाने सुजलॉन, इनरकॉन, व्हेस्टॉन अशा डेव्हलपमेंट करणाऱ्या कंपन्या आहेत.

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.... श्री.विनय कोरे.....

आणि आज इन्व्हेस्टर्स म्हणून प्रत्यक्षपणाने त्या विंडमिलचा किंवा जमिनीचा ताबा कोणाकडे आहे त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी ऐश्वर्या रॉय आणि इतर नटनट्या, उद्योजक यांचे नाव घेतले. जे इन्कम टॅक्स भरतात ते त्यांच्याकडून आय.टी.मेजर डिप्रिसिएशन अक्सीलरेट होते आणि त्यातून ही गुंतवणूक केली जाते. संपत्ती इन्व्हेस्टरच्या मालकीची झाली आहे. महाराष्ट्रात जिथे जिथे आंदोलने झाली, लोकांनी रोष व्यक्त केला, विंडमिल ताब्यात घेतल्या, या सगळ्या पार्श्वभूमीवर सगळ्या इन्व्हेस्टर्सना या सगळ्या डेव्हलपर्सनी पत्र लिहावे आणि यातील काही वाटा भूमिपुत्रांना देण्यासंबंधी मार्ग काढावा अशा सूचना दिल्या आहेत. सगळ्या डेव्हलपर्सनी त्यांच्या इन्व्हेस्टर्सशी पत्रव्यवहार सुरु केला आहे. त्याबाबत सकारात्मक काय करता येईल यासाठी सरकार प्रयत्न करेल.

श्री.नितीन गडकरी : ॲग्रीमेंट फॉर सेल केले. रजिस्ट्री केली आहे. माझ्याजवळ रजिस्ट्र्या आहेत. यांच्या नावाने यांनी केलेले फेरफार आहेत. ॲग्रीमेंट ऑफ सेलवर यांनी व्हॅल्यूअरकडून व्हॅल्यूएशन काढायचे. मंत्रीमहोदय, मी स्वत: बिझिनेस मॅनेजमेंटचा डिप्लोमा केला आहे. तुमचाही अभ्यास आहे याची मला माहिती आहे. हे खोटे व्हॅल्यूएशन सर्टिफिकेट घेतले. त्यांना करु द्या. सगळे गुन्हे त्यांचे माफ करा. परंतु जो तेथील भूमिपुत्र आहे त्याला मध्यस्थी करुन तुम्ही यांचे नाक दाबा. या प्रकरणाची सीआयडी चौकशी करुन दोन-तीन महिन्यात अहवाल घ्या. मी पवनऊर्जेच्या धोरणाला प्रोत्साहन दिले पाहिजे या मताचा आहे. या क्षेत्रामध्ये उद्योगपती किंवा नटनट्या आय.टी.रिबेट मिळतो म्हणून पुढे येत आहेत त्यांना प्रोत्साहित केले पाहिजे या मताचा मी आहे. पॉवर जनरेशन वाढले पाहिजे या मताचा मी आहे. माजी विधानपरिषद सदस्य श्री.कन्हेय्यालाल गिडवाणी यांनी सभागृहात या संदर्भात आक्षेप घेतला होता. त्यांचे म्हणणे होते की, या विंडमिलमुळे पाऊस कमी पडतो. परंतु मी त्यांच्या विरोधात बोललो. पवनचक्क्या झाल्या पाहिजेत, ऊर्जा निर्मिती झाली पाहिजे यामुळे मी यांच्या बाजूने आहे. त्यांना काही असले तरी ते माफ करा. जो भूमिपुत्र आहे, फाटके कपडे घालून फिरतो त्यांना काही नाही. महार वतनी, आदिवासी, मागासवर्गीय आहेत त्यांना न्याय द्या. ॲग्रीमेंट ऑफ सेल रजिस्टर्ड झाले नाही. सरकारचा महसूल बुडविला, हे भयंकर प्रकरण आहे. सभापती महोदय, मी दिलेल्या कागदपत्रांची

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-6.... श्री.नितीन गडकरी.....

चौकशी सीआयडीकडून होणार का? नवीन धोरणामध्ये प्रत्यक्ष भूमिपुत्र आहेत, तुमच्या धोरणाची पॉझिटिव्ह तारीफ मी केली. पवनऊर्जा वाढली पाहिजे. महाराष्ट्रावर विजेचे संकट आलेले आहे. अपारंपारिक उर्जा क्षेत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे हे मला मान्य आहे. परंतु भूमिपुत्र आहे त्याला गाडून टाकायचे. ते 20 कोटी कमावणार असतील तर त्यातील 2 लाख रुपये द्यायला काय हरकत आहे? शासन याबाबत निर्णय करणार का? या संदर्भातील चौकशी सीआयडीकडे सोपविणार आहात का?

श्री.विनय कोरे : भूमिपुत्रांना त्या डेव्हलपमेंटमधील हिस्सा मिळाला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. तशा प्रकारचे धोरण प्रस्तावित केले आहे. आठ दिवसात त्याचा निर्णय करीत आहोत. जे कागदपत्र सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी दिले त्याची कोणाकडूनही चौकशी करण्याची तयारी आहे हेही सांगितले. त्यात कोणी दोषी असेल तर सरकार त्याला पाठिशी घालणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सीआयडी चौकशीचे काय झाले? म्हणाल ती चौकशी याचा अर्थ काय हे आम्हाला सांगा.

श्री.विनय कोरे : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी म्हणतील ती चौकशी म्हणजे त्यांना सीआयडी चौकशी पाहिजे असेल तर सीआयडी चौकशी करु.

3इ.1....

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षांपासून आम्ही हा प्रश्न सातत्याने सभागृहात उपस्थित करीत आहोत. यामध्ये केवळ आदिवासी आणि दलितांच्याच जमिनी गेल्या असे नाही तर इतर समाजाच्या शेतकऱ्यांच्या जमिनी सुध्दा अत्यल्प दराने सुझलॉन कंपनीने घेतल्या. म्हणून यात केवळ आदिवासी अथवा गरीब आदिवासींचीच फसवणूक झाली नाही तर इन्व्हेस्टर्स लोकांना सुध्दा या कंपनीने फसविलेले आहे. ज्यांची ज्यांची नावे आपण वाचून दाखविली त्यांच्या जमिनी 25 हजार रुपये एकराने घेतल्या आणि त्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये कंपनी त्याच जमिनीची किंमत 9 लाख रुपये एकर अशी दाखविली. ती किंमत आता 35 लाख एकरी अशी झालेली आहे. अशी वाढीव किंमत दाखवून प्रोजेक्ट रिपोर्ट मोठा होतो आणि त्या प्रपोर्शनेटमध्ये तेवढे अनुदान कंपनीला मिळते अशा प्रकारे हे एक रॅकेट असल्याचे मागील वेळेस देखील सभागृहात आम्ही निदर्शनास आणून दिले होते. माझी विनंती आहे की, या आदिवासी व गरीब शेतकऱ्याला शासनाला मदत करावयाची असेल तर त्याला काही ना काही तरी रॉयल्टी मिळाली पाहिजे. कंपनीला जेवढा नफा मिळेल त्यातून पाच-दहा टक्के निश्चित करुन रॉयल्टी देण्यात यावी. शासनाने आता जी चौकशी मानय केली आहे त्याबाबत मला असे सुचवावयाचे आहे की, चौकशी केली तर ही कंपनी देखील फार मोठी आहे आणि चौकशीच्या नावाखाली पुन्हा लाखो रुपयांचा धंदा होऊन जाईल. म्हणून माननीय मंत्री महोदयांनी सीआयडीमार्फत चौकशी करण्याचे आश्वासन दिले परंतु मला अशी शंका आहे की, यामध्ये सीआयडीवाले सुध्दा माल घेतील अशी शंका वाटते. कारण ही सुझलॉन कंपनी कोणालाही विकत घेते हा अनुभव आमच्या जिल्ह्याने सुध्दा घेतला आहे. आमच्या जिल्ह्यात महसूल खाते या कंपनीच्या ताब्यात आहे, त्यांचे काम कुठेही अडत नाही. म्हणून या गरीब माणसाला रॉयल्टी देण्याची जी भूमिका शासनाची आहे त्यासंबंधीचा निर्णय अगोदर घ्यावा. कारण 700 टॉवर्स या कंपनीचे उभारलेले आहेत आणि त्यांची चौकशी करण्यात वेळ घालविण्यापेक्षा आता त्या गरीब माणसाला काय देता येईल त्यासंबंधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. आमच्या भागात शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना मोबदला मिळवून देतो म्हणून प्रयत्नही सुरु झालेले आहेत, हा एक प्रकारचा व्यवसायच सुरु आहे. कंपनीने ज्यांच्या जमिनी घेतल्या त्यांच्या मुलांना नोकरी देऊ असे आमिष दाखविले होते. अशा प्रकारे या गरीब आदिवासी व शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर रॉयल्टी देण्याबाबतचा निर्णय ताबडतोबीने घेणे आवश्यक आहे. तसेच सीआयडीमार्फत चौकशी केली त्या अनुषंगाने माझी अशी विनंती आहे की,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ SBT/

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

जमिनीचा व्यवहार असल्यामुळे 7/12 चा प्रश्नही तेथे आला. 7/12 च्या उताऱ्याबाबत सीआयडीवाल्यांना कदाचित समजणार नाही, म्हणून या चौकशीमध्ये आयएएस अधिकाऱ्याचा सुध्दा समावेश असावा. म्हणून त्यात आयएएस अधिकाऱ्याचा समावेश करावा व त्यांच्या बरोबरीने ही चौकशी करावी. असे केले तरच हे स्कँडल आपल्यासमोर आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या शेतकऱ्यांना त्याच्या जमिनीपोटी रॉयल्टी देण्याबाबतचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. विनय कोरे : महोदय, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मी मघाशीच दिलेली आहेत. जुन्या ज्या विंड मिल्स उभ्या आहेत त्यासंबंधी कंपनी आणि गुंतवणुकदारांसोबत बोलणी सुरु आहे. नव्या इन्व्हेस्टर्सबाबत नवीन धोरण शासन येत्या 8 दिवसात तयार करणार असेही मी सांगितले. सन्माननीय सदस्यांना सीआयडी चौकशीवर विश्वास नसेल तर सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती नेमण्याची देखील माझी तयारी आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सुझलॉन कंपनीकडून या जमिनींचे प्रत्येक व्यवहार हे गैरव्यवहाराने झालेले आहेत. आदिवासींसंबंधीच्या कायद्याप्रमाणे त्यांच्या जमिनी खरे तर विकत घेता येत नाहीत. तसेच त्यात शासनाच्या परवानगीशिवाय डेव्हलपमेंट सुध्दा करता येत नाही. असे असतानाही ज्या पवनचक्क्या उभ्या राहिल्या त्या अनधिकृतच म्हणाव्या लागतील. अनधिकृत गोष्टीला शासनाचे अनुदान कसे मिळते हा खरा येथे प्रश्न निर्माण होतो. सिन्नरमधील आदिवासींनी तक्रार केल्यानंतर शिंदे नावाचे तहसीलदार, उप जिल्हाधिकारी आणि 4 तलाठी त्यात सस्पेंड झालेले आहेत. आदिवासी, देवस्थान आणि महार वतनच्या जमिनीसंबधी झालेल्या व्यवहारांची आम्ही चौकशी करु असे म्हणत होता परंतु सहा महिने उलटून गेले तरी त्यासंबंधीचा निकाल लागत नाही. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितले की, तेथे व्यवहार चालू आहेत, गरिबांची कुठलीही कामे होत नाहीत, त्यांच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही, गरीब शेतकरी फेऱ्या मारतात, कंटाळून जातात. त्याला आशा असते की, यासंबंधीची चौकशी होईल आणि त्याला न्याय मिळेल. परंतु अशा चौकशीच्या माध्यमातून या गरीब व आदिवासी शेतकऱ्याला न्याय मिळणार नाही. कारण सुझलॉन ही कंपनी फार पॉवरफुल कंपनी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

आम्ही आपल्याकडे 62 कि.मी. रस्त्याच्या संदर्भात एक प्रकरण आणले होते. ते जिल्हापरिषदेच्या गावातील रस्त्यांचा उपयोग करतात. मोठ मोठा माल ट्रकवरुन आणला जातो. एवढा मोठा लोड ते रस्ते सहन करु शकत नसल्यामुळे तेथील रस्ते खराब होतात. त्यामुळे 10 लक्ष रुपये रस्त्यांना देण्याच्या संदर्भातील एक चांगला निर्णय माननीय मंत्रीमहोदयांनी घेतलेला आहे. परंतु हे पैसे अद्यापपावेतो मिळालेले नाहीत. हे प्रकरण आपण सीआयडीकडे चौकशीसाठी दिले तरी आमचे काही म्हणणे नाही. परंतु महार वतनाच्या, आदिवासींच्या जमिनी, गोरगरीब शेतक-यांच्या जमिनी गैरव्यवहाराने घेतल्या गेल्या आहेत आणि हे सिध्द देखील झालेले आहे. त्यामुळे गैरव्यवहाराने ज्या जमिनींचा व्यवहार झालेला आहे, त्या जमिनीच्या संदर्भातील निर्णय हे अधिवेशन संपण्याच्या आत घेतला जाणे आवश्यक आहे. ज्या शेतक-यांच्या जमिनीवर कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता प्रकल्प उभे राहिले आहेत, ज्या शेतक-यांची फसवणूक झालेली आहे त्यांची फसवणूक दूर करण्यासाठी शासन काय निर्णय घेणार आहे ? आता या शेतक-यांच्या जवळ काहीही शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे या शेतक-यांचे पुढचे आयुष्य सुकर होण्यासाठी, त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी शासन जी काही भूमिका घेणार आहे, ती भूमिका हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर जाहीर केली जाणार आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, या सर्व प्रश्नांची उत्तरे मी अगोदरच दिलेली आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांकडे यासंदर्भात स्पेसिफिक माहिती त्यांनी दिली तर त्या संदर्भातील निर्णय देखील हे अधिवेशन संपण्याच्या आत दिला जाईल. सन्माननीय सदस्यांनी रस्त्याच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, रस्त्याचा जो व्हीडीआर आणि ओडीआर आहे, त्यामध्ये जुन्या प्रकल्पासांठी 10 लक्ष रुपये प्रती कि.मी. मंजूर करावयाचे आणि भविष्यात होणा-या प्रकल्पांसाठी प्रती कि.वॅ 1 लक्ष रुपये याप्रमाणे निधी रस्ते विकास निधी मंजूर करुन, प्रकल्प सुरु होण्याच्या अगोदरच विकासकाकडून घेण्यासंदर्भात शासनाचा निर्णय झालेला आहे. पीडब्ल्यूडीकडे सदर रस्त्यांच्या संदर्भात पत्रव्यवहार केलेला असून त्यांच्याकडून याबाबतीत निर्णय आल्यानंतर त्वरीत कार्यवाही केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, पवन चक्क्याच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा सुरु आहे. तासगाव तसेच कवठेमहांकाळ तालुक्यात सुध्दा शेतक-यांचे या संदर्भात प्रचंड नुकसान झालेले आहे. गैरव्यवहारामुळे अनेक शेतकरी रस्त्यावर आलेले आहेत. तासगाव, कवठेमहांकाळ तसेच खानापूर तालुक्यात जमिनीचे जे गैरव्यवहार झालेले आहेत त्याबाबत चौकशी करुन शेतक-यांना रॉयल्टी देण्याच्या संदर्भात शासनाने भूमिका घेण्यास भाग पाडावे, अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, शेतक-यांना योग्य मोबदला देण्यासंबंधीचे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, याही विषयाची चर्चा अगोदर झालेली आहे.

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आहे. या चर्चेमधून महत्वाचे दोन मुद्दे उपस्थित होतात. सुझलॉन ही अशी एक शक्तीमान कंपनी आहे की, ती राज्य शासनाच्या संबंधित खात्यांना आपल्या मुठीत ठेवू शकते. हे प्रकरण आज चर्चिले गेले असले तरी वर्तमानपत्रात या कंपनीबद्दल बरीचशी माहिती वाचावयास मिळते. एवढेच नव्हे तर या परिसरामध्ये त्यांचे अधिकारी फिरत असतात, उद्योग करीत असतात हे देखील बहुचर्चीत आहे. यासभागृहात महत्वाचा मुद्दा उपस्थित केला गेला की, ज्यांच्या जमिनी यासंदर्भात घेतल्या गेल्या आहेत, त्यांच्या चरितार्थासाठी काही तरी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर निश्चितपणे यावयास पाहिजे. दुसरी गोष्ट अशी आहे की, या कंपनीच्या वतीने जे जे व्यवहार चालले आहेत, ते नियमात बसत असतील तर त्याला कोणीही थांबवू शकणार नाही. अशा प्रकारे नियम बाहय कामे किंवा कायद्याची पायमल्ली या कंपन्यांकडून होत राहिली तर या कंपन्या काही काळानंतर महाराष्ट्र राज्यच ताब्यात घेतील.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

उपसभापती ..

जमिनीचे जे एकत्रित व्यवहार झालेले आहेत ते पाहता शेवटी हा महाराष्ट्र आपण कोणाला विकणार आहात ? खंडाळा येथे सहारा सिटी प्रकल्प सुरु असून त्याही बाबतीत बरीच चर्चा झाली होती.

एक सन्माननीय सदस्य : तेथे लवासा प्रकल्प आहे.

उपसभापती : मी सहारा सिटीचा उल्लेख केला आहे. या सर्व व्यवहारामध्ये कोणती मंडळी आहेत ? तेव्हा या सर्व गोष्टीची देखील खोलवर जाऊन तपासणी केली पाहिजे. या प्रकरणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात यावी अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती आणि माननीय मंत्री महोदयांनी सी.आय.डी. चौकशी करण्याचे मान्य केलेले आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी त्या भागातील लोकांच्या चरितार्थाच्या संदर्भात जो प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मी एक विनंती करु इच्छितो. या संदर्भात ॲडिशनल चीफ सेक्रेटरी किंवा चीफ सेक्रेटरीच्या पातळीवर एक चौकशी अधिकारी नेमण्यात यावा ते निवृत्त असावेत की नसावेत हे मंत्र्यांनी ठरवावे. त्याच्याबरोबर महसूल विभागाचे सचिव आणि आपल्या विभागाचे सचिव त्यांच्याबरोबर असावेत . अशा प्रकारे तीन सचिवांची समिती नेमून हे सर्व व्यवहार पारदर्शक पध्दतीने तपासून पहाण्यात यावेत. त्याचबरोबर मी आपल्याला असेही सांगतो की, त्यांचे दहा गैरव्यवहार असतील तर त्याकडे दुर्लक्ष करुन ते सोडून द्यावे परंतु जो गरीब माणूस आहे त्याच्या संदर्भात अधिक विचार व्हावयास पाहिजे. विजेच्या बाबतीत महाराष्ट्र संकटामध्ये आहे हे सुध्दा मला माहीत आहे. त्यामुळे पवन उर्जा प्रकल्पासाठी ज्या शेतक-याच्या जमिनी घेण्यात येतात तो भूमिहीन होतो परंतु या शेतक-यांना दोन लाख रुपये महिन्याला दिल्यानंतर बाकी त्या कंपनीने कितीही रुपये कमवावेत त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. या प्रकल्पामध्ये ऐश्वर्या रॉय येवो, टिव्ंकल खन्ना येवो,अमिताभ बच्चन येवो, वा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण येवो त्याबद्दल माझा काहीही आक्षेप नाही. माझे एवढेच म्हणणे आहे की त्या शेतक-याला दरमहा दोन लाख रुपये मिळतील असे धोरण शासनाने ठरवावे तेव्हा अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, या मुद्याशी मी सहमत आहे. अपारंपारिक उर्जा विभागाने तशा प्रकारचा प्रस्तावही सादर केला होता व त्याचा खुलासा मी अगोदरच केला होता. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मला त्यांना एका गोष्टीची जाणीव करुन द्यावयाची आहे की, इलेक्ट्री सिटी ॲक्ट 2003 केन्द्र सरकारने अंमलात आणला असून त्या कायद्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती कोणत्याही ठिकाणी वीज प्रकल्प सुरु करु शकते त्याचप्रमाणे ती व्यक्ती कोठेही वीज विकू शकते. त्यासाठी राज्य सरकारकडून परवानगी घेण्याचे बंधन या ॲक्टप्रमाणे नाही. या कंपन्यावर किंवा या व्यवस्थेवर आपण अंकूश ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. सरकारच्या वतीने जर विकासकाला काही सोयी सुविधा पाहिजे असतील तर त्याने सरकारचे ऐकले पाहिजे एवढया मर्यादित स्वरुपातच आपण त्यांच्यावर अंकूश ठेवण्याचे काम करीत आहोत. अंकूश ठेवण्याच्या बाबतीत कायद्याच्या परिभाषेत आपल्याला फार मोठा अधिकार प्राप्त होत नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी अशी भावना मांडलेली आहे की, त्या भूमिपुत्राला विकासाचा वाटा मिळाला पाहिजे या भावनेशी मी आणि सरकार सहमत असून त्या संदर्भात आठ दिवसात धोरण जाहीर करु.

उपसभापती : यानंतर शासकीय विधेयक घेण्यात येईल आणि त्यानंतर विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पंढरपूर विकास प्राधिकरण विधेयक

मु. शी. : L.C. BILL NO. V OF 2009.

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE PANDHARPUR DEVELOPMENT AUTHORITY; FOR PREPARING PLAN FOR THE PANDHARPUR DEVELOPMENT AREA; FOR ENSURING TIMELY IMPLEMENTATION OF VARIOUS DEVELOPMENT WORKS IN THE SAID AREA AS PER THE SAID PLAN AND FOR THAT PURPOSE TO ENSURE CO-ORDINATION BETWEEN THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENICES; GIVING DIRECTIONS FOR PREPARING PLANS AND ESTIMATES OF THE WORKS CONTAINED IN THE SAID PLAN,TO GRANT ADMINISTRATIVE APPROVAL TO THE PROPOSALS OF DEVELOPMENT WORKS AND PLANS AND ESTIMATES, TO GIVE APPROVAL TO TENDERS FOR WORKS INVITED BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES; TO RECEIVE AND RELEASE GOVERNMENT GRANTS TO THE CONCERNED AGENCIES AFTER APPROVAL OF TENDERS AND TO MONITOR IMPLEMENTATION OF DEVELOPMENT WORKS BY THE CONCERNED GOVERNMENT AND SEMI-GOVERNMENT AGENCIES ; AND FOR THE MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 9 - पंढरपूर विकास क्षेत्रासाठी योजना तयार करणे; उक्त योजनेअनुसार उक्त क्षेत्रात करावयाच्या विविध विकासविषयक कामांची वेळेत अंमलबजावणी करणे आणि त्या प्रयोजनासाठी संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांदरम्यान समन्वय राखणें; उक्त योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या कामांचे नकाशे व अंदाज तयार करण्यासाठी निदेश देणे; विकासविषयक कामांचे प्रस्ताव आणि नकाशे व अंदाज यांना प्रशासकीय मान्यता देणे; सबंधित शासकीय व निम शासकीय अभिकरणांनी कामांसाठी मागवलेल्या निविदांना मान्यता देणे, निविदांच्या मान्यतेनंतर संबंधित अभिकरणांना शासकीय अनुदाने देणे व संबंधित शासकीय व निम-शासकीय अभिकरणांव्दारे करण्यात येणा-या विकास विषयक कामाच्या अंमजबजावणीचे संनियंत्रण करणे इत्यादी कामांकरिता पंढरपूर विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 5 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

ठाणे येथील सिव्हिल हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांसंबंधी...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे येथील सिव्हिल हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांसंबंधी मला याठिकाणी एक विषय उपस्थित करावयाचा आहे...

उपसभापती : त्या विषयासंबंधी मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांना व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून घेतले होते. त्याबाबत मी आपणास उद्या अवगत करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : ता.आष्टी, जि.बीड येथील महिला बचत गटांना पंचायत समितीकडून अनुदानाचे वाटप न होणे

मु. शी. : ता.आष्टी, जि.बीड येथील महिला बचत गटांना पंचायत समितीकडून अनुदानाचे वाटप न होणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"केंद्र सरकारच्या स्वर्ण जयंती स्वयंरोजगार योजने अंतर्गत असलेल्या महिला गटाचे कार्य बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यामध्ये अतिशय चांगले सुरु आहे. तालुक्यात 160 गावात 200 महिला बचत गटांनी गेल्या वर्षी आर्थिक उलाढालीचे उद्दिष्ट पूर्ण करुन जिल्हयात दुसरा क्रमांक मिळविला असला तरी तालुक्यातील सर्वच बँकात महिला बचत गटाचे कर्ज व अनुदानाचे 82 लाख जमा असून पंचायत समितीकडून कर्ज व अनुदानाबाबत चकरा मारुनही त्यांची कामे होत नसल्याने त्याची होत असलेली मानसिक व आर्थिक कुचंबणा व त्यांच्यात पसरलेला असंतोष व निराशा. याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सांगली जिल्हयातील कवठेमहाकाळ व जत तालुक्यातील काही गावांचा समावेश कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या योजनेमध्ये नसणे

मु. शी. : सांगली जिल्हयातील कवठेमहाकाळ व जत तालुक्यातील काही गावांचा समावेश कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या योजनेमध्ये नसणे याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत ताकारी, म्हैसाळ, टेंभू या महत्वाच्या योजनेमध्ये सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ तालुक्यातील ढालगाव जिल्हा परिषद गटातील सर्वच गावे या योजनांमधून वगळलेली आहेत. टेंभू योजनेमधून केरेवाडी, आरेवाडी, नागज, चोरोची, कदमवाडी, निमज, घोरपडी, शिंदेवाडी, दुधेभावी, चूडेखींडी, ढोलेवाडी, जांभूळवाडी यासारखी अनेक गावे आणि तालुक्यातील आलकुड खरसिंग या सारखी आजही गावे या सिंचन योजनेमध्ये समाविष्ट नाहीत. जत, तासगाव तालुक्यातील अनेक गावांचा समावेश या योजनेमध्ये नाही. जी गावे वंचित आहेत अशा सर्व गावांचा या सिंचन योजनेमधील योजनांमध्ये समावेश करण्यात यावा ही विनंती."

सभापती महोदय, राज्यातील कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत ताकारी, म्हैसाळ, टेंभू या महत्वाच्या योजनेमध्ये सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ तालुक्यातील ढालगाव जिल्हा परिषद गटातील सर्वच गावे या योजनांमधून वगळलेली आहेत. टेंभू योजनेमधून केरेवाडी, आरेवाडी, नागज, चोरोची, कदमवाडी, निमज, घोरपडी, शिंदेवाडी, दुधेभावी, चूडेखींडी, ढोलेवाडी, जांभूळवाडी यासारखी अनेक गावे वगळली आहेत. त्याचप्रमाणे जत तालुक्यातील काही गावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे...

म्हैसाळ योजनेमधून वगळली आहेत. या गावांचा या सिंचन योजनेमध्ये समावेश करण्यात यावा. अशी दुष्काळी भागातील जनतेच्या वतीने विशेष उल्लेखाव्दारे मी मागणी करीत आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाताळगंगा नदीमध्ये औद्योगिक वसाहतीमधून रसायनयुक्त पाणी सोडणे

मु. शी. : पाताळगंगा नदीमध्ये औद्योगिक वसाहतीमधून रसायनयुक्त पाणी सोडणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"पाताळ गंगा नदीमध्ये पाताळ गंगा औद्योगिक वसाहतीमधून रात्रीच्यावेळी रसायनयुक्त सांडपाणी सोडले जाते. त्यामुळे पाताळ गंगा नदीचे पाणी दूषित होऊन नदीकाठी हजारो मासे व जलचर प्राणी नेहमीच मृत्युमुखी पडत आहेत. आठ दिवसापूर्वी अशाप्रकारे रसायनयुक्त पाणी सोडल्यामुळे हजारो मासे आज मृत्युमुखी पडले आहेत. वास्तविक पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रामध्ये सामूहिक सांडपाणी शुध्दीकरण केंद्र आहे. तरीसुध्दा कारखाना व्यवस्थापनाकडून जाणुनबुजून हे कृत्य करण्यात येते. त्यामुळे किनाऱ्यावरील मच्छिमार बांधवांचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत वारंवार आंदोलन करुन सुध्दा त्यावर कोणतीही उपाय योजना न होणे, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेली चीड. याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, पाताळ गंगा नदीमध्ये पाताळ गंगा औद्योगिक वसाहतीमधून रात्रीच्यावेळी रसायनयुक्त सांडपाणी सोडले जाते. त्यामुळे पाताळ गंगा नदीचे पाणी दूषित होऊन नदीकाठी हजारो मासे व जलचर प्राणी नेहमीच मृत्युमुखी पडत आहेत. आठ दिवसापूर्वी अशाप्रकारे रसायनयुक्त पाणी सोडल्यामुळे हजारो मासे आज मृत्युमुखी पडले आहेत. वास्तविक पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रामध्ये सामूहिक सांडपाणी शुध्दीकरण केंद्र आहे. तरीसुध्दा कारखाना व्यवस्थापनाकडून जाणुनबुजून हे कृत्य करण्यात येते. त्यामुळे किनाऱ्यावरील मच्छिमार बांधवांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबत वारंवार आंदोलन करुन सुध्दा त्यावर कोणतीही उपाय योजना होत नाही. आता मच्छीचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यामुळे तेथील कोळी बांधवांवर नेहमीच अन्याय होत आहे. त्याबाबत या शासनाने त्या कारखान्यांवर कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : डॉ.ग.गो.जाधव पत्रकारिता अध्यासनासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे

मु. शी. : डॉ.ग.गो.जाधव पत्रकारिता अध्यासनासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"पद्मश्री पत्रकार डॉ. ग.गो. जाधव सांस्कृतिक भवनासाठी कोल्हापूर महानगरपालिकेला जागा उपलब्ध करुन देणे, तसेच शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग.गो.जाधव पत्रकारिता अध्यासन स्थापन करणेबाबत तत्कालिन मुख्यमंत्री यांनी 4 मे, 2005 रोजी कोल्हापूर येथे जाहीर घोषणा करणे, उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे सचिवांकडे रु. 3 कोटी 50 लाखांचा प्रस्ताव 4 महिन्यापूर्वी सादर करणे, चालू वर्षीच्या बजेटमध्ये शिवाजी विद्यापीठातील अन्य एका अध्यासनासाठी दोन कोटींची तरतूद करणे, तसेच डॉ. ग.गो. जाधव अध्यासनासाठी रु.3.50 कोटींची तरतूद व्हावी किंवा या वर्षीच्या अंदाजपत्रकात नाममात्र 1 कोटींची तरतूद डॉ. ग.गो. जाधव अध्यासनासाठी व्हावी, म्हणून सातत्याने पाठपुरावा करुनही याकडे जाणीवपूर्वक केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरेला तीव्र असंतोष, याकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता, सदर अत्यंत महत्वाचा विषय मी आज सभागृहात "विशेष उल्लेखाव्दारे" उपस्थित करु इच्छितो".

सभापती महोदय, डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासन स्थापन व्हावे यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. परंतु यंदाच्या बजेटमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या एका अध्यासनासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आली नाही. त्याबाबत सरकारने घोषणा केल्याप्रमाणे तरतूद करावी. तसेच, डॉ. ग.गो. जाधव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सांस्कृतिक भवनासाठी जागा देण्याचे मान्य केले होते. ती मागणी मान्य करावी अशी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाटोदा तालुक्यातील सौताळा साठवण तलावात जायकवाडी प्रकल्पामधून पाणी सोडणे

मु. शी. : पाटोदा तालुक्यातील सौताळा साठवण तलावात जायकवाडी प्रकल्पामधून पाणी सोडणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"बीड जिल्हयातील पाटोदा तालुका दुष्काळी असून सदर तालुक्यात मोठया नद्या नाहीत. पण उगम स्थाने असणे, या तालुक्याची उंची समुद्र सपाटीपासून 2900 फूट उंच असून मराठवाडयात सर्वात उंचीवर तालुका असून पाऊस मोठया प्रमाणात पडतो व पाणी वाहून जाते. तालुक्यात मोठी तळी नाहीत, लहान तळी माहे फेब्रुवारी-मार्च महिन्यातच कोरडी पडत असल्याने कायम स्वरुपी बागायती नसणे, शेती डोंगराळ असल्याने शेती व्यवसायावर भागत नसल्याने शेतकरी मजुरांना दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रात जावे लागणे. तालुक्यात मे-जून महिन्यात टँकरने माणसी 20 लिटर पाणी पुरवठा करण्यात येणे. पाणी टंचाईमुळे तालुक्यातील महिलांना पाण्यासाठी वन वन फिरावे लागणे, काही ठिकाणी बोर हापसे असून त्याचे पाणी काढणे म्हणजे मोठी कसरत करावी लागणे, तालुक्यातील नळपाणीपुरवठा योजना निकृष्ट दर्जाची होणे, पर्यायाने पैसा गेला तथापि पाणी मिळाले नाही, निकृष्ट कामाबद्दल कोणावरही कार्यवाही न होणे, तालुक्यातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेबाबत सौताडा येथील साठवण तलावात जायकवाडी धरणाचे पाणी सोडून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाय योजना".

सभापती महोदय, बीड जिल्हयातील पाटोदा तालुका दुष्काळी असून सदर तालुक्यात मोठया नद्या नाहीत. पण पाण्याची उगम स्थाने आहेत. या तालुक्याची उंची समुद्र सपाटीपासून 2900 फूट उंच असून मराठवाडयात सर्वात उंचीवर तालुका असून पाऊस मोठया प्रमाणात पडतो परंतु सर्व पाणी वाहून जाते. तालुक्यात मोठी तळी नाहीत. लहान तळी माहे फेब्रुवारी-माच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

महिन्यातच कोरडी पडत असल्याने कायम स्वरुपी बागायत होत नाही. डोंगराळ शेती असल्याने शेती व्यवसायावर लोकांचे भागत नसल्यामुळे शेतकरी मजुरांना दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रात मजुरीसाठी जावे लागणे. तालुक्यात मे-जून महिन्यात टँकरने माणसी 20 लिटर पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी टंचाईमुळे तालुक्यातील महिलांना पाण्यासाठी वनवन फिरावे लागते, काही ठिकाणी बोर हापसे असून त्याचे पाणी काढणे म्हणजे मोठी कसरत करावी लागते, तालुक्यातील नळ पाणीपुरवठा योजना निकृष्ट दर्जाची असल्यामुळे पर्यायाने पैसा गेला तरी पाणी मिळत नाही. निकृष्ट कामाबद्दल कोणावरही कार्यवाही केली जात नाही. त्यामुळे पाटोद्याची जनता पिण्याच्या पाण्यावाचून तहानलेली आहे. यामध्ये मार्ग काढण्यासाठी आणि तालुक्यातील जनतेचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी बीड जिल्हयाला जायकवाडीच्या बॅक वॉटरचे पाणी ज्या पध्दतीने दिले त्याच पध्दतीने जायकवाडीच्या बॅकवॉटरचे पाणी सौताडा येथील साठवण तलावामध्ये सोडावे आणि त्यामधून पाटोद्याचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्यात यावा. अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. बी.एड.अर्हतेची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत सुधारणा करणे

मु.शी. बी.एड.अर्हतेची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत सुधारणा करणे याबाबत श्री. केशवराव मानकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : सम्माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यातील जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची संयुक्तिक ज्येष्ठता यादी संचालकांच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येते, या ज्येष्ठता यादीत सेवेत रुजू झालेले अप्रशिक्षित शिक्षकांनी कालांतराने बी.एड.अर्हता पूर्ण केली आहे, अशा शिक्षकांना प्रशिक्षित अर्हतेसह रुजू झालेल्या शिक्षकांपेक्षा सेवा ज्येष्ठता दाखविणे, सर्व जिल्हा परिषद माध्यमिक शाळांतील शिक्षकांची ज्येष्ठता ही महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग-2 करिता माध्यमिक शिक्षकांच्या बी.एड.अर्हतेच्या दिनांका-पासून केलेली नियमित सेवा ग्राह्य धरुन त्याप्रमाणे ज्येष्ठता तयार करण्यात येण्यासंबंधी आदेश देण्यात येणे,संबंधित विभागाच्या दि.10 जून 1975 च्या परिपत्रकानुसार सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी माध्यमिक शिक्षकांची नियुक्ती करताना तो शैक्षणिक व व्यवसायिक पात्रतेचा असावा, असे निर्देश देणे,त्यानंतर दि. 9 ऑगस्ट 1975 च्या शालेय शिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार वेगवेगळया वेतनश्रेणीत नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांची राज्यस्तरीय संयुक्तिक सेवाज्येष्ठता यादी बनविताना बी.एड. हा निकष ठेवून महाराष्ट्र सेवा वर्ग-2 च्या जागा पदोन्नतीने भरण्यात येण्या-संबंधी शासनाचे स्पष्ट आदेश असणे, परंतु राज्य स्तरीय जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादीत परिपत्रकान्वये अप्रशिक्षित शिक्षकांना प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून ज्येष्ठता दिल्याने प्रशिक्षित माध्यमिक शिक्षक त्यांच्यापेक्षा कनिष्ठ ठरणे, यासंबंधी शिक्षण संचालक आणि शासनाकडे वारंवार संघटनेतर्फे पाठपुरावा होणे,तरी अद्याप सदर प्रकरणाची दखल न घेणे, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादी माध्यमिक शाळा संहिता परिशिष्ट-45 अन्वये तयार करुन बी.एड.अर्हतेचा दिनांक ज्येष्ठतेकरिता ग्राह्य धरण्यात यावा व त्यानुसार पदोन्नतीचे पद .....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

भरण्यात येण्यासंबंधी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा दि.13 एप्रिल 2005 चा आदेश असणे, तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि.22 ऑक्टोबर 2007 च्या परिपत्रकानुसार जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांची ज्येष्ठता माध्यमिक शाळा संहितेच्या सेवा ज्येष्ठता धोरणानुसार तयार करण्याचे आदेश देणे, त्याचप्रमाणे उच्च न्यायाल्याच्या नागपूर खंडपीठाच्या क्र. 5815/2005, दिनांक 14 मार्च 2008 च्या पुनर्विलोकन याचिकेत सदर निर्णय हा प्रतिवादींनाच लागू नसून संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या ज्येष्ठतेला लागू राहील,असे आदेश देऊन पूर्वीचा दि.13 एप्रिल 2005 चा आदेश कायम ठेवणे, या उलट संचालकांनी दि.1 जानेवारी 2008 रोजी 30 अप्रशिक्षित रुजू झालेल्या माध्यमिक शिक्षकांना शिक्षण सेवा वर्ग-2 चे पदोन्नतीचे आदेश देणे,अशा प्रकारे बी.एड. अर्हतेनुसार सेवा ज्येष्ठ शिक्षकांना डावलून अवैधरित्या सेवेत कनिष्ठ माध्यमिक शिक्षकांना पदोन्नती देण्यात येणे,त्यामुळे शासनाने बी.एड.अर्हतेची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत सुधारणा करणे, तसेच संपूर्ण राज्यात रिक्त असलेले शिक्षण सेवा वर्ग-2 च्या प्रशासकीय जागा त्वरित भरण्याचे आदेश देण्याची आवश्यकता आणि या माध्यमातून उच्च न्यायालयाची केलेली अवमानना लक्षात घेता शासनाने यावर ताबडतोब करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया, हा विषय अत्यंत महत्वाच्या असून, शासनाने याबाबतीत निवेदन करावे यासाठी मी आज सभागृहात विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे.

. . . .3 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. व्हेटरनरी-फिशरीज डॉक्टर्सचा डिग्री कोर्स शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत न मिळणे.

मु.शी. व्हेटरनरी-फिशरीज डॉक्टर्सचा डिग्री कोर्स शिकणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना इ.बी.सी. सवलत न मिळणे याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागपूर येथे व्हेटरनरी- फिशरीज डॉक्टर्सचा डिग्री कोर्स शिकविला जातो.या विद्यापीठाअंतर्गत राज्यात नागपूर,उदगीर,परभणी,शिरवळ (पूणे), मुंबई व अकोला अशी पाच कॉलेजेस चालतात. ही सर्व महाविद्यालये शासकीय आहेत. या पाचही कॉलेजेसमध्ये विद्यार्थ्यांना ई.बी.सी.सवलत शिक्षण संस्था सुरु झाल्यापासून (2000-2001) मिळत नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रचंड आर्थिक त्रास सहन करावा लागतो.त्यापूर्वी हे सर्व व्हेटरनरी फिशरीज डिग्री कोर्स पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत चालत होते. राज्य शासनाने सन 2000-2001 मध्ये स्वतंत्रपणे महाराष्ट्र ॲनिमल ॲन्ड फिशरीज सायन्स युनिव्हर्सिटी नागपूर येथे निर्माण केली. कृषी विद्यापीठ व इतर कृषी अभ्यासक्रमात कृषी पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी ई.बी.सी.सवलत दिनांक 15 मे, 2007 च्या आदेशाने दिली. मात्र गरीब,आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना ई.बी.सी.सवलत दिली नाही.त्यामुळे त्यांना प्रचंड आर्थिक त्रास सहन करावा लागतो,या गंभीर प्रकरणाबाबत शासनाने त्वरित न्याय द्यावा, यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना येथे उपस्थित करीत आहे.

यानंतर कु. थोरात

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्रक नाही

पृ. शी. : बार्शी ते कुर्डुवाडी जुन्या रेल्वे मार्गाचे रुळ काढण्याची तसेच सिना नदीवरील पुलाची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता.

मु. शी. : बार्शी ते कुर्डुवाडी जुन्या रेल्वे मार्गाचे रुळ काढण्याची तसेच सिना नदीवरील पुलाची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता याबाबत श्री.विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूचा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "मराठवाडा विभागातील लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील जनतेच्यादृष्टीने अतिशय जिव्हाळयाचा आणि महत्वाचा असलेला प्रश्न म्हणजे लातूर-कुर्डुवाडी रेल्वेचे रुंदीकरण झाले पाहिजे. हा प्रश्न लातूर आणि उस्मानाबद जिल्हयातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या प्रयत्नामुळे मार्गी लागला. लातूर -कुर्डुवाडी हया रेल्वेमार्गाचे रुंदीकरण झाले व लातूरहून मुंबईसाठी डायरेक्ट रेल्वेसुध्दा सुरु झाली. परंतु बार्शी ते कुर्डुवाडी या रेल्वेमार्गाच्या बाजूला राष्ट्रीय महामार्ग आहे. ही जुनी रेल्वेलाईन असून तिला राष्ट्रीय महामार्ग समांतर आहे. या दोन्हीमध्ये फक्त पाच फुटाचे अंतर आहे. त्या मार्गावरचे सर्व रेल्वेस्टेशन्स काढण्याचे काम रेल्वे खात्याने केले आहे. पण जुना बार्शी ते कुर्डुवाडी रेल्वेमार्ग हा नॅशनल हाय-वे ला समांतर असल्यामुळे आज त्याठिकाणी रेल्वे बंद असल्यामुळे या रोडवरुन जी वाहने जातात ती वाहने अनेक वेळा रेल्वेरुळावर जाऊन अपघात होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. म्हणून मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करतो की, बार्शी ते कुर्डुवाडी हा जुना रेल्वेमार्ग त्वरित काढून त्याठिकाणी होणारे अपघात टाळावेत. त्याचबरोबर याच रेल्वेमार्गावर सिना नदी क्रॉस होते. त्या नदीवर असलेला पूल खूप वर्षा पूर्वीचा, जुना पूल आहे तो नवीन बांधण्याची गरज निर्माण झालेली आहे. या पूलावर वाहनांची वाहतूक तासं-तास खोळंबलेली असते तेव्हा हा पूल त्वरित नव्याने बांधला पाहिजे,एवढी सूचना विशेष उल्लेखद्वारे मी या ठिकाणी करतो." धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता नियम 92 अन्वये अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, आम्ही दि.8 जून,2009 रोजी दिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात आलेल्या नाहीत त्या घेण्यात याव्यात अशी विनंती आहे.

तालिका सभापती : विशेष उल्लेखाच्या एकूण किती सूचना आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, काल दि. 8 आणि 9 च्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात आल्या त्यावेळी फक्त दिनांक 9 रोजीच्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात आल्या दिनांक 8 रोजीच्या विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे दिनांक 8 रोजीच्या विशेष उल्लेखाच्या सूचना घ्यावयाच्या राहिल्या आहेत.

तालिका सभापती : त्या उद्या घेतल्या तर चालतील काय?

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आजच घेण्यात याव्यात.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी दोन-दोन मिनिटात आपल्या विशेष उल्लेखाच्या सूचना मांडाव्यात.

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे,नवी मुंबई,रत्नागिरी या परिसरातील कारखान्यांच्या रासायनिक ज्वालाग्रही मुळे कारखान्याला लागणाऱ्या आगी

मु. शी. : ठाणे,नवी मुंबई,रत्नागिरी या परिसरातील कारखान्यांच्या रासायनिक ज्वालाग्रही मुळे कारखान्याला लागणाऱ्या आगी याबाबत श्री.संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील विशेषत: ठाणे, नवी मुंबई, रत्नागिरी, या परिसरातील कारखान्याच्या रासायकनिक ज्वालाग्रहीमुळे कारखान्याला लागणाऱ्या आगी, या आगीमुळे अनेक कारखान्यातील कामगारांचा झालेला मृत्यू, व अनेक कामगार अद्यापही गंभीर जखमी व मृत्यूमुखी पडण्याच्या होत असलेल्या तक्रारी, अनेक कामगारांना शासन प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत व सानुग्रह अनुदान न मिळणे, कारखान्याच्या कुटुंबातील लोकांमध्ये शासनाविषयी तीव्र स्वरुपाचा असंतोष व भिती निर्माण होणे परंतू शासन यावर कोणतीही उपाययोजना करीत नसल्यामुळे गोरगरीब नागरिकांचे पडत असलेले बळी, शासनाने या गंभीर प्रकरणाची चौकशी करुन कारखान्यातील काम करणाऱ्या नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने त्वरित उपाययोजना करावी."

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शिक्षण सेवकांच्या प्रलंबित समस्या मार्गी न लागल्यामुळे निर्माण झालेली संतापाची भावना

मु. शी. : शिक्षण सेवकांच्या प्रलंबित समस्या मार्गी न लागल्यामुळे निर्माण झालेली संतापाची भावना याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूचा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचा मांडतो.

"राज्य शासनाने शिक्षण सेवकांची प्रलंबित समस्या मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून ऑक्टोबर, 2008 मध्ये समिती गठीत करुन 2 महिन्यात अहवाल देण्याचे निर्देश दिले होते. रात्र शाळांच्या प्रलंबित समस्यांबाबत विचार करण्यासाठी माननीय सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली 1 वर्षापूर्वी समिती गठीत होऊनही निर्णय झालेला नाही. विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसंबंधी समिती गठीत करुन अहवाल मागविण्याचा निर्णय होऊनही कार्यवाही नाही. शासनाच्या वेतनेतर अनुदानासंबंधी गठीत केलेल्या समितीचा अहवाल व शिक्षकेतरांच्या आकृतीबंधासंबंधीचा अहवाल प्राप्त असूनही कार्यवाही नाही. शासनाने विविध विषयांवर निर्णय घेण्यासाठी समित्या गठीत करुनही समित्यांचे अहवाल न येणे व आलेल्या अहवालावर कार्यवाही न झाल्याने संबंधित वर्गामध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असून, शासनाने यासंबधी तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे."

सभापती महोदय, राज्य शासनाने या राज्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये 2000 पासून शिक्षण सेवक योजना सुरु केली आहे. शासनाने या योजनेचे सध्या कायद्यामध्येही रुपांतर केले आहे. असे असताना शिक्षण सेवकांच्या मानधनात गेल्या आठ वर्षात कोणत्याही प्रकारची वाढ शासनाने केलेली नाही. अप्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षकाना प्रशिक्षणाची वेळेवर संधी मिळत नसल्यामुळे वर्षा-नु-वर्षे हे शिक्षक अप्रशिक्षित शिक्षक म्हणून काम करतात. शिक्षण सेवकाचा कालावधी कमाल तीन वर्षांचा असूनही तीन वर्षानंतर त्यांना अप्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी दिली जात नाही. पत्राद्वारे डी.एड. प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षण सेवकांना आंतरवासिता करण्याची आवश्यकता नसतांनाही ते बंधन त्यांच्यावर घालण्यात आले आहे. यासर्व मुद्यांबाबत शिफारस करण्यासाठी शासनाने सन 2008 मध्ये एक समिती गठीत केली आहे.

अप्रमाणित प्रत / प्रशिक्षणासाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

माझ्या माहितीप्रमाणे त्या समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. हा अहवाल प्राप्त झाला नेसल तर शासनाने तातडीने तो अहवाल मागवून घ्यावा. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करतो की, या शिक्षण सेवकांच्या संदर्भात शासनाने तातडीने कार्यवाही करावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मे.अदानी पॉवर लिमिटेड,बोरगाव यांच्या लोहारा येथील कोळसा प्रकल्पामुळे प्रदूषात वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे

मु. शी. : मे.अदानी पॉवर लिमिटेड,बोरगाव यांच्या लोहारा येथील कोळसा प्रकल्पामुळे प्रदूषात वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे यासंबंधी श्री. जैनुद्दीन जव्हेरी, वि. प. स. यांच्या उपस्थित झालेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो

"मे.अदानी पॉवर लिमिटेड, बोरगाव यांनी लोहारा कोळसा प्रकल्प, लोहारा (ता.जि.चंद्रपूर) येथे सुरु करण्याकरिता पर्यावरण विषयक मंजुरीकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केला असून सदर प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर वनसंपदा नष्ट होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होऊन वायू प्रदूषणातही वाढ होण्याची शक्यता निर्माण होणे, चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाण प्रकल्पातील कोळसा गोंदिया जिल्ह्यातील अदानी पॉवर प्रकल्पास पुरविण्यात येणार असल्याने वाहतुकीवर मोठा ताण पडणार असणे, जिल्ह्यातील अस्तित्वात असलेल्या खाण प्रकल्पामुळे पाणीटंचाईमुळे संकट निर्माण होणे, खाण प्रकल्पातील मातीमुळे नद्या उथळ होऊन पुराचा धोका निर्माण होणे, सबब पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्याकरिता अदानी खाण प्रकल्पाला परवानगी नाकारण्याची आवश्यकता."

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये मे.अदानी पॉवर लिमिटेड या कंपनीचा प्रकल्प चंद्रपूरपासून सहा किलोमीटर अंतरावरील लोहारा गावी येणार आहे. या प्रकल्पासाठी त्यांना फॉरेस्टची जवळजवळ 4 हजार एकर जमीन लागणार आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांना एन.ओ.सी. दिलेली आहे. केंद्र शासनाने त्याला मंजुरी दिलेली आहे. आता फक्त पर्यावरण विभागाकडून एन.ओ.सी मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मी या चर्चेव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ....

चंद्रपूर जिल्ह्यामध्ये 36 खाणी आहेत आणि 44 खाणींचे नवीन प्रस्ताव अजून येणार आहेत. त्यांची एन.ओ.सी. मिळालेली आहे. शासनाव्दारे त्यांना खाण चालू करण्याची परवानगी मिळाली आहे. परंतु हा कोळसा महाराष्ट्राचे जे विजेचे प्रकल्प आहेत त्यांच्यासाठी वापरणार नसून तो कोळसा दुसऱ्या प्रांतात घेऊन जाणार आहेत. या अदानी प्रकल्पाबाबत पर्यावरण विभागाला पत्र दिले होते. त्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे जाहीर बैठक झाली. लोकांना बेठकीसाठी बोलविण्यात आले होते. अनेक लोकांनी त्याला विरोध केला. ग्रामपंचायतीच्या सरपंचाने आपल्या सहीने एन.ओ.सी. दिली आहे. सर्व एन.ओ.सी. मिळाली त्याच्या मागे कोणाचा हात आहे याबाबत मी बोलत नाही. आज चंद्रपूर जिल्ह्याची अशी परिस्थिती आहे की, जगामध्ये सर्वात जास्त प्रदूषण चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आहे. महत्वाचा मुद्दा असा आहे की, चंद्रपूर जिल्ह्याचे प्रदूषण कमी होणार नाही.

सभापति महोदय, इन कोयला उद्योगों की वजह से चंद्रपुर जिले के पर्यावरण पर क्या असर होगा, उसके बारे में पर्यावरणविद् संस्था ग्रीन प्लेनेट ने चेतावनी दी है, मैं वह आपको पढ़कर सुनाता हूं.

" जिस गति से विदर्भ की धरती पर नित्य नए उद्योगों की स्थापना हो रही है. उसे देखते हुए आगामी कुछ सालों में विदर्भवासियों को तेजाबी वर्षा का सामना करना पड़ेगा और ऐसी बीमारियाँ फैलेगी जिनका इलाज भी नहीं हो पाएगा. पेड़-पौधे, पशु-पक्षी सभी का जीवन खतरे में पड़ जाएगा. उक्त चेतावनी शहर के पर्यावरण विद् संस्था ग्रीन प्लेनेट ने दी है. संस्था के अनुसार पूरा विदर्भ आगामी वर्षों में बड़े तथा अन्य उद्योगों के कारण हिट आयलैंड बन सकता है इसका ईपी सेंटर चंद्रपुर और आसपास का परिसर होगा. विदर्भ में खुल रहे नये कारखानों तथा कोयला खदानों के साथ ही पावर प्लान्टों से तापमान में गंभीर वृध्दि होगी. इस कारण 10 से 15 प्रतिशत से अधिक वर्षा होने के अलावा पूरे विदर्भ में एसिड रेन होने का भी खतरा बढ़ गया है. संस्था के प्रा. योगेश्वर दुधपचारे ने यहां जारी विज्ञप्ति में कहा है कि आने वाले समय में पूरे विदर्भ में 62 कोयला खदाने प्रस्तावित है जिनमें से केवल चंद्रपुर में 40 खदानों का समावेश है. बिजली निर्माण परियोजनाओं में अकेले चंद्रपुर जिले में 13 परियोजनाएं प्रस्तावित है जिसमें विदर्भ की 56 परियोजनाओं का समावेश है. यदि पर्यावरण मंत्रालय द्वारा इन्हें मंजूरी दी जाती है तो तापमान में गंभीर स्वरुप की वृध्दि होगी. कोयला खदानों के लिए जंगल कटाई होगी तथा खदानों से सस्पेंडेट पर्टीकुलेट मेटर बढ़ेगा. इसके अलावा आरएसपीएम की

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी ....

मात्रा रेडिएशन को सींच लेगी जिससे तापमान में भयंकर वृध्दि होगी. यह वृध्दि वन्य जीवों के साथ ही मनुष्य के लिए बेहद हानिकारक साबित होगी. जिससे आम नागरिक ही नहीं सभी स्तर के लोगों के स्वास्थ्य पर गंभीर असर पड़ेगा. नई लाइलाज बीमारियाँ फैलेगी. कुल मिलाकर तापमान का बढ़ना सभी के लिए चिंतनीय है. इस दिशा में अभी से प्रयास आवश्यक हो गए हैं. वरना विदर्भ को हिट आयलैंड बनते देर नहीं लगेगी, ऐसी चेतावनी ग्रीन प्लेनेट ने दी है ".

यानंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

अशी धोक्याची सूचना अनेक पर्यावरणवादी लोकांनी दिली आहे. ताडोबा हे जंगल नॅशनल पार्क म्हणून घोषित झालेले आहे. त्याला लागून ही खाण आहे. मधल्या भागात 2-3 गावे होती त्या गावांचे सुध्दा सरकारने पुनर्वसन केलेले आहे. वन विभागाच्या हद्दीत जी गावे होती त्यांना तेथून हलविण्यात आले आहे. लोहारा-चंद्रपूर-नागपूर व्हाया मूल हा जो रस्ता आहे. हा संपूर्ण रस्ता वनातून जातो. तेथून या खाणीसाठी 4 हजार एकर जमीन दिलेली आहे. चंद्रपूर जिल्हयामध्ये 47 डिग्री तापमान आहे, चंद्रपूर जिल्हयात 47 टक्के जंगल आहे, गडचिरोली जिल्हयात 62 टक्के आहे. या जंगलात टायगर्स आहेत, पँथर्स आहेत. ओपन कास्टमधून माती काढून ती रस्त्याच्या आजुबाजूला टाकली जाते त्यामुळे मातीचे मोठमोठे ढिगारे दिसतात. आमच्या भागात नेहमी पूर येतो. हा पूर नैसर्गिक कारणामुळे येत नाही तर माणसांच्या चुकीमुळे येतो. या रस्त्यावरील माती नदीमध्ये, नगरपालिकेच्या नाल्यामध्ये येते, त्यामुळे ते नाले सुध्दा होतात, परिणामी पावसाचे पाणी शहरामध्ये आल्याने शहराच्या अनेक वार्डातील लोकांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे दरवर्षी 5 कोटी, 10 कोटींची नुकसान भरपाई मिळण्याची शासनाकडे मागणी केली जाते. दरवर्षी त्या भागातील आमदार, खासदार मदतीची मागणी करतात. अतिवृष्टीमुळे पूर येतो अशातील भाग नाही. कोळशाच्या खाणीतून मातीचा अति उपसा होत आहे. 60 फूट किंवा 80 फुटापर्यंत खोदकाम करुन माती काढून त्यातून कोळसा काढला जातो. शासनाच्या नियमानुसार माती उपसल्यानंतर त्यातून कोळसा काढून झाल्यावर ती माती जमिनीमध्ये दाबून त्याची लेव्हल करुन ज्यांची जमीन असेल ती त्यांना परत केली पाहिजे. त्या भागात 40 वर्षापासून ओपन कास्ट चालू आहेत. त्या कंपन्यांना 30-30 वर्षांची लिज दिलेली आहे. वेकोलि ही सरकारी कंपनी आहे. जास्तीत जास्त सरकारी उद्योगाला खाणी देण्याचे सरकारचे धोरण आहे. वेकोलि हा सरकारी उद्योग असूनही त्या जमिनीतून कोळसा काढून झाल्यावर या कंपनीकडून जमिनीची लेव्हल केली जात नाही. जमिनीची लेव्हल करण्यासाठी करोडो रुपये खर्च येतो. या कंपनीचा 30 वर्षांचा लिजचा कालावधी संपलेला आहे. आम्ही वेकोलि या कंपनीकडे खाण बंद करण्याचे कारण विचारले आहे. कंपनीला जर 3 लाख टन कोळसा काढावयाचा असेल तर त्यापैकी 70-80 टक्के कोळसा काढून घेतला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MAP/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

जातो. मायनिंग विभागाच्या नियमानुसार त्यांनी पूर्ण कोळसा काढल्यानंतर त्या कंपनीने त्या जमिनीची लेव्हल करुन दिली पाहिजे आणि ज्यांची जमीन असेल ती त्यांना परत दिली पाहिजे. परंतु हया कंपन्या संपूर्ण कोळसा काढत नाहीत. त्यांना पाहिजे तेवढा कोळसा काढतात. आमच्या भागात जवळपास 40 खाणी आहेत. त्यापैकी 15-20 अशा खाणी आहेत की त्यातून त्यांनी कोळसा काढल्यानंतर त्यांना ते परवडत नसल्याचे कारण सांगून बंद केल्या आहेत. त्यांनी जमिनीची लेव्हल केलेली नाही. अनेक वेळा कोल बेअरिंग ॲक्टच्या अनुषंगाने सन्माननीय मंत्रिमहोदयांकडे, जिल्हाधिका-यांकडे बैठका झालेल्या आहेत. त्यावेळी मला तेथे कोळसा आहे असे सांगण्यात आले आहे. त्यांनी तेथून माल काढलेला आहे. पण जमिनीची लेव्हल करण्याची मागणी केली की तेथे कोळसा आहे असे कारण सांगितले जाते. पूर्वी एक एकर जमिनीचा भाव 10-20 हजार होता, आता 2 लाख, 3 लाख, 10 लाख सुध्दा भाव देणार आहे. एक एकर जमिनीतून कोळसा काढला जातो त्याची किंमत 20 कोटी इतकी आहे. त्या कोळशात माती नसते, इतका चांगला कोळसा आहे. एमएसइबीला त्या कोळशात माती सापडते, त्याबाबत मी बोलणार नाही. त्या जमिनीतून मोठया प्रमाणात कोळशाचे उत्पादन होऊनही जमीन मालकाला त्याचा काहीच फायदा होत नाही. वेकोलि ही कंपनी सरकारी आहे. आता आमच्या भागात खाजगी खाणी सुध्दा आल्या आहेत. एम्प्टा, वर्धा पॉवर अशा अनेक खाजगी खाणी आहेत. त्यातून कर्नाटक राज्यात कोळसा जातो असे वर्तमानपत्रातून सुध्दा छापून येते. प्रत्यक्षात त्या खाणीतून कोळसा कर्नाटक राज्यात न जाता आपल्या भागातच विकला जातो.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

(श्री. जैनुद्दीन जव्हेरी ....)

डब्ल्यूसीएल हा सरकारी उद्योग आहे. 5 हजार मे.टनामागे 1 हजार कामगार त्या ठिकाणी काम करीत आहेत. म्हणजे 5 टनामागे 1 कामगार आहे. या प्रमाणे कोळशाचा भाव टनाला 2 हजार रु. इतका येतो.. 10 हजार रुपयावर एक कामगार काम करतो. आता जी नवीन कोळशाची खाण झालेली आहे त्यामधून 30 हजार मे.टन कोळसा काढला जातो. त्याठिकाणी 200 कामगार काम करतात. म्हणजे 150 टनामागे 1 कामगार काम करतो. सरकारी आणि खाजगी उद्योगामध्ये कामगारांच्या संख्येमध्ये किती फरक आहे तो आपण पहावा. माझे म्हणणे असे आहे की, आमच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे नवीन उद्योग आले तरी आमच्या जिल्ह्याला त्यापासून काहीच फायदा होणार नाही. आमच्या जिल्ह्यातील भूमिपूत्राला त्या उद्योगामध्ये काम मिळेल अशीही परिस्थिती नाही. दुसरे असे की अशा उद्योगामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होणार असल्यामुळे तेथील जनतेचा या उद्योगास विरोध आहे. याआधी मी या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. या खदानी प्रकल्पामुळे 78 हजार कोटी रुपयाची वनसंपदा नष्ट होणार आहे आणि सरकारने मात्र 100 कोटी घेऊन जमीन लिजवर दिलेली आहे. जेव्हा छोट्या छोट्या उद्योगासाठी आमच्या भागातील लोक सरकारकडे जातात त्यावेळी त्यांना अमूक इतके नुकसान होत असल्यामुळे तुम्ही अमूक इतके पैसे भरा, असे सांगितले जाते. निवेदनामध्ये देखील हे पैसे घेणार असे नमूद करण्यात आलेले आहे. या कोळसा प्रकल्पामुळे सरकारला काहीच फायदा होणार नाही, भूमिपूत्रांना काम मिळणार नाही, उलट पर्यावरणाचे, वनसंपदेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. आज केवळ देशालाच नाही तर जगाला वनसंपदेची आवश्यकता आहे. वनसंपदा नष्ट झाली तर वन्यप्राणी देखील नष्ट होतील. चंद्रपूरमध्ये व्याघ्र प्रकल्प आहे. तेही नष्ट होतील. सध्या त्या व्याघ्र प्रकल्पामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष आहे. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यामध्ये वनातील किती तरी जनावरे शहराकडे आलेली आहेत. जंगलामध्ये जनावरांसाठी पाण्याची सोय नाही. त्यांच्या उपजीविकेची सोय नाही. या बाबीकडे शासनाचे लक्ष नाही. आता पुन्हा नवीन उद्योग आमच्या माथी मारला जात आहे. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या उद्योगापासून कोणताही फायदा ना राज्याला होणार आहे ना जिल्ह्याला होणार आहे. जमशेदपूर येथे टाटाचा प्रोजेक्ट आहे. परंतु तो प्रोजेक्ट चंद्रपूर येथे होणार होता. जमशेदजी टाटा यांनी एका पुस्तकात असे लिहिलेले आहे की, त्यांनी चंद्रपूर आणि गडचिरोली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जैनुद्दिन जव्हेरी...

जिल्ह्याची पाहणी केल्यानंतर तेथे खनिज संपत्तीचा मोठा साठा आढळून आला. परंतु दळणवळणाची सोय नसल्यामुळे चंद्रपूर-गडचिरोली ऐवजी जमशेदपूर येथे त्यांनी उद्योग सुरु केला. सभापती महोदय, मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, हे जे उद्योग चंद्रपूर जिल्ह्याध्ये येणार आहेत त्यामुळे लाभ होण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर तोटाच होणार आहे. आज जगात सर्वात जास्त प्रदुषण चंद्रपूरमध्ये आहे. असे असताना वनसंपदा नष्ट करुन आणि अशा प्रकारचे उद्योग आणून प्रदुषणामध्ये वाढ होऊन लोकांना जगणे मुश्किल होणार आहे. म्हणजे वनसंपदा, वन्यप्राणी, माणसाचे जीवन यावर या प्रकल्पामुळे विपरित परिणाम होणार आहे. डब्ल्यूसीएल या सरकारी उद्योगाला जमीन दिली जात नाही, एनओसी दिली जात नाही. नवीन खाण करण्यासाठी बाजूची जमीन घेण्यास या सरकारी उद्योगाला परवानगी दिली जात नाही. असे असताना त्या ठिकाणी दोन तीन खाजगी उद्योग आलेले असून त्या उद्योगामध्ये एकाही भूमिपुत्राला काम मिळालेले नाही. माझी शासनाला एवढीच विनंती आहे की, राज्याला आणि तेथील लोकांना काहीच फायदा न होणारे, वनसंपदेचे नुकसान करणारे, पर्यावरणाची हानी करुन, प्रदुषणामध्ये वाढ करुन ॲसिडचा पाऊस पाडणारे प्रकल्प आमच्या चुंद्रपूर जिल्ह्यामध्ये असता कामा नयेत. म्हणून राज्य शासनाने केन्द्र शासनाला असे सांगितले पाहिजे की, चंद्रपूरमध्ये खूप खाणी आहेत. आणखी खाणीची आवश्यकता नाही. मात्र तेथे वनाची आवश्यकता आहे. आपण झाडे लावा, झाडे जगवा, जंगल वाढवा अशा घोषणा करतो. मग ही जंगले नष्ट करुन तेथे उद्योग सुरु करण्यासाठी कोणी परवानगी दिली, त्यामध्ये कोणाचे होत आहेत याची चौकशी करुन या अदानी ग्रुपची लिज ताबडतोबीने रद्द करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

...नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे (खनिकर्म राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून काही महत्वाचे प्रश्न सभागृहात उपस्थित केलेले आहेत. मे.अदानी पॉवर लिमिटेड, बोरगाव यांनी लोहारा कोळसा प्रकल्प, लोहारा (ता.जि.चंद्रपूर) येथे सुरु करण्याकरिता पर्यावरण विषयक मंजुरीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. मागील हिवाळी अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जव्हेरी यांनी हा प्रश्न उपस्थित केला होता. अदानी पॉवर प्लॅन्ट लोहारा येथे कार्यान्वित होणार आहे. विजेची मागणी लक्षात घेता सदर पॉवर प्लॅन्ट येत आहे. या पॉवर कंपनीने लोहारा येथे खनीज पट्टयाची मागणी केलेली आहे. खनीज विकासासाठी देण्यात आलेली परवानगी ही वन संवर्धन अधिनियम 1980 व पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 अंतर्गत अधीन राहून कोणत्याही खाण प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणा-या परिणामाच्या अभ्यास करुन, पर्यावरणावरील आघात, मुल्यांकन व पर्यावरण व्यवस्थापन अशा योजना तयार करुन केंद्रीय पर्यावरण विभागाची प्रकल्पपूर्व परवानगी घ्यावी लागते. या पॉवर प्रकल्पाला केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची तसेच केंद्रीय वन मंत्रालयाची अजूनपर्यंत मान्यता मिळालेली नाही. सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने दोन वेळा जनसुनावणी घेण्यात आली आहे. या सुनावणीमध्ये लोकांनी जे आक्षेप घेतले होते. ते आक्षेप केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडे पाठविण्यात आले आहेत. जो पर्यंत केंद्रीय वन व पर्यावरण विभागाची मान्यता मिळणार नाही, तोपर्यंत प्रकल्पाचे काम सुरु होणार नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : या प्रकल्पाला जमीन देण्यात आली आहे हे खरे आहे किंवा नाही याची मला माननीय मंत्री महोदयांकडून माहिती हवी आहे. डब्ल्यू.सी.एल.ला शासकीय कंपनी आहे. त्यांनी जागा मागितली तर वन कायद्याची आणि पर्यावरणाची अडचण पुढे करता. ही खाजगी कंपनी असून त्यांनी महाराष्ट्र शासनाकडून प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व एन.ओ.सी.मिळूवन घेतल्या आहेत.

श्री. नाना पंचबुध्दे : या प्रकल्पाला मान्यता देण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाला नाहीत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पासाठी एन.ओ.सी.उपलब्ध करुन दिलेले आहे. त्या जिल्हयाचे पालक मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत, त्यांना आपण माहिती विचारा. त्या परिसरात एकच रोड चांगला आहे. तो रोड देखील या प्रकल्पांतर्गत देण्याचा शासनाचा प्रयत्न दिसतो आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नाना पंचबुध्दे : या ठिकाणी रस्त्याच्या बाबतीत मी काहीही माहिती दिलेली नाही. मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर या प्रकल्पाच्या अनुषंगाने मत मागविण्यात आले आहे. त्यांचे मत अद्याप शासनाला प्राप्त झालेले नाही. केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडून या प्रकल्पाला जोपर्यंत मान्यता मिळणार नाही. तो पर्यंत या प्रकल्पाला मंजुरी देण्यात येणार नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : चंद्रपूर आणि गोंदिया जिल्हयात अशा प्रकारचे प्रकल्प येत असल्यामुळे प्रदूषण मोठया प्रमाणात वाढले आहे. त्या ठिकाणच्या तापमानात फार मोठया प्रमाणात वाढ झाली आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मी चंद्रपूर येथील औष्णिक वीज प्रकल्पाला तीन वेळा भेटी दिलेल्या आहेत. त्या प्रकल्पाला लागणारा कोळसा, त्याचा दर्जा, त्या प्रकल्पासाठी कोळसा कोणाकडून पुरविला जातो, या प्रकल्पातून निर्माण होणारी राख, त्या राखेमुळे होणारे प्रदूषण या गोष्टी मी अतिशय जवळून पाहिल्या आहेत. सन्माननीय सदस्यांचा मुद्दा अतिशय रास्त आहे. त्या ठिकाणी औष्णिक वीज केंद्र आहे. त्या प्रकल्पाची स्थापित क्षमता 4 ते 5 हजार मे.वॅ.ची आहे. तेवढया क्षमतेची वीज तेथे कधीच निर्मिती होत नाही. त्याचे कारण कोळसा मिळत नाही, मिळाला तर त्याचा दर्जा अतिशय खराब असतो. चंद्रपूर येथे आधीच औष्णिक वीज केंद्र कार्यरत आहे आणि अदानी पॉवर कंपनीसाठी तेथील खाण पट्टा घेत आहात. त्या ठिकाणी अतिशय धनदाट जंगल आहे. त्या ठिकाणी मोठमोठी झाडे आणि झुडपे आहेत. ती नष्ट होतील अशी त्यांची भावना आहे. त्यांनी त्यासंबंधीचे पुरावे दिले. परंतु माननीय मंत्री महोदय त्यासंबंधीचा साधा उल्लेखही करीत नाहीत. तो खनीज पट्टा या कंपनीला दिला तर तेथील वन संपत्ती नष्ट होणार आहे ही गोष्ट सत्य आहे काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, या आधी सुध्दा प्रकल्पांसाठी खाण पट्टे देण्यात आले आहेत. त्या पट्टयावर मोठया प्रमाणात वन होते. शासनाचे वन गेल्यामुळे जी काही आकारणी होत असेल, ती सुध्दा भरण्याची हमी आपण त्यांच्याकडून घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : बल्लारपूर नगर परिषदेशी मी 27 वर्षे संबंधीत आहे. वन खात्याची आता नवीन नोटीस निघालेली आहे की, नगर परिषदेच्या हद्दीत एक मीटर जरी वन जमीन आली व ती जमीन विना परवाना मुख्याधिकारी वापरली तर त्यांचे विरुध्द क्रिमिनल गुन्हा दाखल होऊ शकतो.

यानंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

असा कायदा आहे. माणिकगढ सिमेंट कंपनीला 1000 हेक्टर लाईम स्टोनची जमीन क्लिअर करुन दिली. नगरपरिषदेला स्वत:च्या कामासाठी एनओसी मिळत नाही. खाजगी कंपनीला मात्र तुम्ही एनओसी देता. वरुन आदेश आले की, तुम्ही देणार. चंद्रपूर जिल्हयामध्ये प्रदूषण खूप आहे याची सर्वांना माहिती आहे. पाणी नाही, पाऊस पडत नाही, जनावरे जंगलातून बाहेर पडत आहेत. हे सर्व खरे आहे की नाही? हे तुम्ही वाचविणार आहात की नाही?

श्री.नाना पंचबुध्दे : हे विचारात घेऊन केंद्र शासनाला कळविले आहे. चंद्रपूरचे मुख्य वन संरक्षक यांच्याकडून मत मागविले आहे. त्यांच्याकडून मत अप्राप्त आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माननीय वन व पर्यावरण राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. चंद्रपूर जिल्हयात प्रदूषण वाढत आहे की नाही? तेथे घनदाट जंगल आहे. टायगर आणि पँथर त्या जंगलात येतात. मी म्हणतो ते खरे आहे की नाही हे मंत्रीमहोदयांनी सांगावे. सभापती महोदय, आपण शासनाला निर्देश द्यावेत. सुरुवातीला वन व पर्यावरण मंत्री नाहीत म्हणून चर्चा थांबविली होती. आता सन्माननीय वन व पर्यावरण राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ते चंद्रपूर जिल्हयाचे आहेत. त्यांनी सांगावे, मी जे बोलत आहे ते खरे आहे की नाही? ते आमच्या जिल्हयाचे असल्यामुळे खोटे आहे असे म्हणणार नाहीत याचा मला विश्वास आहे.

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : आपण अतिशय महत्वाचा प्रश्न अर्धातास चर्चेच्या निमित्ताने याठिकाणी मांडला आहे. या प्रश्नाचा अधिक अभ्यास होणे आवश्यक आहे. पर्यावरण आणि जंगल वाचविण्याच्या दृष्टीने जे जे आवश्यक आहे ते विचारात घेता सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांच्या दालनामध्ये या विषयाची चर्चा करण्यासाठी बैठक घ्यावी आणि त्यातून योग्य मार्ग काढावा.

श्री.विजय वडेट्टीवार : होय.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी त्यांची अर्धातास चर्चा उद्या चर्चेला घ्यावी अशी विनंती केली असल्यामुळे आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे आपली अर्धातास चर्चा उपस्थित करतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सहाय्यक वाहतूक अधीक्षक पदाच्या परीक्षा पध्दतीमध्ये झालेला गोंधळ

मु.शी.: राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सहाय्यक वाहतूक अधीक्षक पदाच्या परीक्षा पध्दतीमध्ये झालेला गोंधळ यासंबंधी श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धातास चर्चा

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो.

"राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सहायक वाहतूक अधिक्षक या पदाकरीता दिनांक २२ मार्च, २००९ रोजी ५५ जागांसाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेत ४० गुण अभ्यासक्रमाबाहेरील असणे, याबाबत राज्य मार्ग परिवहन महामंडळाने परिक्षा अभ्यासक्रमाबाबत काढलेले परिपत्रक सिंधुदूर्गात परिक्षेपूर्वी फक्त दोन दिवस आधी मिळणे व तेच परिपत्रक सांगली जिल्ह्यात आठ दिवसापूर्वी मिळाल्याने सांगली जिल्ह्यातील उमेदवार मोठ्या प्रमाणात उत्तीर्ण झाले असून एकाच परिक्षेला काढलेले परिपत्रक दोन वेगवेगळे काढण्यात आले असल्याने परिक्षार्थीमध्ये गोंधळ उडून काही परिक्षार्थीवर अन्याय झाल्याने, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, एस.टी.महामंडळ यांच्या वतीने सहाय्यक वाहतूक अधीक्षक पदासाठी २००९ मध्ये परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षेसाठी सिलॅबस पूर्णपणे एस.टी.महामंडळाने तयार केले होते. सिलॅबससाठी असणारे विषय काय होते, त्या विषयाबद्दल जी परिपत्रकाची नोंद होती ते परिपत्रक २२ तारखेला परीक्षा झाल्यानंतर म्हणजे २६ तारखेला निर्गमित झाले व २८ तारखेला डेपोमध्ये मिळाले. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातून ८ उमेदवारांना निवडले गेले होते त्यांना त्या विषयाचा अभ्यास करता आला नाही. त्यामुळे परीक्षेमध्ये ते प्रश्न सोडविले नसल्यामुळे त्या प्रश्नाचे गुण त्यांना मिळविता आले नाहीत. या परीक्षेचे पेपर तपासणारे हे सांगली व सातारा जिल्हयातील होते. त्यामुळे सांगली जिल्हयातील १२ पैकी ९ व सातारा जिल्हयातील ७ पैकी ४ उमेदवार उत्तीर्ण झाले आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील आठही उमेदवार अनुत्तीर्ण झाले. सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व पात्र उमेदवार न्यायालयात गेले. न्यायालयाला युक्तिवाद पटल्यानंतर ५९ पैकी ५१ जागा भरण्याचे आदेश न्यायालयाने दिले.....

३पी.२...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

आणि 8 जागा रिक्त ठेवण्याबाबतचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे माननीय मंत्री महोदयांकडे जी माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली आहे ती योजना परिपत्रक सन 2009 प्रमाणे दिलेली नसून मे, 2007 प्रमाणे दिलेली आहे. अशा प्रकारे या निवडीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केलेला आहे. कारण या ठिकाणी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाहतूक अधीक्षक पदाच्या परीक्षेसाठी बसले होते त्यांना डावलण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कोर्टाने राखून ठेवलेल्या जागांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण द्यावे. अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळातील नोकर भरतीच्या संदर्भात जो विषय सभागृहात मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरताच हा प्रश्न मर्यादित आहे अशातला भाग नाही. कारण नोकर भरती करताना जी जाहिरात दिली त्याप्रमाणे 10 वी व 12 वी परीक्षा उत्तीण झालेल्या मुलांनी अर्ज केले. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये किंवा विभागांमध्ये नोकर भरती होती. प्रत्येक ठिकाणी परीक्षेच्या वेगवेगळ्या तारखा देण्यात आल्या. त्यानुसार राज्यातील मुलांनी अनेक विभागांमधून नोकरीसाठी अर्ज केले. त्याचे दुष्परिणाम एस.टी. महामंडळाला नंतर भोगावे लागतात, ही गोष्ट विसरुन चालणार नाही, कारण इतर जिल्ह्यातील मुले निवड झाल्यानंतर एकाच वर्षात बदलीसाठी प्रयत्न करतात. अशा प्रकारे पश्चिम महाराष्ट्रातील मुलांनी कोकणातून अर्ज केले आणि गुणवत्तेनुसार यामध्ये भरती करण्यात येते. आताच सभागृहात सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डासंबंधीची चर्चा झाली. त्यामुळे आपल्या बोर्डाच्या मुलांवर कसा अन्याय होतो हेही आपण ऐकले. हेच प्रकार या ठिकाणी घडतात. या पदांसाठी लेखी परीक्षा न घेता शालांत परीक्षेत मिळालेल्या गुणांवरच निवड केली जाते. साताऱ्यातील मुलांनी अर्ज केले त्यानुसार व्हॅकन्सी जर 25-30 इतक्या पदांची असेल तर गुणवत्ता यादीत जी मुले पहिली आली तीच निवडली जातात. निवड झालेला मुलगा तेथे नोकरीत जातो आणि वर्षभराच्या आत तो ट्रान्सफरसाठी अर्ज करतो म्हणून अशा भरतीबाबत जो धोरणात्मक निर्णय आहे त्यात बदल होणे आवश्यक आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जिल्हानिहाय अशी भरती करावी आणि एकच तारीख दिली तर उमेदवार त्याला सोईस्कर असेल अशाच ठिकाणाहून अर्ज करतील, त्यामुळे पुढील प्रोसिजरला आळा बसू शकतो. परंतु वेगवेगळ्या तारखांमुळे विविध ठिकाणी मुले अर्ज करतात. प्रत्येक जिल्ह्यात शिक्षणाची व्यवस्था सारखीच असते असे नाही, कारण याबाबतीत देखील अनुशेष आहेच. सगळ्या ठिकाणी महापालिका अथवा उच्च दर्जाची शिक्षण व्यवस्था नसते. ग्रामीण भागातील गरीब मुले मात्र अशा वेळेस वंचित राहतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भरती करताना सातारा व सांगलीतील मुलांची टक्केवारी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुलांची टक्केवारी वेगवेगळी असू शकते. बऱ्याच वेळा असे होते की, व्हॅकन्सी जेथे जास्त असल्या तरी तेथे सिलेक्ट होण्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ ST/

श्री. अरविंद सावंत .....

चान्सेस कमी असतात. पुण्याचा विचार केला तर 70 ते 80 टक्क्यावर ॲडमिशन बंद होते परंतु सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार केला तर 80 टक्क्याचे विद्यार्थी मिळणारच नाहीत, ही जी तफावत आहे ती कमी करणे या पध्दतीमध्ये नव्हते म्हणून त्यात बदल होण्याची गरज आहे. म्हणून ही परीक्षा संपूर्ण राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत एकाच वेळी घ्यावी. त्यासाठी त्या त्या जिल्ह्यातील मुलांना प्राधान्य द्यावे, जेणेकरुन ते नोकरीत राहतील आणि बदली मागणार नाहीत. याबाबत शासन विचार करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

त्याच प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयातील हा विषय आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 मुलांना परीक्षेसाठी सिलॅबसच्या बाहेरची माहिती उशिरा मिळालेली आहे. यासंदर्भात न्यायालयाने सुध्दा हा विषय राखून धरलेला आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 मुलांना न्याय द्यावा अशी मागणी या निमित्ताने करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील (परिवहन): सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी जी अर्धातास चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत, विभागाअंतर्गत परीक्षा घेण्यात आली होती. वाहतूक निरीक्षकांना प्रमोशन देण्यासाठी सहाय्यक वाहतूक अधीक्षक या पदाच्या 59 पदांसाठी ही परीक्षा 22.3.2009 रोजी घेण्यात आली होती. ही परीक्षा 100 गुणांची होती. याचे बायफरकेशन करुन वाहतूक शाखेसाठी 70 गुण, कामगार कराराच्या संदर्भातील प्रश्नांसाठी 20 गुण व जनरल नॉलेजच्या संदर्भात 10 गुण होते. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, परीक्षेमध्ये जे प्रश्न यावयास पाहिजे होते, ते प्रश्न न येता इतर प्रश्न परीक्षेत विचारल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 मुलांवर अन्याय झालेला आहे. 100 गुणांच्या परीक्षेसाठी 3 तासाचा वेळ देण्यात आला होता. या परीक्षेमध्ये फक्त खात्याच्याच संदर्भातील प्रश्न विचारण्यात आले होते, बाहेरचे प्रश्न विचारण्यात आले नव्हते. या परीक्षेमध्ये 59 पैकी 51 मुले पास झाली व 8 मुले अनुत्तीर्ण झाली. अनुत्तीर्ण झालेली आठही मुले सिंधुदुर्ग जिल्हयातीलच आहेत. बाकीच्या जिल्हयातील मुले हुशार होती त्यामुळे ती मुले पास झाली व ही 8 मुले हुशार नव्हते म्हणून ते नापास झाले, असे मी म्हणणार नाही. या परीक्षामध्ये परिपत्रका व्यतिरिक्त प्रश्न विचारण्यात आले नव्हते. 51 विद्यार्थी परिपत्रकाप्रमाणे पास झालेले आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय मंत्री महोदय सांगतात त्यामध्ये काहीही चूक नाही. मुद्दा एवढाच आहे की, सदर परीक्षा 22 तारखेला झाली, परिपत्रक 26 तारखेला मिळाले. म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयातील 8 मुले नापास झालेली आहेत.

या मुलांना परिपत्रकात जो बदल झालेला आहे, त्याची माहिती अगोदर मिळाली नाही. परीक्षा झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हयातील मुलांना परीक्षेच्या संदर्भातील माहिती मिळाली, असा हा प्रश्न आहे. मी जो मुद्दा मांडलेला आहे, तो आपल्या म्हणण्याला लागू होत नाही. एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात आपण चौकशी करीत आहोत. श्री. सचेतन जयराम बोवलेकर यांनी कोर्टात याचिका दाखल केली होती व कोर्टाने ही याचिका तपासल्यानंतर असा निर्णय घेतला की, जी 51 मुले उत्तीर्ण झालेली आहेत, त्यांच्या नेमणुका करण्यात याव्यात. परंतु 8 लोकांचा प्रश्न अजूनही कोर्टात प्रलंबित आहे. यासंदर्भातील सत्य-असत्यता आपण पडताळून पाहत आहोत. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्या प्रमाणे विभागाच्या माध्यमातून जर काही चूक होत असेल, या मुलांना पत्र उशिरा मिळाले असेल तर ती बाब तपासून घेतली जाईल. या 8 मुलांवर अन्याय होऊ नये यासंदर्भातील काळजी विभागाकडून घेतली जात आहे. ही बाब आता कोर्टात असल्यामुळे आपल्याला या विषयाच्या संदर्भात हस्तक्षेप करता येत नाही. या केसचा निकाल अजून लागलेला नाही. 59 मुलांपैकी 51 मुले पास झालेली आहेत त्यामुळे या 51 मुलांना ऑर्डर द्यावी असे कोर्टाचे आदेश झालेले आहेत व 8 मुलांचे आदेश काढू नये, असेही आदेश कोर्टाने दिलेले आहेत. याचा अर्थ ही सर्व बाब तपासून पाहण्याच्या संदर्भातील तो आदेश आहे. 8 मुलांवर अन्याय झाला आहे यासंदर्भात न्यायालयाचा आदेश झाला तर त्याबाबतीत सर्व माहिती तपासून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, प्रशासनाकडूनच यासंदर्भात चूक झालेली आहे. 22 तारखेला असलेल्या परीक्षेची परिपत्रके 26 तारखेला आणि 28 तारखेला डेपोमध्ये गेली. माझ्या माहिती प्रमाणे हे शिष्टमंडळ एम.डी गुप्ता यांना भेटले व त्यांनी सुध्दा हा विषय मान्य केला आहे. श्री. रविंद्र कदम हे जनरल व्यवस्थापक आहेत त्यांना सुध्दा ही बाब मान्य नाही त्यामुळे हा विषय दाबण्याचा प्रयत्न चालला आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ...

या विषयाला 20 मार्क्स आहेत की, 40 मार्क्स आहेत हा मुद्दा महत्वाचा नसून या परीक्षार्थ्यावरील अन्याय दूर करण्यासबंधीचा निर्णय शासन किती दिवसात घेणार आहे ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, मूळ परिपत्रक 2007 साली काढण्यात आले होते त्यानंतर 2009 साली सुधारित परिपत्रक काढण्यात आले होते. त्यानुसार 2 मार्क ठेवण्यात आले होते ज्यांनी याचिका दाखल केली होती त्यांना 45 मार्क्स मिळाले असून. दोन मार्क्स मिळतील असे जरी आपण धरले तरी एकूण मार्क्स 47 होतात. त्याचबरोबर जे 51 मुले पास झालेली आहेत त्या सर्वाना 50 पेक्षा जास्त मार्क्स मिळालेले आहेत. हे सर्व बाबी तपासून पाहण्यात येत आहेत.

श्री.परशुराम उपरकर : त्यामध्येच सगळा घोळ झालेला आहे.

डॉ.सतीश पाटील : या परीक्षेमध्ये जर अधिकारी दोषी असेल तर त्याबाबतीत विभागीय चौकशी करण्यात येईल आणि कोणावरही अन्याय होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : किती दिवसात प्रयत्न करण्यात येईल ?

डॉ.सतीश पाटील : किती दिवसात प्रयत्न करण्यात येईल हे मला आताच सांगता येणार नाही.

श्री.अरविद सावंत :सभापती महोदय, चौकशी पेक्षासुध्दा आम्हाला दुसरी गोष्ट अधिक महत्वाची वाटते. माननीय न्यायालयाने 59 पैकी 51 जागा भरण्याचे आदेश दिले आणि 8 जागाच्या संदर्भात संबंधित लोकांनी अर्ज केले असून त्या अर्जाची जी तपासणी करावयाची आहे ती किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे आणि त्यासबंधीचा निर्णय त्यांना किती दिवसात कळविण्यात येणार आहे ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच सागितले आहे की, या मुलांवर अन्याय होणार नाही अशा प्रकारची भूमिका शासनाने घेतलेली आहे.या मुलांना 3 दिवस प्रशिक्षणार्थी म्हणून भोसरी येथे प्रशिक्षण दिले होते. या परीक्षेमध्ये कोण कोणते प्रश्न विचारण्यात येणार आहेत.याची त्यांना माहिती दिली होती. खात्याअंतर्गत प्रमोशन द्यावयाचे असल्यामुळे सबंधित लोकांना खात्यातील गोष्टी माहिती असणे क्रमप्राप्त आहे. तीन दिवस प्रशिक्षण दिल्या नंतरसुध्दा या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्तिना काही प्रश्न सोडवता आले नाही वा त्यांना काही माहिती देता आली नाही त्यामुळे ते नापास झाले आहेत. प्रमोशन देत असतांना सुध्दा त्यांना खात्यातील माहिती असणे क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर या प्रश्नाला दोन मार्क्स होते. त्यामुळे दोन मार्क्स जरी दिले तरी 45 अधिक 2 म्हणजे 47 मार्क्स होतात . त्यामुळे ते 50 पेक्षा जास्त मार्क्स मिळवू शकत नाही तरीसुध्दा आपल्याकडे एकूण 59 पदे आहेत आणि 8 जण वंचित राहत असतील तर त्यासबंधी काय निर्णय घेता येईल या दृष्टीने शासन विचार करील.

श्री.परशुराम उपरकर : सभ्ांपती महोदय, प्रवाशी वाढ यासाठी 20 गुण, योजनासाठी 20 गुण अशा प्रकारे 40 गुण ठेवण्यात आले होते व हे प्रश्न अभ्यासक्रमातील नव्हते. याबाबतीत विभागाने दिनांक 20.2.09 ला परिपत्रक काढले होते व ते सबंधिताकडे 26.2.2009 ला पोहोचले होते. हे परिपत्रक पोहोचविण्यामध्ये संबंधित अधिका-यांनी दिरंगाई केली असल्यामुळे या व्यक्तिचे नुकसान झालेले आहे.तेव्हा त्यांना न्याय देण्यासाठी तातडीने विचार करण्यात येणार आहे काय ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, जे नवीन प्रश्न टाकण्यात आले होते त्याचा येथे संबंध नाही. एकूण 100 मार्काची प्रश्नपत्रिका होती त्यामध्ये वाहतूक शाखेवर 70 मार्काचे, कामगार कराराच्या संदर्भात 20 मार्काचे, आणि सर्वसामान्य ज्ञानासंबंधी 10 मार्कचे प्रश्न विचारण्यात आले होते. सर्वसामान्य ज्ञानासबंधीचे प्रश्न सोपे होते. उदाहरणार्थ राज्याचे मुख्यमंत्री कोण आहेत, उपमुख्यमंत्री कोण आहेत, क्रीडा मंत्री कोण आहेत, परिवहन खात्याचे मंत्री कोण आहेत इत्यादीसबंधी 10 मार्काचे प्रश्न होते. अशा प्रकारे सर्वसामान्य माहिती जर त्या व्यक्तिला नसेल तर ते दुर्देव म्हणावे लागेल. मी मघाशीच सांगितले की यामध्ये जर कोणाची चूक असल्याचे दिसून आले तर त्याची विभागीय चौकशीसुध्दा करण्यात येईल. परंतु या विषयाला जास्त मार्क नव्हते तर फक्त दोन मार्क्स होते. जे परिपत्रक उशिरा काढण्यात आले होते त्यासंबंधी फक्त दोन मार्क्स ठेवण्यात आले होते.

श्री.परशुराम उपरकर : उशिरा फॅक्स पाठविण्याची काय गरज होती ,. दोन मार्काचा जर प्रश्न होता तर फॅक्सने परिपत्रक का पाठविण्यात आले होते ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सतीश पाटील : यासबंधीचे परिपत्रक जाणीवपूर्वक कोणी उशिरा पोहोचविले असेल तर त्याबाबतीत सुध्दा संबधिताविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. कोणावरही अन्याय केला जाणार नाही. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी एक मुद्दा येथे मांडला होता. राज्यतील सर्व जिल्हयात सध्या ड्रायव्हर्स आणि कंडक्टर्सची भरती सुरु आहे त्यांचे म्हणणे असे की, एकाच दिवशी सगळी भरती व्हावयास पाहिजे. ..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील...

कारण जळगावला भरती झाली, त्या ठिकाणी परीक्षेत नापास झाल्यावर ते धुळयाला जातात, त्याठिक्राणी देखील जमले नाहीतर ते कोकणात जातात. आणि यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे म्हणून आम्ही धुळयाचा अधिकारी नाशिकला पाठवितो, नाशिकचा अधिकारी कोकणात पाठवितो. तसेच, सर्व चाचणी परीक्षा एकाच दिवसात होणार नाही. त्याकरिता वेगवेगळया तारखा दिल्या आहेत. त्यांना सुध्दा या सदर्भात न्याय देण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे. ती आता आपल्याला रोखता येणार नाही. या पुढील काळात जिल्हया जिल्हयात वेगवेगळया दिवशी परीक्षा होणार आहेत त्या एकाच दिवशी घेण्याचा विचार राहील.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर भरती होत असते. आमचा जिल्हा लहान असल्यामुळे 220 पेक्षा जास्त पदे नाहीत. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. या 220 पदांमध्ये जिल्हयातील स्थानिक लोकांना किती प्राधान्य दिले हा एक संशोधनाचा विषय आहे. सर्वच जिल्हयांमध्ये वेगवेगळया तारखा देण्यात आल्यामुळे सांगली, सातारा येथील उमेदवार आमच्या जिल्हयात येऊन भरले आहेत. हे करीत असतांना जिल्हयातील स्थानिक उमेदवारांवर फार मोठा अन्याय होत आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या भरतीला आपण स्थगिती देणार काय? संपूर्ण महाराष्ट्रामध्ये भरती करीत असतांना वेगवेगळया जिल्हयातील अधिकारी आपण त्याठिक्राणी पाठवीत असले तरी ते आपलेच अधिकारी आहेत. त्याबाबत यापूर्वी सुध्दा तक्रारी केल्या होत्या. म्हणून ही भरती प्रक्रिया थांबवून आपण सर्व जिल्हयांमध्ये एकाच दिवशी भरती केली पाहिजे. ज्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील स्थानिक उमेदवारांवर अन्याय होणार नाही. तशाप्रकारचा निर्णय आपण घेणार काय?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये 70 ते 80 टक्कयापर्यंत भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे आणि त्याच्या याद्या प्रत्येक जिल्हयामध्ये लावल्या आहेत. त्यामुळे या प्रक्रियेला आता स्थगिती देता येणार नाही. यापुढील काळात होणाऱ्या भरतीबाबत विचार करता येईल. या भरती प्रक्रियेबाबत यापूर्वी घेण्यात आलेला धोरणात्मक निर्णय आता आपल्याला बदलता येणार नाही. शेवटी ही मुले महाराष्ट्र राज्यातील आहेत, बाहेरच्या राज्यातील नाहीत. त्यांनी कोणत्याही जिल्हयात जावून उभे राहण्याची त्यांना संधी मिळावी हा उद्देश होता. आम्ही मेरीट लिस्टप्रमाणे याद्या करतो. मेरीट लिस्टमध्ये एखादा उमेदवार खाली आला तर काही बिघडत नाही. त्यामुळे मेरीटमधील उमेदवारांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. राजन तेली : सभापती महोदय, वाहन चालकांची शैक्षणिक अर्हता 4 थी किंवा 5वी उत्तीर्ण असते. ही पदे सुध्दा बाहेरुन भरली जातात. त्याठिकाणी आपण एस.सी.,एस.टी.,व्ही.जे.एन.टी. चे उमेदवार नियुक्त करता. आता माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत म्हणाल्याप्रमाणे हे उमेदवार एक वर्षाच्या आत बदलीसाठी प्रयत्न करतात. त्यामुळे त्या जागा पुन्हा रिक्त राहतात. आणि म्हणून मागील दहा वर्षीच्या काळात झालेल्या सर्व भरतीची प्रकरणे तपासून आपण योग्य तो निर्णय घेणार काय?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाला जोडून मला एक सूचना करावयाची आहे की, 220 जागांपैकी 20 जागांवर सिंधुदुर्ग जिल्हयातील माणसे भरली गेली तर त्यांना काय वाटेल? म्हणून मी सातत्याने सांगत आहे की, आपले शासन या कायद्याची कशी धज्जी उडवीत आहे? उदा.आपण सेवायोजन कार्यालय काढले आहे, त्याठिकाणी आपण कां कळविले नाही? त्यासंबंधी एम्प्लापॅयमेंट एक्सेचेंजच्या कायद्याची आपण अंमलबजावणी करीत नाही. आपण जर स्थानिक सेवा योजन कार्यालयाला कळविले असते तर आपल्याला स्थानिक माणसे मिळाली असती. आपण हे प्रकार जाणीवपूर्वक करीत आहात. सर्व माणसे पश्चिम महाराष्ट्रातील भरली जातात. धुळे जिल्हयामध्ये आदिवासी मुले मेरीटमध्ये कुठे आहेत? वाहन चालकाच्या पदाकरिता 60 टक्के गुण असलेला आदिवासी मुलगा नंदूरबार जिल्हयामध्ये मिळेल काय? या मुलांना आपण नोकरीपासून कशासाठी वंचित करता? म्हणून माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी केलेल्या मागणीप्रमाणे ही भरतीची प्रक्रिया आपण रद्द करावी. आणि सेवा योजन कार्यालयाच्या माध्यमातून आपण ही नोकर भरती करणार काय?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, या नोकर भरतीच्या प्रक्रियेमध्ये अन्याय झाल्याची कुणाकडूनही तक्रार आलेली नाही. आणि म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे 70 ते 80 टक्के भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दोन-तीन जिल्हयांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण व्हावयाची राहिली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया जर आपण थांबविली तर ज्यांचे सिलेक्शन झाले आहे त्यांच्यावर अन्याय होणार आहे...

श्री. अरविंद सावंत : आपल्या अधिकाऱ्यांनी एम्प्लॉयमेंट एक्सचेंज ॲक्टचा भंग केला आहे. त्यांनी सेवा योजन कार्यालयाला कां कळविले नाही? हे आपल्या अधिकाऱ्यांना विचारा.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना सेवायोजन कार्यालयाचा नियम लागू नाही काय ? तसे असेल सांगावे की, आमच्या महामंडळाला सेवायोजन कार्यालयाचा कायदा लागू नाही, आम्ही काहीही करावयास स्वायत्त आहोत हे नमूद करावे म्हणजे येथे नोकर भरती कशी केली जाते हे आम्हाला कळेल.

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, आज आपल्याला या प्रक्रियेला रोखता येत नाही. पण सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्या अतिशय चांगल्या आहेत. कोणावरही अन्याय होता कामा नये हे सुध्दा आम्हाला मान्य आहे.म्हणून आपण यासंबंधातील धोरणात्मक निर्णय पुढच्या वेळेस घेऊ.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सभागृहामध्ये वारंवार या विषयाच्या अनुषंगाने स्थानिक लोकांची नोकरभरती करण्याच्या बाबतीत आणि कोकणावर जो अन्याय होतो, त्याबाबतीत सातत्याने प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्या प्रश्नांच्या संदर्भात यापूर्वीच्या माननीय मंत्री महोदयांनी देखील अशाच प्रकारची उत्तरे दिलेली आहेत. परंतु त्यादृष्टीने काहीही अंमलबजावणी होत नाही. तेव्हा ही अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय ? तसेच नोकर भरतीबाबत स्थगिती देणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सिंधुदूर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. परंतु सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये व्होल्वोची सर्व्हीस सुरु नाही. जर गोव्यातील कदंबा ट्रान्सपोर्ट सर्व्हीसची व्होल्वो सिंधुदूर्ग मध्ये भरत असेल, तर अशा परिस्थितीत कोकणामध्ये एस.टी.महामंडळातर्फे व्होल्वोची बस सर्व्हीस सुरु करणार आहात काय ? हा पहिला प्रश्न आहे. त्याचप्रमाणे सिंधुदूर्ग हा पर्यटन जिल्हा असल्यामुळे, तेथील पर्यटनाची जी स्थळे आहेत तेथे जाण्यासाठी एस.टी. महामंडळा तर्फे मिनी बस उपलब्ध करुन देणार आहात काय ? तसेच नवीन बस मध्ये देखील सिंधुदूर्ग जिल्हाच्या बाबतीत दुजाभाव करण्यात आला आहे. त्याचे कारण काय आहे ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोकणातील काही भाग हा पर्यटन जिल्हा म्हणून ओळखला जातो. एस.टी.महामंडळाने असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, सध्या ज्या मार्गावर खाजगी बस सेवा सुरु आहे, तेथे त्याला पर्याय म्हणून एस.टी.बस सेवा सुध्दा पोहोचली पाहिजे. या दृष्टीकोनातून आपण सेमी लक्झरी बस, व्होल्वो बस इ.बसेसची वाहतूक सुरु केलेली आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. त्याविषयी सांगावयाचे तर मी येथे या राज्याच्या परिवहन विभागाचा राज्यमंत्री म्हणून शब्द

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देतो की, जर याठिकाणी सुरु करण्यात आलेल्या बसेससाठी लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे असे दिसून आले तर तात्काळ म्हणजे आठ दिवसाच्या आत आम्ही आपल्या भागात व्होल्वो बसेसची सेवा सुरु करु.

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : अर्धा तास चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे.सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 11-06-2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 05 वाजून 32 मिनिटांनी,गुरुवार,दिनांक 11-06-2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही